CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, ६ सप्टेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३९ वे अंक ३०७ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# राज्यात १.१७ लाख कोटी गुंतवणुकीच्या प्रकल्पांना मान्यता

- सेमीकंडक्टर, इलेक्ट्रिक वाहन निर्मितीत गुंतवणूक
- २९ हजार रोजगार निर्मिती


**वृत्तसंस्था,**
**मुंबई, ५ सप्टेंबर**

राज्यातील मराठवाडा, विदर्भ, पुणे, पनवेल येथे १ लाख १७ हजार २२० कोटी रुपये गुंतवणुकीच्या उच्च तंत्रज्ञानावर आधारित ४ विशाल प्रकल्पांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मान्यता दिली. या प्रकल्पांमुळे २९ हजार रोजगार निर्मिती होणार आहे.

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेत उद्योग विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक झाली. मान्यता दिलेल्या प्रकल्पांमुळे राज्यात सेमीकंडक्टर आणि इलेक्ट्रिक वाहन निर्मितीत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक, प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. यापूर्वी जुलै महिन्यात झालेल्या उपसमितीच्या बैठकीत ८० हजार कोटींच्या गुंतवणूक प्रकल्पांना मान्यता देण्यात आली होती. त्यामुळे गेल्या दोन महिन्यांत झालेल्या बैठकांमध्ये एकूण दोन लाख कोटींच्या गुंतवणूक प्रकल्पांना मान्यता मिळाली आहे.

मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या या बैठकीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. उद्योग मंत्री उदय सामंत दरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते. टॉवर सेमीकंडक्टर कंपनी व अदानी समूह यांच्या सहकार्याने उच्च तंत्रज्ञानावर आधारित सेमीकंडक्टर निर्मितीचा अतिविशाल प्रकल्प पनवेल, जिल्हा रायगड येथे उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पात पहिल्या टप्प्यात ५८ हजार ७६३ कोटी तर, दुसऱ्या टप्प्यात २५ हजार १८४ कोटी अशी एकूण ८३ हजार ९४७ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. स्कोडा ऑटो फोक्सवॅगन इंडिया कंपनीचा प्रकल्प पुणे येथे एकात्मिक पद्धतीने स्थापन करण्यात येणार आहे. या प्रकल्पात एकूण १२ हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे. त्यामुळे एक हजार रोजगार निर्मिती होणार आहे.

टोयोटा किर्लोस्कर मोटर कंपनीचा इलेक्ट्रिक वाहन निर्मितीचा विशाल प्रकल्प छत्रपती संभाजीनगर येथे सुरू करण्यात येणार आहे. या प्रकल्पात एकूण २१,२७३ कोटींची गुंतवणूक होणार असून, १२ हजार रोजगार निर्मिती होणार आहे.



### अमरावतीत रेमंड लक्झरीचा प्रकल्प

रेमंड लक्झरी कॉटन्सचा स्पिनींग, यार्न डाईंग, विव्हींग ज्यूट, कॉटन, ज्यूट, मेस्टा, कॉटन या उत्पादन निर्मितीचा विशाल प्रकल्प अतिरिक्त औद्योगिक विकास महामंडळ नांदगाव पेठ, जि. अमरावती येथे होणार आहे. या प्रकल्पात १८८ कोटींची गुंतवणूक आणि ५५० रोजगार निर्मिती होणार आहे.

## ▶▶ महत्त्वाचे...

### पूजा खेडकरची अटक पुन्हा टळली

**नवी दिल्ली :** बडतर्फ आयएएस प्रशिक्षणार्थी पूजा खेडकरची अटक पुन्हा टळली आहे. सर्वोच्च न्यायालयाने पोलिसांना २६ सप्टेंबरपर्यंत तिला अटक न करण्याचा आदेश दिला. बनावट ओळख प्रकरणी न्यायालयाने पूजा खेडकरच्या अटकेसाठी अंतरिम सुरक्षा वाढवली आहे. पूजा खेडकरला २६ सप्टेंबरपर्यंत अटक न करण्याचा निर्देश दिला. पोलिसांना देखील चौकशी करायला सांगितले आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी २६ सप्टेंबरला होणार आहे. दहा दिवसांत हा तपास पोलिसांना पूर्ण करायचा आहे. चुकीच्या कागदपत्रांच्या आधार यूपीएससीची परीक्षा देऊन फसवणूक केल्याप्रकरणी पूजा खेडकरचे आयएएस पद गेले आहे. यूपीएससीने तिच्यावर गुन्हा दाखल केला. अटकेपासून संरक्षण मिळावे, यासाठी पूजाने कोर्टाचे दार ठोठावले आहे.

### केजरीवाल यांना तूर्तास दिलासा नाहीच

**नवी दिल्ली :** उत्पादन शुल्क घोटाळ्यात तुरुंगात असलेले मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी पूर्ण झाली असून, सर्वोच्च न्यायालयाने आज निर्णय राखून ठेवला. न्या. सूर्यकांत आणि न्या. उज्ज्वल भुईया यांच्या न्यायासनासमोर आज केजरीवाल यांच्या जामीन अर्जावर युक्तिवाद झाला. केजरीवाल यांच्यातर्फे वरिष्ठ अधिवक्ता अभिषेक मनु सिंघवी यांनी तर, सीबीआयतर्फे अतिरिक्त महान्यायाभिकर्ता एस. व्ही. राजू यांनी युक्तिवाद केला.

### भंडारदरा धरणाचे नाव बदलले

**अहमदनगर :** नगर जिल्ह्याच्या उत्तर भागाची भाग्यरेखा असणारे आणि अभिजात निसर्ग सौन्दर्याचे कोंदण लाभलेले अकोले तालुक्यातील भंडारदरा धरण आता आद्य क्रांतिकारक वीर राघोजी भांगरे जलाशय म्हणून ओळखले जाणार आहे. राज्य सरकारने या धरणाचे नामकरण करण्याचा निर्णय घेतला असून आदेश जलसंपदा विभागाने जारी केला आहे.

# 'उजनी' च्या २८३ कोटींच्या पर्यटन विकास आराखड्याला मंजूरी







## कृषी, जल, निसर्ग, धार्मिक पर्यटनाला मिळणार चालना

## आ. संजयमामा शिंदे आणि जिल्हाधिकारी आशिर्वाद यांच्या प्रयत्नांना यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

जिल्ह्यासह राज्यातील पर्यटन विकासाला चालना देण्याबरोबरच स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरण परिसरातील २८२ कोटी ७५ लाख रुपयांच्या एकात्मिक पर्यटन विकास आराखड्याला गुरुवारी शिखर समितीने मान्यता दिली.

मान्यतेसाठी गेल्या ४ ते ५ महिन्यांपासून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आणि आमदार संजयमामा शिंदे यांनी प्रयत्नांची पराकाष्टा केली होती. आराखड्यात धार्मिक पर्यटनासाठी २५ कोटी, जल पर्यटनासाठी १९०.१९ कोटी, कृषी पर्यटनासाठी १९.३० कोटी, विनयार्ड पर्यटनासाठी ४८.२६ कोटी रुपयांची तरतूद आहे. सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील एकात्मिक पर्यटन विकास आराखड्यांतर्गत कोयना हेळवाक वन झोनच्या वाढीव ६७.८५ कोटी रुपयांच्या कामासह लोणार सरोवर विकास आराखड्यांतर्गत मंजूर कामांवरील वाढीव ६४.८३ कोटी रुपयांच्या मागणीला सुध्दा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली शिखर समितीने आज मान्यता दिली. या निर्णयामुळे राज्यातील पर्यटन विकासाला गती मिळणार आहे.

### सोलापूरकर जिल्हावासियांचे स्वप्न होणार साकार!

गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या महत्वाकांक्षी प्रकल्पाचा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सुक्ष्म अभ्यास केला आणि आ. संजयमामा शिंदे यांच्या सहकार्यातून हा प्रकल्प कार्यान्वित करण्याचे ध्येय ठेवले होते. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी वारंवार बैठका, मॅपिंग करून सुक्ष्म आराखडा केला होता. हा आराखडा शासनदरबारी ठेवल्यानंतर आ. संजयमामा शिंदे यांनी राजकीय वजन वापरून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून या प्रस्तावाला गती दिली आणि आता शिखर समितीने मान्यता दिल्याने येत्या काही दिवसात जीआर निघेल व विधानसभा आचारसंहितेपूर्वी किंवा आचारसंहितेनंतर सोलापूरकरांनी अनेक वर्षांपासून पाहिलेले स्वप्न साकार होणार आहे.

# महाराष्ट्रातील पाच शिक्षकांना राष्ट्रीय पुरस्कार

## राष्ट्रपतींच्या हस्ते ८२ शिक्षक सन्मानित

**वृत्तसंस्था,**
**नवी दिल्ली, ५ सप्टेंबर**

शालेय, उच्च व कौशल्य शिक्षण अधिक सुलभ आणि गुणात्मक होण्यासाठी तसेच माहिती व तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणाऱ्या महाराष्ट्रातील पाच शिक्षकांसह देशातील ८२ शिक्षकांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते 'राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारा'ने शिक्षकदिनी सन्मानित करण्यात आले.

नवी दिल्ली येथील विज्ञान भवनात या पुरस्कार वितरण समारोहाचे आयोजन करण्यात आले. यावेळी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, राज्यमंत्री जयंत चौधरी, सुकन्या मुजुमदार आदी उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्रातील पाच शिक्षकांना शालेय शिक्षण, उच्च शिक्षण आणि कौशल्य कला क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी सन्मानित करण्यात आले. शालेय विभागात गडचिरोली जिल्ह्यातील जारावंडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिक्षक मंतय्या बेडके तर कोल्हापूरच्या एस. एम. लोहिया हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालयामधील चित्रकला शिक्षक सागर बागडे तर उच्च शिक्षण विभागात पुण्यातील प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालयातील इंग्रजी विषयाच्या प्रा. डॉ. शिल्पागिरी प्रसाद, आयआयएसईआर पुणे संस्थेतील प्रा. श्रीनिवास होथा तसेच भारत सरकारच्या कौशल्य विकास आणि उद्योजगता मंत्रालयांतर्गत आयटीआय निदेशक विवेक चांदलिया या शिक्षकांचा समावेश आहे.



### मंतय्या बेडके

मंतय्या बेडके यांना २०२४ वर्षाचा शालेय शिक्षण विभागात राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. भारतातून ५० तर महाराष्ट्रातून दोन शिक्षिकांची या पुरस्कारासाठी निवड झाली आहे. बेडके यांनी गडचिरोलीच्या नक्षलग्रस्त आणि दुर्गम भागात उत्कृष्ट कार्य करत शाळेची पटसंख्या ८ वरून १३८ पर्यंत वाढवली आहे. त्यांनी लोकसहभागातून शाळेत स्मार्ट टीव्ही आणि इन्व्हर्टरसारख्या सुविधा उभारल्या आहेत. त्यांच्या अथक मेहनतीने आणि समर्पणाने गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा आदर्श निर्माण केला आहे.

# मराठवाडा होणार दुष्काळमुक्त

**मुंबई, ५ सप्टेंबर**

पश्चिम वाहिनी वैतरणा आणि उल्हास खोऱ्यातील समुद्रात वाहून जाणारे पाणी गोदावरी खोऱ्यात आणून ५५ टीएमसी पाणी मराठवाड्यात आणण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या प्रस्तावाला आज मंत्रिमंडळ बैठकीत प्रशासकीय मंजुरी देण्यात आली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर आनंद व्यक्त केला आहे.

या प्रकल्पासाठी एक समिती आपण सप्टेंबर २०१९ मध्ये गठित केली होती. मराठवाड्यातील पुढच्या पिढ्यांना दुष्काळ पहावा लागू नये, हे स्वप्न आम्ही पाहिले आणि ते पूर्ण करण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले जात आहेत, असे फडणवीस म्हणाले. २०१४ ते २०१९ या काळात मराठवाडा वॉटर ग्रीडची आखणी करण्यात आली. आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात सुद्धा या स्वप्नपूर्तीच्या दिशेने अतिशय गतीने वाटचाल केली जात आहे. या प्रकल्पामुळे मराठवाड्याला सिंचन, पिण्याचे पाणी मुलबक प्रमाणात



# लालबागच्या राजाला १६ कोटींचा मुकुट

**मुंबई :** संपूर्ण राज्यात गणपतीच्या आगमनाची जोरदार तयारी सुरू आहे. मुंबईतील गणेशोत्सव हा सर्वांना आकर्षिक करीत असतो. येथील गणेशोत्सव म्हटले की, लालबागचा राजाचे नाव सर्व प्रथम समोर येते. यावेळी लालबागच्या राजाचे आकर्षण २० किलोचा १६ कोटी रुपये किंमत असलेला मुकुट असणार आहे.

या मुकुटात पाचू आणि मीना ही रत्ने घडवलेली असून, त्याचा घेर सुमारे सहा फुटांचा आहे. रिलायन्स फाऊंडेशनने दान केलेला हा मुकूट पाहण्यासाठी सर्व भाविक उत्सुक आहेत. लालबागच्या राजाचे पहिले दर्शन घेण्यासाठी मोठी गर्दी होत असते तसेच संपूर्ण गणेशोत्सवाच्या काळात दर्शनासाठी मोठी रांग लागलेली असते.



# सहा माओवाद्यांचा चकमकीत खात्मा

**हैदराबाद :** देशात कायद्याने बंदी असलेल्या सीपीआय (माओवादी) गटाच्या सहा माओवाद्यांचा गुरुवारी पोलिसांनी चकमकीत खात्मा केला. भद्राद्री जिल्ह्यात आज सकाळी ही चकमक झडली. तेलंगणा पोलिसांच्या नक्षलवादविरोधी पथकाचे दोन कमांडो या चकमकीत जखमी झाले. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली.



# खंडोबा हे देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्यांचे दैवत : सरसंघचालक

## सामाजिक समरसतेसाठी जेजुरी देवस्थानाकडून मानपत्र प्रदान

**पुणे, ५ सप्टेंबर**

देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्यांचे दैवत म्हणजे खंडोबा. जेजुरी गडावर आल्यामुळे आज खऱ्या अर्थाने माझे देवदर्शन झाले आहे. जेजुरी गड हे समाज जागृतीचे श्रद्धा केंद्र असून यामुळेच धर्म टिकला आहे, असे गौरवोद्गार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी येथे काढले.

सरसंघचालकांनी गुरुवारी जेजुरी येथील श्री मार्तंड देव संस्थानाला भेट देत श्री खंडोबाचे दर्शन घेतले. यावेळी सरसंघचालक म्हणाले, भौतिक जगातील वैभवाबरोबरच आध्यात्मिकतेतील प्रवीणता सांगणारा आपला धर्म आहे. जेजुरी गडाच्या परिसरात परकीय आक्रमक स्वस्थपणे झोपू शकला नाही. धर्म ज्या श्रद्धेमुळे आहे, त्याची जागृती करणारे हे ठिकाण आहे. देव संस्थान आणि जेजुरी ग्रामस्थांच्या वतीने सरसंघचालकांना मानपत्र प्रदान करण्यात आले. देव, देश, धर्म टिकावा म्हणून मंदिर, पाणी आणि स्मशान या विषयांवर समरसतेचे वातावरण तयार करण्यासाठी देशभर अग्रेसर म्हणून कार्य करीत आहात. यासाठी हे मानपत्र प्रदान करण्यात आल्याचे देव संस्थानने म्हटले आहे.

!! जीवेत शरदः शतम् !!





मा.श्री.शरणजी पाटील साहेब
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा...





चेअरमन
उमरगा जनता सहकारी बँक लि., उमरगा
संचालक श्री विठ्ठलसाई सहकारी साखर कारखाना लि., मुरुम

– शुभेच्छूक –
नगर शिक्षण विकास मंडळ, मुरुम

- श्री.माधवराव पाटील महाविद्यालय, मुरुम ता.उमरगा जि.धाराशिव
- माधवराव पाटील कॉलेज ऑफ डी फॉर्मसी,
- माधवराव पाटील कॉलेज ऑफ बी.फॉर्मसी, मुरुम ता.उमरगा, जि.उमरगा
- प्रतिभा निकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, मुरुम ता.उमरगा
- प्रतिभा निकेतन विद्यालय, कोथळी * प्रतिभा निकेतन विद्यालय, भुसणी
- नुतन प्राथमिक शाळा, मुरुम
- प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कुल, मुरुम ता.उमरगा जि.धाराशिव

अंगदुखी | कणकण वाटणे | डोळे लाल होणे

यापासून बचाव करण्याकरिता अस्सल चिरायता युक्त

बैद्यनाथ नागपूर असली आयुर्वेद

महासुदर्शन काढ़ा




स्वास्थ्य रक्षक

वर्तमान स्थितीत बदलत्या वातावरणामुळे होणारे त्रास जसे - अंगदुखी, खोकला, सर्दी, हात-पाय अकडणे, तोंडाची चव कडवट होणे, भूक न लागणे, डोकेदुखी, वारंवार तहान लागणे, डोळे लाल होणे इ. त्रास दूर करण्यास महासुदर्शन काढ्याचे सेवन लाभदायक आहे.

वरील उल्लेख केलेल्या त्रासांमध्ये महासुदर्शन काढ्या सोबत महासुदर्शन घन बटी व गुडूच्यादि घन बटीचे सेवन लाभदायक आहे.

सर्व मेडिकल स्टोर्स आणि आयुर्वेदिक औषधालयात उपलब्ध. | वैद्यकीय सलाह / Customer Care: +91 844 844 4935 | www.baidyanath.co

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# टेंभुर्णीतील देशमुख बंधूंनी हाती घेतली तुतारी

## जोरदार शक्तिप्रदर्शन; प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी दिला प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ५ सप्टेंबर-**

टेंभुर्णी येथे रावसाहेब नाना देशमुख व सुरज भैय्या देशमुख यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) या पक्षात प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश केला.

यावेळी आपण माढा मतदारसंघातील सर्व मतदारांनी जसे लोकसभेला भरभरून मतदान आमच्या पक्षाला केले, येथे पन्नास हजारांचे मताधिक्य तुम्ही मिळून दिले तसेच मतदान तुतारी वाजणारा माणूस हा चिन्ह घेऊन जो उमेदवार उभा असेल त्या उमेदवारास आपण करुन विधानसभेला सर्वांनी पक्षाच्या पाठीशी उभे राहावे असे मत पक्षप्रवेशावेळी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी व्यक्त केले.

या पक्ष प्रवेशावेळी जयंत पाटील म्हणाले की,पक्षाचा अध्यक्ष या नात्याने मी रावसाहेब देशमुख व सुरज देशमुख यांचे पक्षात स्वागत करतो. रावसाहेब देशमुख यांनी माढा तालुका युवक अध्यक्ष म्हणून तेरा वर्ष काम पाहिले त्यांना राजकारण हे नवीन नाही. देशमुख बंधूंच्या राजकीय कारकिर्दीस आपल्या सर्वांच्या साक्षीने शुभेच्छा देतो. आज त्यांनी हा भव्यदिव्य दहीहंडीचा डोळ्याचे पारणे फेडणारा कार्यक्रम आयोजित केला आहे. माढा विधानसभा मतदारसंघातून मोठ्या संख्येने आपण उपस्थित राहिला आहात. आदरणीय विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखालील राज्यभरात सर्वत्र परिवर्तनाची लाट निर्माण झाली. माढा लोकसभा मतदारसंघात तुम्ही बदल घडवून आणल्या त्याबद्दल आपल्या सर्वांचे आभार. लोकसभा झाल्यानंतर सरकार जागे झाले,आणि सरकार घाबरले. घाबरलेल्या सरकारने तिजोरीचे दार उघडले नाही तर काढून बाजूला ठेवले, म्हणले त्या गोष्टी तुम्हाला देण्यास आज सरकार तयार झाले आहे. आणि हे घाबरलेले सरकार आता निवडणूका कसे पुढे ढकलता येतील यासाठी प्रयत्न करत आहे. आज महाराष्ट्रातील आमच्या लाडक्या भगिनी सुरक्षित नाहीत. महाराष्ट्रातील अनेक ठिकाणची अतिशय घृणास्पद घटना समोर येतात. या सरकारला महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था सांभाळत येत नाही हे सगळ्यात मोठे अपयश आहे. अवघ्या आठ महिन्यात महाराजांचा पुतळा कोसळला. महाराजांचा इतिहास पुसण्याचा विडाचा या सरकारने उचलेला असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

या पक्ष प्रवेश सोहळ्यास महाराष्ट्र राज्याचे म
ाजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील पाटील, अप्पासाहेब जगदाळे, बाबुराव गायकवाड, संजय कोकाटे, शिवतेजसिंह मोहिते-पाटील,अनिल सावंत, नागेश फाटे, शिवाजी कांबळे, दादासाहेब साठे, विलास देशमुख, रविंद्र पाटील, गणेश पाटील, अरुण असाबे, धनंजय डिकोळे, संजय पाटील घाटणेकर, अरुण तोडकर, भारत पाटील, बाळासाहेब पाटील, सुवर्णा शिवपूजे, रत्नप्रभा जगदाळे, ऋतुजा सुर्वे, मयुर काळे यांच्यासह महाविकास आघाडीतील सर्व मान्यवर उपस्थित होते.

### घडलो तर लाख... नाही तर राख!

मला व रावसाहेब नानांना आपण आपल्या पक्षात प्रवेश दिल्याबद्दल आभार व्यक्त करतो. मी देशमुख आणि कंपनीच्या संचालकपदाचा राजीनामा घेऊन पूर्ण वेळ समाजासाठी व पक्षासाठी देण्यासाठी कटिबद्ध आहे. घडलो तर लाख नाही तर राख, पण राख जरी झालो तरी यातून एका जरी तरुणांना प्रेरणा मिळाली तर आयुष्य सार्थक लागले असे समजूनच आजपासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) या पक्षासाठी आयुष्यभर संपूर्ण ताकदीने काम करत राहणार आहे. माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्यांच्या पक्ष प्रवेशासाठी जयंत पाटील उपस्थित राहिले यांचे ऋण आयुष्यभर माझ्यासाठी राहणार आहे. **- सूरज देशमुख**

## संक्षिप्त वृत्त




### सुदीप चाकोते यांनी काँग्रेसचे प्रभारी रमेश चेट्टीनाला यांची घेतली भेट

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

दोन महिन्यात येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकांच्या नियोजनासंदर्भात पुणे येथे झालेल्या विभागीय बैठकीत येथील भावी आमदार सुदीप चाकोते यांनी महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेट्टीनाला यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार केला. काँग्रेसला सोन्याचे दिन येण्यासाठी जीवाचे रान करण्याची ग्वाही श्री. चाकोते यांनी दिली. यावेळी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस पक्षाचे विधिमंडळ गटनेते बाळासाहेब थोरातजी, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, खासदार प्रणिती शिंदे, नसीम खान, माणिकराव ठाकरे आणि मान्यवर नेते उपस्थित होते. यावेळी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या वाढदिवस निमित्त सुदीप चाकोते यांनी सत्कार केला. याप्रसंगी नूरअहमद नलवार, रजाक कादरी, श्रीकांत दीसर, चंद्रकांत टिके, हनुमंत रुपनवरे जब्बार शेख, श्रीशैल खरे, उमेश भगवंती, मशक मुल्ला, अभिषेक अच्छीबोटला, सचिन बोराडे व काँग्रेस सेवादल यंग ब्रिगेडचे कार्यकर्ते उपस्थित होते.

### विनापरवाना आंदोलन; ७० जणांवर गुन्हा

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

काँग्रेस भवन जिल्हा परिषद कार्यालयाजवळील सिद्धेश्वर पेठ येथे कोणतीही परवानगी न घेता विनापरवाना आंदोलन करून पोलिसांनी दिलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष करत आदेशाचा भंग केल्याप्रकरणी ७० जणांविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना ४ ते ५ सप्टेंबर रोजी काँग्रेस भवन जिल्हा परिषद कार्यालयाजवळ सिद्धेश्वर पेठ येथे घडली. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल संदीप माधवराव गुट्टे (नेमणूक जेलरोड पोलीस ठाणे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अरविंद घोडके,सतीश अर्जुन बनसोडे,सुरज बचाटे,शरद बिराजदार,बाळू त्रिकोळे,शंकर जाधव,आपण्णा कडमसे,बसवराज कडमसे,बालाजी कुलकर्णी (सर्व. रा.मु. पो.अणदूर,ता.तुळजापूर) यांच्यासह ७० जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोसई.जाधव हे करीत आहेत.



### आ. रामभाऊ सातपुते यांचा उत्कृष्ट संसदपटू म्हणून गौरव

**पिलीव, दि. ५ सप्टेंबर-**

माळशिरसचे आ. रामभाऊ सातपुते यांना राष्ट्रकुल संसदीय शाखेतर्फे २०२३-२४ या वर्षाकरीता उत्कृष्ट संसदपटू म्हणुन राष्ट्रपती द्रोपदी मूर्म यांच्या हस्ते सन्मानित करणयात आले. आ. रामभाऊ सातपुते यांचा राजकीय प्रवास थक्क करणारा आहे. ऊसतोड मजुराचा मुलगा ते आमदार. ते खरेतरे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माधयमातून तावून सुलाखून निघाले. २०१९ ला आमदार झाल्यानंतर दूध उत्पादकासह विविध विषयांवर त्यांनी सभगृहात आवाज उठविला. विकासासाठी निधी, उपचारासाठी मदत केली. यामुळे त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी राज्यपाल सी. पी. राधाकृषणन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, विधानपरिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे, नरहरी झिरवाळ, अंबादास दानवे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



### राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा गहिनीनाथ महाराज औसेकरांनी केला सन्मान

**पंढरपूर, दि. ५ सप्टेंबर-**


तळवेस (ता. उदगीर, जि. लातूर) येथील परिसरात उभारण्यात आलेल्या विश्वशांती बुध्द विहाराचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते बुधवारी (ता.४) लोकार्पण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू लातूर जिल्ह्यात आल्या होत्या. यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा लातूरचे सुपुत्र तथा अध्यक्ष नाथ संस्थान औसा जि लातूर तसेच श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी श्री विठ्ठल रूक्मिणी मातेची मुर्ती व उपरणे देऊन सन्मान केला. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, क्रिडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांचाही सन्मान यावेळी औसेकर महाराज यांनी केला.

# मांगीजवळ मालवाहतूक ट्रक पेटला

## करमाळा-नगर महामार्गावरील घटना; चालक, क्लिनर किरकोळ जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ५ सप्टेंबर-**

करमाळा-अहमदनगर महामार्गावर म ांगी तालुका करमाळा येथील पुलाजवळ अचानक एक ट्रकने पेट घेतला. यामध्ये ट्रक जळून खाक झाली आहे.



ट्रकचालक व क्लिनर किरकोळ जखमी झाले असून या घटनेनंतर दोघांनीही ट्रकम धून उड्या टाकल्या.पोलिसांना ही माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी भेट दिली व अग्निशमनगाडी बोलवून आग आटोक्यात आणली गेली प्राथमिक माहितीनुसार ही ट्रक करमाळ्यावरून अहमदनगरकडे जात होती करमाळा शहरातून पुढे आल्यानंतर मांगी जवळच्या पुलावर ट्रक येताच पेटली. मिळालेल्या माहिती नुसार ट्रक मध्ये मोठा स्फोट झाला त्यामुळे ट्रक पेटली. त्यावेळी चालक आणि ट्रक क्लिनर यांनी तातडीने गाडी थांबवून ट्रक मधून खाली उड्या टाकल्यानंतर पोलिसांना माहिती मिळताच पोलीस नाईक हिंगमीरे, जगताप, हवलदार शेख, कॉन्स्टेबल पवार, कांबळे यांनी घटनास्थळी भेट दिली. मात्र अग्निशामक दलाची गाडी येण्यास बराच उशीर झाल्याने या मार्गावरील वाहतूक मोठ्या प्रमाणात खोळंबली होती. त्यानंतर आग आटोक्यात आली सदर प्रकरणाचा तपास करमाळा पोलीस स्टेशन करत आहे.

# बार्शी नगरपालिकेला १० कोटी, तालुक्याला २ कोटी मंजूर

## महाराष्ट्र शासनाच्या वैशिष्ट्यपूर्ण योजना, २५/१५ योजनेतून तरतूद

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ सप्टेंबर-**

महाराष्ट्र शासनाच्या वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत बार्शी नगरपालिकेला विविध विकास कामे करण्यासाठी १० कोटी व तालुक्यात २५/१५ योजनेअंतर्गत सभागृह बांधण्यासाठी २ कोटी मंजूर झाल्याची माहिती आमदार राऊत यांनी पत्रकार परिषदेत दिली.

आमदार राजेंद्र राऊत यांच्या प्रयत्नामुळे बार्शी नगरपालिकेला विविध विकास कामे करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून प्रभाग क्र.१,३,७,१४, १६,१७,२० मधील रस्ते डांबरीकरण,खडीकरण व आरसीसी गटार करणे यासाठी १० कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे.ग्रामीण भागातील गावांतर्गत म ुलभूत सुविधा पुरविणे (२५१५ १२३८) या योजनेंतर्गत घाणेगाव येथे हनुमान मंदिर समोर सभामंडप बांधणे २० लाख,धोत्रे येथे समाज मंदिर बांधणे २० लाख, खामगाव येथे सभामंडप बांधणे ३० लाख, उपळे दुम ाला येथे संत सावतामाळी मंदिर येथे सभामंडप बांधणे २० लाख, पांगरी येथे समाज मंदिर बांधणे २५ लाख, कांदलगाव येथे मारुती मंदिर समोर सभामंडप बांधणे २५ लाख, जोतिबाचीवाडी येथे रामगिरी महाराज येथे सभामंडप बांधणे २५ लाख, दहिटणे येथे तुकाई येथे सभामंडप बांधणे १२ लाख, खामगाव येथे दलित वस्तीमध्ये समाज मंदिर बांधणे १२ लाख, जोतिबाची वाडी येथे हनुमान मंदिर समोर सभामंडप बांधणे ११ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. बार्शी शहर व तालुक्याच्या विकासासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून आमदार राजेंद्र राऊत नेहमी बार्शी शहर तालुक्यातील जनतेला नागरी सुविधा देण्याकरिता तत्पर व कटीबद्ध आहेत.



# शील, परिवर्तनशील, गतिशील समाजासाठी शिक्षक केंद्रबिंदू

## प्रा. राहुल पालके : शिवाजी महाविद्यालयात गटचर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ सप्टेंबर-**

शील, परिवर्तनशील, गतिशील समाजासाठी शिक्षक केंद्रबिंदू असल्याचे प्रतिपादन प्रा. राहुल पालके यांनी केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाकरिता बी.ए.भाग- १ व बी. एस्सी भाग- ३ या वर्गांसाठी आयोजित केलेल्या गट चर्चेत प्रा. राहुल पालके बोलत होते. शिक्षक दिनाचे औचित्य साधून सदर गट चर्चेचा विषय समाजातील शिक्षकांचे कार्य व बदलती भूमिका हा निवडला होता. याप्रसंगी पालके सरांनी नव शिक्षण प्रणालीचा संदर्भ देवून पारंपरिक ते आधुनिक शिक्षणपद्धती उहापोह केला. त्यासाठी विद्यार्थ्यांचे तीन गट तयार करुन त्यांना अनुक्रमे एकलव्य, अर्जुन व गुगल अशी नावे देण्यात आली. विद्यार्थ्यांना या विषयासंबंधात तयारी करण्यासाठी वेळ देण्यात आला. इंग्रजी व मराठी भाषेत प्रत्येक गटाने आपली मते मांडली. एकलव्य गटाने शिक्षकांच्या विषयज्ञानासंदर्भात चर्चा करीत शिक्षकांविषयी इतर विषयावर विधिमंडळात झालेल्या चर्चेवर भर दिला. शिक्षकांची होणारी आंदोलने व त्याची कारणे प्रस्तुत केली. शिक्षकांचे विद्यार्थीभिमुख व समाजाभिमुख स्थान यावर भाष्य केले. संघ अर्जुनने शिक्षक होणे ही समाजहितासाठी देणगी असल्याचे सांगत ज्ञानाधारित घटकांची चर्चा संयम व आत्मविश्वास याच्या जोरावर शिक्षकी पेशातून समाज परिवर्तनाचे काम घडून येत असल्याचे मत प्रकट केले. त्याचबरोबर काही ठिकाणी शिक्षक होण्यासाठी दिली जाणारी देणगीही अमाप असल्याचे मत प्रकट केले.टीम गुगलने ज्ञान आणि तंत्रज्ञान याच्या सुरेख समन्वयातून सज्ञान समाजाची निर्मिती करता येते हे सांगितले. त्याचबरोबर अज्ञानाची व अंधश्रध्देची पाळेमुळे खणून काढण्यासाठी पारंपरिकता व आधुनिकतेचा सुरेख संगम साधून ज्ञानगंगा प्रवाही ठेवण्याचे कार्य शिक्षकांचे असल्याचे सांगितले. समाजव्यवस्थेत पारदर्शकता आणण्यासाठी शिक्षकाने सजग राहिले तर जग बदलण्याची हिंमत तो करु शकतो, असे मत मांडले. तिन्ही गटांनी विविध उदाहरणातून शिक्षकांबरोबर समाज शिक्षकांची भूमिका स्पष्ट केली. आयुष्याला कलाटणी देणाऱ्या काळात शिक्षकांचे बहुमूल्य मार्गदर्शन मिळाल्यास जीवनाला दिशा मिळते असा त्यांचा गट चर्चेचा रोख होता. शिक्षकांचे कार्य बहुमूल्य व बहुअंगी असून त्याचे स्वरुप ज्ञानप्रवाही असेल तर तो जग बदल घालुनि घाव सांगून गेले मज भीमराव हे वाक्य जाणू शकतो व पूर्णत्वास नेऊ शकतो. शील, परिवर्तनशील व गतिशील समाजासाठी शिक्षक केंद्रबिंदू ठरतो, असे मत पालके यांनी या गट चर्चेतून मांडले.




### विद्यार्थ्यांची भूमिका स्पष्ट

या गटचर्चेतून कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या भूमिका लक्षात आल्या व पण त्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांचे विश्वही समजून घेण्यात आले. प्राचार्य डॉ. ए. बी. शेख, कला शाखा समन्वयक डॉ. बी. डी. पारसे व इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. समाधान पवार यांनी गट चर्चेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करीत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### शेतात काम करताना तरुणाला विंचू दंश

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

सोरेगाव परिसरातील शेतात काम करताना उजव्या पायाला आणि बोटाला विंचू दंश केल्याची घटना चार सप्टेंबरला घडली. यात अमित कुमार (वय-२२, रा. सोरेगाव ता. द. सोलापूर) हा तरुण जखमी झाला. (उपचारासाठी सिव्हिलमध्ये मित्र सुनिल तिवारी याने दाखल केले.

### पाठीमागून बैल मारल्याने युवक जखमी

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

ओम शांती बिअर शॉपीच्या बाजूला थांबले असताना अचानक पाठीमागून बैल मारल्याची घटना ४ सप्टेंबर रोजी घडली यात विवेक रमेश वंगा (वय-२३,रा.ताई चौक)हा जखमी झाला.उपचारास सिव्हिलमध्ये मित्र गणेश नायकवाडी याने दाखल केले.

**जाहीर नोटीस**

यात मी हाफिजनूरमोहम्मद मदारसाहब शेख, रा. गाळा नं. ३९२, गाडेगांव रोड, खाजा नगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर जाहीर करतो की, माझ्या जुन्या पासपोर्ट वर माझे नांव हाफिजनुर मोहम्मद मदारसाहब शेख असे आहे. तसेच माझ्या आधारकार्ड वर माझे नांव हाफिजनूरमोहम्मद मदारसाहब शेख असे नमूद आहे. हाफिजनूरमोहम्मद मदारसाहब शेख व हाफिजनुर मोहम्मद मदारसाहब शेख या दोन्ही नावाची व्यक्ती मीच आहे. असे प्रतिज्ञापत्र ॲफिडेव्हिट नं. ७६८/२०२४ अन्वये केलेले आहे.

**सही/-**
**हाफिजनुरमोहम्मद मदारसाहब शेख,**
**गाळा नं. ३९२, गाडेगांव रोड,**
**खाजा नगर, बार्शी,**
**ता. बार्शी, जि. सोलापूर**

# भारतात अनेक सिंगापूर बनवायचे : नरेंद्र मोदी

**वृत्तसंस्था,**
**सिंगापूर, ५ सप्टेंबर**

सिंगापूर हा केवळ मित्र देश नाही तर, प्रत्येक विकसनशील देशासाठी प्रेरणा आहे. भारतातही अनेक सिंगापूर निर्माण करायचे आहेत. या दिशेने एकत्रित प्रयत्न करीत आहोत, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.

पंतप्रधान मोदी दोन दिवसांच्या सिंगापूर दौऱ्यावर आहेत. मोदींनी सिंगापूरच्या पंतप्रधानांना सांगितले की, तुम्ही पंतप्रधानपद स्वीकारल्यानंतर ही आपली पहिली भेट आहे. करारानुसार, दोन्ही देश अर्धसंवाहक, क्लस्टर डेव्हलपमेंट, सेमीकंडक्टर डिझाइनिंग आणि मॅन्युफॅक्चरिंगवर लक्ष केंद्रित करतील.

**भारत आणि सिंगापूरदरम्यान करार**

● दोन्ही देश डिजिटल तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सहकार्य करतील ● डीपीआय, सायबर सुरक्षा, ५-जी, सुपर कॉम्प्युटिंग, क्वांटम कॉम्प्युटिंग आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स यासारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानासारख्या डिजिटल तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सहकार्य ● कामगारांचे कौशल्य वाढवण्यासाठी आणि डिजिटल डोमेनमध्ये काम करणाऱ्या लोकांच्या कौशल्यांमध्ये सुधारणा करण्यासाठी करार ● भारताच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानेही सेमीकंडक्टर इकोसिस्टम मजबूत करण्यासाठी सिंगापूरसोबत करार केला. या अंतर्गत देशात सेमीकंडक्टर क्लस्टर तयार केले जातील आणि लोकांना सेमीकंडक्टर डिझाईन व उत्पादनाचे प्रशिक्षण दिले जाईल



**श्री ब्रह्म प्रतिष्ठान, सोलापूर**
मो.नं. ७७०९०८०७२१ दि. २८/०८/२०२४

**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

ब्रह्म प्रतिष्ठान, विजापूर रोड, सोलापूर या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २२/०९/२०२४ रोजी सायं ५:०० वाजता श्री. सुहास ना. देशपांडे ३४. ब्रह्मचैतन्य सोसा., विजापूर रोड सोलापूर-४१३००४ येथे आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

**✻ सभेपुढील विषय**

१) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृतांत वाचून कायम करणे.
२) सन २०२३-२४ सालचा वार्षिक ताळेबंद, उत्पन्न खर्च पत्रक मंजूर करणे.
३) दि. ३१/०३/२०२४ अखेर कार्यकारिणी मंडळाने सादर केलेल्या अहवालास मंजुरी देणे.
४) सन २०२३-२४ सालच्या ऑडिट रिपोर्टची नोंद घेणे.
५) सन २०२४-२५ साला करिता लेखा परीक्षकाची नियुक्ती करणे.
६) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

**सही/-**
**श्री. संजय भा, गोखले**
**सचिव**
**विश्वस्त मंडळाचे आदेशावरून**

**विशेष सूचना-**

१) गणसंख्ये अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी सभा अर्ध्या तासाने घेण्यात येईल. अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.
२) ज्या सभासदांना काही सूचना, प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी दि. १७/०९/२०२४ पूर्वी लिखित स्वरुपात संस्थेकडे आणून द्यावेत. (फो.क्र. ७७०९०८०७२१)
३) वार्षिक ताळेबंद, उत्पन्न खर्च पत्रक सभासदांच्या माहितीसाठी संस्थेच्या कार्यालयात पाहण्यास उपलब्ध आहेत. (वेळ सायं-४ ते ६)

**(टीप- संस्थेतर्फे वधु-वर पुस्तिका प्रकाशित करण्यात येणार आहे. त्याची तारीख लवकरच जाहीर करण्यात येईल, तरी पालकांनी व इच्छुक वधूवर नोंदणी संस्थेकडे त्वरित करावी.)**

# पुतळा बनवणाऱ्या आपटेच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**कल्याण दि.५ सप्टेंबर-**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राजकोटवरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा कोसळल्या प्रकरणातील प्रमुख फरारी शिल्पकार जयदीप आपटे (वय २४) याला तब्बल १० दिवसानंतर पोलिसांना मुसक्या आवळण्यात यश आले. बुधवारी रात्री त्याला कल्याणच्या उपायुक्त पथकाने कल्याण येथे पकडले. तो घरातील सदस्यांना तो भेटण्यासाठी आला असता त्यांच्यावर अटकेची कारवाई करण्यात आली असल्याचे सांगून सिंधुदुर्ग पोलिसांच्या ताब्यात दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

मात्र आपटेच्या वकीलांनी त्याने आत्मसमर्पण केल्याचा दावा केला आहे.त्यामुळे अटक की आत्मसमर्पण अशी चर्चा रंगली आहे. दरम्यान सिंधुदुर्ग पोलीस जयदीप आपटेला घेऊन सिंधुदुर्गसाठी रवाना झाले असून उद्या स्थानिक न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. गेल्या वर्षी चार डिसेंबरला पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते राजकोट




किल्ल्यावरील नौदलाने उभारलेल्या शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण झाले होते . त्यानंतर अवघ्या आठ महिन्यातच म्हणजे २६ ऑगस्टला २८ फुटी पूर्णाकृती पुतळा कोसळल्यानंतर देशभरातील शिवप्रेमींत संतापाची लाट उमटलेली. महाविकास आघाडीने त्याच्या निषेधार्थ सरकार विरोधात जाडो मारो आंदोलन पुकारले होते.या घटनेबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या आठवड्यात पालघर येथे झालेल्या सभेत जाहीरपणे माफी मागितली होती.मात्र शिल्पकार जयदीप आपटे व बांधकाम सल्लागार चेतन पाटील सापडत नसल्याने कोल्हापूर इथून अटक करण्यात आली होती. मात्र हा पुतळा ज्याने बनवला तो जयदीप आपटे मात्र फरार झाला होता. तो पोलीसांच्या हाती लागत नव्हता. त्यामुळे शिवप्रेमींची नाराजी कायम होती. ३ दिवसांपुर्वी चेतन पाटील याला कोल्हापूर पोलिसांनी अटक केली होती.त्यानंतर आपटेला पकडण्यासाठी विविध पथके तयार केली होती. त्याच्या विरोधात लूक आऊट नोटीस देखील काढण्यात आली होती. अखेर जयदीपला कल्याण डीसीपी पथकाने त्याच्या घराजवळच्या परिसरातून ताब्यात घेतले. जयदीप आपटे आपल्या कुटुंबीयांना भेटण्यासाठी बुधवारी रात्री घरी येणार असल्यची माहिती कल्याणचे उपायुक्त सचिन गुंजाळ यांना मिळाली होती. त्यानंतर सापळा रचून साडेदहाच्या सुमारास बाजारपेठ पोलिसांनी पकडले . त्यानंतर त्याला उपायुक्त कार्यालयात नेण्यात आले गुंजाळ यांनी चौकशी केल्यावर त्याला सिंधुदुर्ग पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. आपटेचे वकील गणेश सोवनी यांनी जयदीप आपटे याला अटक झालेली नाही त्याने पोलीसांसमोर समर्पण केले आहे, असे ही त्यांनी सांगितले. पुतळा कोसळल्यानंतर घाणेरडे राजकारण सुरू झाले होते. पुतळा कोसळल्याच्या सर्व घटनेचा दोष जयदीप याच्या माथी मारला जात आहे. हा सर्व प्रकार पाहून आपटे याने आत्मसमर्पण केल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### आपटेला १० सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी

सिंधुदुर्ग पोलिसांचे पथकाने जयदीप आपटेचा ठाणे पोलिसांकडून ताब्यात घेतल्यानंतर सकाळी मालवणला पोहोचले. त्याला जिल्हा न्यायालयात हजर केले असता १० सप्टेंबरपर्यत पोलीस कोठडी सुनावण्यात आली. त्याच्याकडे पुतळा बनविताना कोणते धातू वापरले, त्यासाठी कोणी सूचना दिल्या होत्या, गडबडीत पुतळा बनवण्याची कारणे काय?कोणाची परवानगी घेतली होती?, याबाबत तपास करण्यात येणार आहे, असे सांगण्यात आले.



सोलापूर : दैनिक तरुण भारतच्या मुख्य संपादकपदी पदोन्नती झाल्याबद्दल प्रशांत माने यांचा सन्मान करताना सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर संघाचे अध्यक्ष राजू राठी, मानद सचिव धवल शहा आदी.



सोलापूर : दैनिक तरुण भारतच्या मुख्य संपादकपदी पदोन्नती झाल्याबद्दल प्रशांत माने यांना शुभेच्छा देताना जी.एम. मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब वाघमारे, शशिकांत उर्फ पप्पू गायकवाड, संजय पोळ, हर्षवर्धन बाबरे, वृत्तसंपादक अजित संगवे.



## बिग्सीच्या प्राचार्यपदी डॉ.देशमाने

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ५ सप्टेंबर-**

कै. सुशीला ताई गायकवाड बहुउद्देश संस्था केगाव सोलापूर संचलित भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयच्या प्राचार्य पदी डॉ. अनिल देशमाने यांची संस्थेने निवड केली आहे.

यावेळी मावळते प्रभारी प्राचार्य डॉ. सय्यद जिलानी पाशा यांच्याकडून पदभार स्वीकारला या कार्यक्रम प्रसंगी प्रो.डॉ. सचिन देठे यांनी नवीन प्राचार्य यांच्या परिचय करून दिले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष रवींद्र डी गायकवाड सचिवा अनामिका रवींद्र गायकवाड यांनी नवीन प्राचार्य यांना शुभेच्छा दिल्या या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते डॉ. अनिल देशमाने यांच्या प्राचार्य म्हणून पंधरा वर्षाच्या अनुभवी असून त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्निकल विद्यापीठ मान्यता प्राप्त प्राचार्य म्हणून दहा वर्षे कार्यकाळ सांभाळले तसेच इंजिनिअरिंग साठी सात पुस्तके लिहिली आहे. आणि त्यांनी राष्ट्रीय आणि जागतिक पातळीवर पेपर पब्लिश केले असून त्यांनी आय. इ.टी.इ. आणि आय. ई असोसिएशनची सदस्य आहे तसेच त्यांच्या मार्गदर्शनाखाली पीएचडी चे दोन विद्यार्थी पदवी प्राप्त केले आहे या कार्यक्रमास सर्व एचओडी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते



## जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग राजपूत यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ५ सप्टेंबर-**

सोलापूर बार असोसिएशन तर्फे जिल्हा सरकारी वकील ॲड प्रदीपसिंग मोहनसिंग राजपूत यांना सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत दोन हात करत वकिली शिक्षण पूर्ण केले. सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालयात सन १९९६ पासून वकिली व्यावसायास सुरवात केली तसेच सोलापूर बार असोसिएशनचे माजी उपाध्यक्ष व खजिनदार म्हणून काम पहिले. शिक्षेचे प्रमाण वाढवण्यात अभुतपूर्व यश मिळवले.

सहा वर्षाच्या जिल्हा सरकारी वकील कार्यकाळात १०० जन्मठेप व दोन फाशी शिक्षा पोहोचवण्याचा विक्रम केला व सोलापूर बार असोसिएशनची नावलौकिकता वाढवली. वकिली व्यवसायासोबत सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले जिल्हा सरकारी वकील यांनी गुन्हे अन्वेषणाच्या क्षेत्रात नवी दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. वकिली व्यवसायासोबत दयानंद विधी महाविद्यालयातून विद्यार्थ्यांना देखील घडविले. त्यांचा कार्याचा दखल घेवून व वकिली व्यावसाय करणाऱ्या बंधु बघीनींना प्रेरणा मिळावी या उद्देशाने सोलापूर बार असोसिएनसच्या वतीने ॲड. राजपुत यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. हा सन्मान सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. अमित व्हि आळंगे, उपाध्यक्ष ॲड. व्ही. पी. शिंदे, सचिव ॲड मनोज पामुल, खजिनदार ॲड विनय कटारे यांचा वतीने करण्यात आला.

ॲड आळंगे, ज्येष्ठविधीज्ञ ॲड महेश अग्रवाल , ॲड व्ही एस आळंगे , ॲड शैलजा क्यातम, ज्येष्ठविधीज्ञ ॲड महेश अग्रवाल यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

सत्काराला उत्तर देताना ॲड. राजपूत यांनी म्हणाले, आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आव्हानाशी लढलो व प्रामाणिकपणे काम करीत राहिलो म्हणूनच मला समाजातील अन्याय झालेल्या कुटुंबांना न्याय देता आले. ज्या कुटुंबात माझ्या वकिली व्यवसायास सुरुवात केलो त्या कुटुंबाने म्हणजेच सोलापूर बार असोसिएशनने माझ्या कार्याची दखल घेऊन माझा सन्मानपत्र देऊन गौरव केला म्हणून सोलापूर बार असोसिएशनच्या सर्व वकील बांधवांचे आभार मानले.

सदर कार्यक्रमास जेष्ठ विधिज्ञ ॲड हिरालाल अंकलगी, ॲड सुनिल शेळगीकर, ॲड. खतीब वकिल, ॲड. लक्ष्मण माराडकर, साह्य. सरकारी वकिल ॲड. माधुरी देशपांडे, ॲड. अल्पना कुलकर्णी, ॲड. सौ बुजरे , ॲड शितल डोके, ॲड प्रकाश जन्नु , ॲड आनंद कुर्डुकर, सौ बागल सह असंख्य वकिल बंधु बघिनी उपस्थित होते. कार्यक्रमात सन्मान पत्राचे वाचन खजिनदार ॲड विनय कटारे, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिव ॲड मनोज पामुल व आभार प्रदर्शन सह सचिवा ॲड निदा सैफन यांनी केले.

## खात्यांतर्गत पीएसआयसाठीची मुख्य परीक्षा डिसेंबरमध्ये घ्या

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.५ सप्टेंबर-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत खात्यांतर्गत विभागीय पोलीस उपनिरीक्षक परीक्षा - सन २०२३ ची पूर्वपरीक्षा झाली असून मुख्य परीक्षा नजीकच्या काळात प्रस्तावित असल्याचे समजते.



सध्याचा सार्वजनिक गणेशोत्सव आणि त्यापुढे नवरात्रौत्सव, दिवाळी तसेच आगामी कालावधीत होणाऱ्या विधानसभेच्या निवडणूकामुळे मुख्य परीक्षा निवडणूकीनंतर घेण्यात यावी, अशी मागणी विधानसभा अध्यक्ष ॲड. . राहुल नार्वेकर यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे केली आहे. त्याबाबत आज आयोगाला पाठविलेल्या पत्रात नार्वेकर यांनी वरील वस्तुस्थितीकडे लक्ष वेधले असून पोलीस कर्मचारी वर्ग, एसआरपीएफ जवान यांना उपरोक्त प्रसंगी बंदोबस्तासाठी तैनात केले जाते. त्यामुळे परिक्षेस बसलेल्या उमेदवारांना परीक्षेची तयारी करण्यास पुरेसा वेळ मिळणार नाही. सबब, ही परीक्षा डिसेंबर, २०२४ मध्ये घेण्यात यावी, असे म्हटले आहे.

## उद्योग बँक, रोटरी क्लब सोलापूर एमआयडीसीतर्फे व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ५ सप्टेंबर-**

उद्योग बँक माजी सेवक सांस्कृतिक मंडळ-रोटरी क्लब सोलापूर एमआयडीसीच्या सहकार्याने यंदा डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात ८ ते १६ सप्टेंबर पर्यंत सायंकाळी ६.३० वाजता व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष कालिदास मानेकरी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

८ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे प्रशासनातून देश सेवा या विषयावर व्याख्यान होणार आहे. ९ रोजी, मुंबई येथील व्याख्याते व्यंकटेश कैरमकोंडा ( इथेच रुजवू या आपली कौशल्य), १० रोजी, अहमदनगर येथील व्याख्याते डॉ. गिरीश कुलकर्णी (प्रेरणांना प्रतिसाद), ११ रोजी हैदराबाद येथील व्याख्याते जगन गुरुजी ( कुटुंबमुः अध्यात्मिका जीवनम् मरियु नैतिका विलूवलु), १२ रोजी मुंबई येथील प्रकाश सप्रे यांचा सप्रेम नमस्कार हा एकपात्री विनोदी कार्यक्रम, १३ रोजी पुण्यातील व्याख्यात्या संज्योत देशपांडे (महिलांचे मानसिक आरोग्य), १४ रोजी पुण्यातील व्याख्याते भूषण केळकर (धोके आणि संधी), १५ रोजी मुंबई येथील ज्येष्ठ पत्रकार उदय निरगुडकर (उत्कृष्टतेच्या शोधात), १६ रोजी नांदेड येथील व्याख्याते डॉ नंदू मुलमुले (वडीलधारी पिढी म्हणजे जुने फर्निचर नव्हे) या विषयांवर व्याख्यान होणार आहे. या पत्रकार परिषदेस यल्लादास लचमापुरे, गणेश इराबत्ती, नरसिंग कनकी, स्वामीनाथ कलशेट्टी, अंबादास गड्डम , व्यंकटेश बिटला आदी उपस्थित होते.

## पैसे गुंतवण्यास सांगून ४६ लाखाला फसवले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ५ सप्टेंबर-**

व्यवसायात पैसे गुंतवणूक करून नफ्यातील ५० टक्के रक्कम देतो म्हणून ४६ लाखाला फसवणूक केल्याची घटना जुन २०२३ ते सप्टेंबर २०२३ दरम्यान घडली. याप्रकरणी इस्माईल राहअहमद शेख (वय-३८,रा.जॉबवीर ऑफ हाउसिंग सोसायटी,मुस्लिम पाच्छा पेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून इस्माईल अ.सत्तार कुरेशी (रा.मुस्लीम पाच्छा पेठ) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस निरीक्षक बिराजदार हे करीत आहेत.

## गुंतवणूकदारांची आर्थिक फसवणूक प्रकरणातील दोन महिलांना अटक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ५ सप्टेंबर-**

श्रीगणेश फायनान्स व संत सेवालाल निधी लिमिटेड मार्फत सोलापूरातील गुंतवणुकदार यांची फसवणुक केलेल्या संशयित आरोपींपैकी दोन महिला संशयित आरोपींना गुरुवारी दुपारी बारा वाजले सुमारास हैदराबाद रोडवरून आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली असून,सोमवार पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

या घटनेची हकीकत अशी की,फिर्यादी योगेश नागनाथ पवार (रा.धुम्मा वस्ती) यांची जिल्हा परिषदेत जून २०२२ रोजी संशयित आरोपी शिवाजी गोपाळ जाधव यांचेशी ओळख झाली होती.फिर्यादीने पन्नास हजाराची गुंतवणूक केली. परंतु संशयित आरोपीने त्यांना निधी बँकेच्या ठेव बुकमधील ७५६ क्रमांकाच्या पावतीवर ठेव पावती दिली.आणि ऑक्टोबर २०२२ पासून डिपॉझिटवर महिना ५०० रूपये प्रमाणे परतावा देण्याचा शब्द दिला.त्यानंतर फिर्यादी यांना पैशाची गरज असल्याने फिर्यादीने आरोपीस परतावा रक्कमेची मागणी केली असता,ठेव रक्कम परत न देता फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखा,सोलापूर शहर येथे सुरु आहे.

या गुन्ह्यात ७५ गुंतवणुकदार यांची ४ कोटी १६ लाख ७६ हजार फसवणुक केली असल्याचे निष्पन्न झाले आहे.या गुन्ह्यातील संशयित आरोपी सुनिता शिवाजी जाधव, (वय-५२,रा.साफल्य नगर, सैफुल,विजापूर रोड,सोलापूर), पुजा सचिन जाधव (वय-२८,रा. साफल्य नगर, सैफुल, विजापूर रोड,सोलापूर) या गुन्हा दाखल झाल्यापासुन, गुन्ह्यात स्वतःची अटक टाळण्याकरिता परागंदा झाले होते. गुप्त बातमीदारांमार्फत मिळालेल्या माहितीवरुन या दोन्हीं महिला संशयित आरोपी यांना फानुस हॉटेल, हैद्राबाद रोडवरुन पोलीस महिला अंमलदार यांचे मदतीने गुरुवारी दुपारच्या सुमारास ताब्यात घेऊन अटक केली.हि कामगिरी पोलीस आयुक्त एम.राजकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शहाजी पवार, पोलीस हवालदार काशिनाथ धारसंगे, राजेश पुणेवाले, स्नेहा किणगी, जे.एन. गुंड, परशुराम लांबतुरे यांनी केली आहे.

## राज्यातील मल्टीमीडिया पत्रकारांमुळेच खरी पत्रकारिता टिकून आहे : राजा माने

**तभा वृत्तसेवा,**
**अहमदनगर, दि. ५ सप्टेंबर-**



लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणुन ओळखला जाणारा पत्रकार आज खऱ्या अर्थाने या समाज माध्यमामुळेच जणसामान्यांपर्यंत पोहोचत आहे, जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात आणि तालुक्यातील प्रत्येक गावपातळीवरच्या वंचित शोषित आणि पीडितांचा बुलंद आवाज बनला आहे. ही आहे डिजिटल इंडियाची डिजिटल पत्रकारिता काळाची आवश्यकता आहे, असे मक महाराष्ट्र राज्य डिजिटल मीडिया पत्रकार संघाचे अध्यक्ष राजा माने यांनी व्यक्त केले.

एनटीव्ही न्युज मराठीचा २२व्या वर्धापन दिनानिमित्ताने आयोजित सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी खासदार निलेश लंके, आमदार संग्राम जगताप, जेष्ठ विधिज्ञ ॲड. सुभाष काकडे, व्याख्याते संजय कळमकर, अहमदनगर प्रेस क्लब माजी अध्यक्ष नंदकुमार सातपुते, डिजिटल मीडिया सचिव महेश कूगावकर आणि एन टीव्हीन्युजचे सर्वेसर्वा संपादक इकबाल शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

टीव्ही चॅनल्सची जागा इंटरनेटने घेतली आणि इंटरनेटवर सोशल मीडियाने कब्जा केला आहे, तर 'ब्रेकिंग न्यूज'ची जागा सोशल मीडियातील 'स्टेटस अपडेट'ने घेतली आहे. मोबाइलफोनच्या क्रांतिकारी प्रसारामुळे इंटरनेटने टीव्ही माध्यमाला झपाट्याने मागे टाकण्यास सुरुवात केली आहे .आज देशातील १०० टक्के कुटुंबांकडे टीव्ही नाहीत, पण मोबाइल फोन प्रत्येक व्यक्तीकडे आहेत.हिच आहे बदलत्या डिजिटल इंडियाची डिजिटल पत्रकारिता.. आणि आपण डिजिटल युगाच्या अशा काळात आहोत, जिथे आपल्यावर खुप मोठी जबादारीपण आहे ही जबाबदारी एनटीव्ही न्युज मराठी खुप निष्ठेने आणि निष्पक्षरित्या पार पाडत आहे.

# महाराजांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी त्यांनी महाराष्ट्रातील प्रत्येकाची माफी मागावी : राहुल गांधी

### ● कडेगांवात पतंगराव कदमांच्या 'लोकतीर्थ' स्मारकाचे व पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**सांगली, दि. ५ सप्टेंबर-**

महाराष्ट्राचे नव्हे तर पूर्ण देशाचे आराध्य दैवत असलेले छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा कोसळल्याची घटना असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतीच येथे येऊन माफी मागितली. मात्र पुतळ्याच्या बांधकामात भ्रष्टाचार झाला म्हणून की चुकीचा कॉन्ट्रॅक्टर निवडला म्हणून की इव्हेंटबाजीसाठी पुतळ्याचे घाई गडबडीत अनावरण केले यासाठी माफी मागितली हे स्पष्ट करावे असे प्रतिपादन लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी केले.

शिक्षक दिनाचे औचित्य साधून सांगली जिल्ह्यातील कडेगाव येथील भारती विद्यापीठ मातोश्री बयाबाई कदम महाविद्यालयाच्या प्रांगणावर माजी मंत्री डॉ. पतंगराव कदम यांच्या 'लोकतीर्थ' या स्मारकाचे लोकार्पण व पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरणाचा कार्यक्रम सांगली जिल्ह्यातील वांगी येथे झाला, यावेळी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी येत्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे सरकार आणून देशात परिवर्तनाची सुरुवात करा, असे आवाहन उपस्थितांना केले.

भारती विद्यापीठ महाविद्यालयाच्या पटांगणावर झालेल्या कार्यक्रमात ला हजारो चा जमा जमला होता राहुल गांधींच्या भाषणाला उपस्थित आतून प्रचंड प्रतिसाद



मिळाला. काँग्रेससाठी महाराष्ट्रासाठी व देशासाठी आयुष्य खर्ची घालणाऱ्या पत्रांकदम यांचा पुतळा यापुढे ७०,८० वर्षे ही टिकलेला असेल असे सांगूनराहुल गांधी म्हणाले,' मालवण येथील राजकोट किल्लयावरील पुतळा पडल्याप्रकरणी मोदींनी माफी केवळ महाराजांची नाही तर पूर्ण महाराष्ट्रातील जनतेची माफी मागितली पाहिजे . शेतकरी आंदोलनात ७०० शेतकरी शहीद झाले, नोटबंदीमुळे लघु, छोटे, मध्यम उद्योग संपवले व लाखो लोकांचे रोजगार घालवले, चुकीच्या पद्धतीने जीएसटी लावला त्याबद्दलही माफी मागा, असे गांधी यांनी सांगितले.

मल्लिकार्जुन खरगे म्हणाले,'महाराष्ट्रातील महाविकास आघाडी मजबूत आहे, त्याला कोणीही हलवू शकत नाही. तीन पक्ष मिळून चांगले काम करत आहोत. राहुल गांधी यांनी 'डरो मत'चा संदेश दिला आहे, न घाबरता काम करा. महाराष्ट्राचा स्वाभिमानी मोदींकडे गहाण ठेवू नका. लोकसभेप्रमाणेच भरघोस पाठिंबा देत विधानसभेला मविआचे सरकार आणा, असे आवाहन करुन महाराष्ट्रात मविआचे सरकार आले की केंद्रातील मोदी सरकारही जाईल, असे सांगून ते म्हणाले,' अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे म्हणाले.' छत्रपती शिवाजी महाराज हे सर्वांचे आदर्श, प्रेरणास्रोत आहेत पण नरेंद्र मोदींचा हात त्यांच्या पुतळ्याला लागताच पुतळा कोसळला. मोदींनी गुजरातमध्ये पुलाचे उद्घाटन केले तो पडला, अयोध्येतील राम मंदिराचे उद्घाटन केले, त्याला गळती लागली. नरेंद्र मोदी हे मतांसाठी दिखाव्याचे काम करतात.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यावेळी म्हणाले की, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाचे महत्व ओळखून गावोगावी शैक्षणिक संस्था उभा करून सर्वसामान्यांच्या मुलांना शिक्षणाची दारे उघडली, त्या कर्मवीर भाऊराव पाटलांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून डॉ. पतंगराव कदम यांनी भारती विद्यापीठाच्या माध्यमातून राज्यातील अनेक भागात शिक्षण संस्था सुरु केल्या. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यावेळी म्हणाले म्हणाले की, पतंगराव कदम हे सर्वसामान्यांसाठी प्रेरणास्थान आहेत, सामान्य कुटुंबात जन्माला आलेले पतंगराव कदम स्वकर्तृत्वाने मोठे झाले. पलूस कडेगाव भागात त्यांनी आरोग्य, शिक्षण, कृषी क्षेत्रात विविध कामे करून या भागाचा विकास केला आहे. प्रास्ताविक माजी मंत्री डॉ. विश्वजित कदम यांनी केले.

या कार्यक्रमाला अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस सरचिटणीस मुकुल वासनिक, प्रभारी रमेश चेन्नीथला, विधिमंडळ पक्ष नेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री सुशिलकुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण, खा. छत्रपती शाहू महाराज, विधान परिषदेतील गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, खा. प्रणिती शिंदे, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, यशोमती ठाकूर, गोवा दिव दमनचे प्रभारी माणिकराव ठाकरे, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, माजी आमदार मोहनदादा कदम, सांगली जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आ. विक्रम सावंत, सांगली शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष पृथ्वीराज पाटील आदी उपस्थित होते.

### उद्धव ठाकरे यांची अनुपस्थिती

डॉक्टर पतंगराव कदम यांच्या पुतळा अनावरण प्रसंगी लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी,काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे व राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांनी जोरदार भाषण करीत जणू विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा नारळ फोडला. या कार्यक्रमाला महाविकास आघाडीतील दोन्ही काँग्रेसचे प्रमुख नेते उपस्थित असलेतरीही उद्धव ठाकरे गटाने मात्र दांडी मारली होती. सांगली लोकसभा मतदारसंघ लोकसभेच्या निवडणुकीवेळी काँग्रेसचे बंडखोर आमदार विशाल पाटील यांनी ठाकरे गटाचे उमेदवार चंद्रहार पाटील यांचा एकतर्फी पराभव केला त्यामध्ये विश्वजीत कदम यांची ही भूमिका महत्त्वाची होती. त्या पराभवाची सल कायम असल्याने उद्धव ठाकरे यांच्यासह प्रमुख नेते कार्यक्रमाला गैरहजर राहिल्याचे स्पष्ट झाले.

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# पवारांनी टोचले कान...

'दुधाने तोंड पोळले की ताकसुद्धा फुंकून प्यावे,' अशी एक अनुभवसिद्ध मराठी म्हण आहे. राजकारणात याचा अनुभव अनेकांना येत असल्याने अलिकडच्या राजकीय नेत्यांमध्ये ताक फुंकून पिण्याची कायमची प्रथाच पडली आहे. अन्य कोणाचे तोंड दुधाने पोळले तरी इतरांकरिता तो अनुभव पुरेसा असतो. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी राजकारणात असे अनेक अनुभव घेतलेले असल्याने, ते तर नेहमीच ताकदेखील फुंकून पितात. दुधाने तोंड पोळलेले अनेक राजकीय नेते त्यांनी पाहिलेले असल्याने किंवा दुधाने तोंड पोळल्याचा अनुभव त्यांनी स्वतःच अनेकांना दिलेला असल्याने, स्वतः ताक फुंकून प्यावे, ही खबरदारी ते नेहमी घेत असावेत. याच अनुभवातून त्यांनी विरोधकांच्या राजकारणातील आपले स्थान भक्कम केले आहे. केंद्रात तर नाहीच; पण महाराष्ट्रातही आपला पक्ष स्वबळावर सत्ता स्थापन करू शकत नाही, याची जाणीव असतानाही काँग्रेसच्या वळचणीला आलेल्या प्रत्येक पक्षाच्या कसोटीच्या वेळी संकटमोचक म्हणून त्यांनाच साकडे घातले जाते आणि आपल्या धूर्त राजकारणातून ते अशा कसोटीच्या प्रसंगांतून संबंधितांना वाचविण्याचे कसबही दाखवतात. अशा पवारांनाच आपल्या राजकारणात गुंतविण्याचा उद्धव ठाकरे यांचा उलटा डाव अखेर त्यांच्याच अंगांशी आला आहे. महाराष्ट्रात येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीनंतर महाविकास आघाडी सत्तेवर येईल, अशी स्वप्ने उद्धव ठाकरे यांना पडू लागली आहेत. २०१९ मध्ये संख्याबळाचे गणित उलटे फिरवून महाविकास आघाडीची मोट बांधत सत्ता हिसकावून घेण्याचा धूर्त डाव पवार यांनी जिंकला आणि ठाकरे यांच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ आग्रहाने घालून तत्कालीन अन्य इच्छुकांना कात्रजचा घाट दाखविला होता. त्यामुळे आता पवार यांच्या पसंतिक्रमात आपले नाव पहिल्या क्रमांकावर राहील, असे त्यांना वाटले असावे. पण पवारांच्या मनात नेमके काय आहे, ते अजित पवार यांच्या मुखातून व्यक्त होणाऱ्या वेदनांतून राज्याने ओळखले तरी ठाकरे यांना समजलेच नसावे. त्यांचे प्रवक्ते संजय राऊत यांनी मोठ्या प्रयत्नाने उद्धव ठाकरे यांच्या अंगावर चढविलेली झूल पाहून शरद पवारांना आनंद होईल आणि पाच वर्षांपूर्वीच्या राजकारणाची त्यांच्याकडून पुनरावृत्ती होईल, असे राऊत यांना वाटले असावे. राऊत हे उद्धव ठाकरे यांच्याइतकेच पवार यांच्याशीही एकनिष्ठ आहेत. पवार समजून घेण्यासाठी शंभर जन्म घ्यावे लागतील, या स्वतःच्याच विधानावर त्यांची अपार श्रद्धा असली, तरी आपल्या या जन्मातच आपण पवार यांना पूर्ण समजून घेतले असा त्यांचा स्वतःवरचा विश्वास असल्याने मुख्यमंत्रिपदाचा भावी चेहरा म्हणून उद्धव ठाकरे यांचे नाव पुढे रेटण्यास राऊत यांनी सुरुवात केली; त्यामुळेच महाविकास आघाडीच्या तंबूत पसरलेली अस्वस्थता त्यांना कदाचित दिसलीच नाही. त्याआधी सोनिया गांधींनी कधीतरी स्तुती केल्याने राऊत यांना उद्धव ठाकरेंच्या पंतप्रधानपदाची स्वप्ने पडू लागली होती. ठाकरे हे महाराष्ट्राचेच नव्हे, तर देशाचेही नेतृत्व करू शकतात, असा वैचारिक षटकार मारून त्यांनी त्यावेळी महाविकास आघाडीतून स्वतःचे हसे करून घेतले होते. पण निष्ठा या आपल्या एकमेव गुणामुळे त्यांनी स्वतःच त्याकडे दुर्लक्ष करून ठाकरे यांच्या प्रतिमानिर्मितीचा वसा कायम ठेवला.

त्याचाच एक भाग म्हणून भावी मुख्यमंत्र्यांच्या रांगेत उद्धव ठाकरे यांचे नाव पहिल्या क्रमांकावर राहावे याकरिता राऊत यांनी बांधलेला चंग आणि त्यातून खुद्द ठाकरे यांना पडू लागलेली सत्तेच्या सिंहासनाची स्वप्ने यामुळे आता महाविकास आघाडीत पडलेला मिठाचा खडा पवार यांनी अलगद बाजूला केला आहे. गेल्या काही महिन्यांपासून ठाकरे-राऊत यांना महाविकास आघाडीच्या नेतृत्वाची चिंता सतावत होती. महाराष्ट्रात या आघाडीला ठाकरे यांच्याखेरीज अन्य कोणीच तारणहार नाही, असे वातावरण निर्माण करण्याचाही जोरदार प्रयत्न सुरू झाला. खुद्द ठाकरे यांनी त्यासाठी मोर्चेबांधणी सुरू केली होती. बाळासाहेब ठाकरे यांच्या काळातील राजकारण वेगळे होते. त्या काळात राज्याच्या राजकारणापासून देशाच्या राजकारणापर्यंतच्या कोणत्याही घडामोडींकरिता बाळासाहेबांनी साक्षीदार व्हावे, असे वाटणारा प्रत्येक नेता मातोश्रीचे उंबरठे झिजवत असे. या प्रथेला खुंटीवर टांगून विरोधकांच्या नाईलाजाच्या सर्वसमावेशक राजकारणात आपले स्थान निर्माण करण्याची भूमिका घेतल्यापासून उद्धव ठाकरे स्वतःच मातोश्रीच्या उंबरठ्यातून बाहेर पडू लागले. महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे नेतृत्व करण्याच्या आपल्या मनातील सुप्त आणि प्रलंबित आकांक्षेला काँग्रेस व विरोधकांच्या आघाडीतील अन्य पक्षांचा पाठिंबा मिळावा यासाठी त्यांनी थेट दिल्लीवारी केली. सोनिया गांधी यांचे आशीर्वाद घेऊन परतल्यानंतर महाराष्ट्रातील काँग्रेसचा पाठिंबा मिळेल अशी त्यांची अपेक्षा असावी, पण दिल्लीवारीत त्यांना अपेक्षित असे काहीच घडले नाही. अरविंद केजरीवाल यांच्या पत्नीची भेट घेऊन विरोधकांच्या आघाडीचा आणखी एक मोहरा गळाला लावण्याचा त्यांचा प्रयत्नही फारसा यशस्वी झाला नाही. केवळ भेटीगाठी करून परतलेल्या ठाकरेंनी स्वतःच आपल्या मोर्चेबांधणीचा नारळ फोडला. गेल्या ऑगस्टमध्ये त्यांनी मुख्यमंत्रिपदाचा चेहरा या वादग्रस्त विषयाला जाहीरपणे तोंड फोडले, तेव्हाच त्यांचा स्वप्रतिमानिर्मितीचा प्रयत्न स्पष्ट झाला होता. मात्र, जाहीर चर्चा घडवून आणण्याच्या त्यांच्या प्रयत्नांनाही काँग्रेसकडून कोणताच प्रतिसाद मिळाला नाही; उलट त्यांच्या प्रयत्नांना नकारात्मक असेच संकेत मिळत गेले. आता या वादावर पडदा टाकून शरद पवार यांनी ठाकरेंच्या उरल्यासुरल्या अपेक्षांनाही बासनात गुंडाळून टाकले आहे. मुख्यमंत्रिपदाचा चेहरा निवडणुकीआधी जाहीर करण्याची गरज नाहीच; पण निवडणुकीनंतरही सत्ता मिळालीच तर उद्धव ठाकरे हे महाविकास आघाडीचे मुख्यमंत्रिपदाचे सर्वांच्या पसंतीचे उमेदवार नसतील, यावरही शिक्कामोर्तब झाले आहे.

आपल्या स्वप्रतिमानिर्मितीच्या प्रयत्नास प्रतिसाद मिळत नाही, हे पाहून उद्धव ठाकरे यांनी गेल्या महिन्यात एक पाऊल मागे घेतले. काँग्रेसने आणि पवार यांच्या गटाने निवडणुकीआधी मुख्यमंत्रिपदाचा चेहरा निश्चित करावा, त्यास आपला पाठिंबा राहील, असा नवा फासा ठाकरे यांनी जाहीर वक्तव्याद्वारे टाकून पाहिला, तेव्हाही त्यास काँग्रेस किंवा पवार यांच्याकडून काहीच प्रतिसाद मिळाला नाही. राजकारणात आपले अस्तित्व उमटविण्याच्या प्रयत्नांना प्रतिसाद मिळाले नाहीत तर कोणासही अस्वस्थता येणे साहजिकच असते; पण नकारघंटा मिळाल्यास त्यामुळे होणाऱ्या मानहानीचे दुःख त्याहूनही अधिक अस्वस्थ करणारे ठरेल, हे त्यांना तेव्हा कळलेच नसावे. आता शरद पवार यांनी ठाकरे यांच्या त्या मागणीस धुडकावून लावून त्यांना या अस्वस्थतेचा थेट अनुभव दिला आहे. यामागे ठाकरे यांच्या राजकारणाचा पूर्वानुभव कदाचित पवार यांना उपयोगी पडला असावा. भाजपासोबत युती असताना, मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार म्हणून देवेंद्र फडणवीस यांचे नाव ठाकरे यांच्या उपस्थितीतच जाहीर सभांतून उघड होत असतानाही, बंद खोलीतील कथित आश्वासनाचा हवाला देत ठाकरे यांनी युतीस रामराम केला, हे पवार यांना ठाऊक आहे. त्यामुळे या मुद्यावर फार काळ मौन न बाळगता त्याचा निकाल घेणे त्यांनी योग्य मानले असावे. त्या योग्य वेळाची योग्य संधी पवार यांच्यासमोर कोल्हापूरमधील पत्रकार परिषदेत बुधवारी चालून यावी, हा योगायोग नसावा. निवडणुकीआधी महाविकास आघाडीचा मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार ठरवावा, या ठाकरे यांच्या त्या विधानाकडे पवार यांचे लक्ष वेधण्यात आले आणि ती वेळ साधून पवार यांनी ठाकरे यांच्या मागणीस धोबीपछाड दिली. दुधाने तोंड पोळल्यावर ताक फुंकून पिणे शहाणपणाचे असते, हे वास्तव एवढ्या प्रदीर्घ अनुभवी असलेल्या पवार यांनाही मान्य करावे लागले, पण ठाकरे यांच्या ते कधी गळी उतरणार हे येणारा काळच ठरविणार आहे. पवार यांनी जाहीर खुलासा करून नेमके कान टोचले आहेत. आता उद्धव ठाकरे हे महाविकास आघाडीचे मुख्यमंत्रिपदाचे दावेदारही नाहीत आणि उमेदवारही नाहीत, हे स्पष्ट झाले आहे.

## जीवन जिज्ञासा

# महाभारत ते भारत (३)

प्राचार्य प्र. श्री. डोरले

संपूर्ण पृथ्वीवर आपल्या बाहुबलाने राज्य करणाऱ्या पराक्रमी चक्रवर्ती, वीराग्रणी, वीरशिरोमणी 'भरत' या राजाच्या नावाने जम्बुद्वीपातील 'आर्यावर्त' या प्रदेशाचे नाव 'भारत' असे पडल्याचा इतिहास आहे; जो आपण पाहिला. याप्रमाणे द्वापारयुगापासून तो कलियुगापर्यंत म्हणजे विद्यमान २१ व्या शतकापर्यंत चालत आलेला हा आमचा राष्ट्रीय प्रवाह आहे. ज्याचा स्पष्ट उल्लेख महाभारतापासून पुढे अनेक पुराण ग्रंथांमध्ये अगदी सविस्तरपणे आलेला दिसतो. त्यामुळे 'आम्ही कोण?' म्हणून आपली ओळख सांगायची झाली तर आम्ही 'भरतवंशीय' म्हणजे भारतवासी भारताची संतान आणि वारसा हक्काने मिळालेला देश, राष्ट्र म्हणजे आमचा प्रियतम 'भारत' वर्ष! या प्रदीर्घ वाटचालीत पुढे 'सिंधू नदीच्या प्रदेशात राहणारे लोक म्हणजे हिंदू' असे नामाभिधान जगातील अनेकांनी आपले केले त्यामुळे ज्या देशात, राष्ट्रांत हिंदू राहतात तो 'हिंदुस्थान' अशी ओळख ऐतिहासिक वाटचालीत आपली झाली. द्वापारयुगात जो 'भरताचा भारत' तोच आज हिंदूंचा हिंदुस्थान. विश्वाच्या इतिहासातील हे एक निखळ सत्य आहे ते कोणी नाकारू शकत नाही. विसरू शकत नाही. ते आपण विसरावे म्हणून गोऱ्या साहेबांनी कुटिलतेने, बुद्धिभेद करण्यासाठी 'नेशन इन मेकिंग' आणि 'इंडिया दॅट इज भारत' या दोन फसव्या घोषणा दिल्या आहेत. त्याचा विचार करण्याची गरज नाही.

या वंशात प्रत्येक पिढीत अतिशय कर्तृत्ववान, पराक्रमी, चक्रवर्ती, राजे निर्माण झाले आहेत. त्यातील 'हस्ती' या सम्राटाने इंद्राच्या अमरावतीला शोभेल अशा एका महानगरीचे राजधानी म्हणून निर्माण केले; तेच पुढे 'हस्तिनापूर' झाले. भरतानंतरच्या पुढील ५५ व्या पिढीचा इतिहास म्हणजे कौरव-पांडवांचा इतिहास! यांच्याच पिढीमध्ये या श्रेष्ठ भरत वंशाच्या इतिहासाला ग्रहण लागले. एकसंध, एकरस असलेल्या भारताची द्वापारयुगात पहिली फाळणी झाली. त्या फाळणीचा इतिहास, त्यामुळे झालेले भीषण परिणाम त्याचा घटनात्मक क्रमवार मांडलेला तपशील महर्षी व्यासांनी 'महाभारत' या ग्रंथात मांडला आहे. कोणत्याही देशाची, वंशाची फाळणी का व कशामुळे होते? त्याची मानसिकता कशी असते? त्याचे सखोल विवेचन त्यांनी या ग्रंथात मांडले आहे. कालखंडाचा संदर्भ जरी भिन्न असला, तरी ज्या मानसिक वृत्तीचा हा संघर्ष असतो ज्या वृत्तींचा निर्देश महाभारताचा तत्त्वज्ञानात्मक, वैचारिक वारसा मांडणाऱ्या भगवद्गीतेत 'दैवी-असुरी संपदा' 'सत्त्व- रज-तम' या प्रकृतिसिद्ध तीन गुणांचा सृष्टीच्या सूक्ष्मातिसूक्ष्म स्तरावर चालणारा अखंड संघर्ष याच्या विवेचनातून स्पष्टपणे केला आहे. त्या दृष्टिकोनातून विचार केला तर आधुनिक भारतातील अनेक घटनांचा अन्वयार्थ सहजपणे लागतो.

**लढा वारसा हक्काचा :** कोणत्याही देशाची फाळणी ही त्या देशाच्या मालकी हक्कावरून, वारसाहक्कावरूनच होत असते. व्यवहारात आपण एकाच कुटुंबाचे, समान गोत्राचे भाऊबंद यांच्यात परस्पर सामंजस्याने, विचारविनिमयाने, गोडीगुलाबीने, परिस्थितिजन्य आवश्यकतेनुसार परंपरागत स्थावर इस्टेटीची विभागणी झाली, तर त्याला 'इस्टेटीची वाटणी' असे म्हणतो. हा प्रकार परस्परांच्या अनुमतीने झाला असल्याने त्यात भांडण, तंटा, संघर्ष, रक्तपात हा प्रकार घडलेला नसतो, पण फाळणी ही रक्तरंजितच असते. कारण यात आपला काहीही न्याय्य हक्क नसताना, आपला अधिकार नसताना, बळजबरीने दुसऱ्याच्या परंपरागत, वारसा हक्काने निसर्गतः त्यांना प्राप्त झालेल्या भूभागाचा, संपत्तीचा बळजबरीने अपहार करण्याचा, कब्जात घेण्याचा, त्यासाठी सर्व प्रकारच्या बलांचा, सैनिकी शक्तीचा वापर करण्याची आक्रमकता व तामसी वृत्तीचा विनियोग काही दुष्ट शक्तींकडून केला जातो. या दुष्ट, अपहार करणाऱ्या वृत्तीला धर्म म्हणून, कर्तव्य म्हणून जेव्हा खरे वारसदार विरोधासाठी आपला न्याय्य हक्क प्रस्थापित करण्यासाठी, आपल्या पूर्वजांनी प्राप्त करून ठेवलेल्या प्रदेशासाठी म्हणजे स्वदेशासाठी, म्हणजे प्रिय मातृभूमीसाठी संघर्ष करण्यास उभे ठाकतात त्यातून मग कुरुक्षेत्र, पानिपत अशा मैदानांवरील भीषण रणसंग्राम उभे राहतात. द्वापारयुगात झालेल्या फाळणीचा इतिहास म्हणजे महर्षी व्यासांच्या दिव्य प्रतिभेतून साकारलेले 'महाभारत' हे महाकाव्य आहे. या फाळणीचे गुन्हेगार म्हणून, सहभागी म्हणून कौरव आणि पांडव हे दोन पक्ष आहेत.

**इतिहासाची पुनरावृत्ती :** इतिहासाची पुनरावृत्ती होत असते, असे म्हणतात. या विधानाचा भावार्थ समजून घेणे आवश्यक आहे. काळ भिन्न असतो, परिस्थितीचा संदर्भ भिन्न असतो. घटना वर्तमानातील असतात, पण त्या घटनांना प्रेरित करणाऱ्या प्रेरणांचा, वासनांचा, विकारांचा मानसिक स्रोत हा युगानुयुगे प्रवास करीत विविध व्यक्तींच्या माध्यमातून प्रकट होतच असतो. त्याबरहुकूम घटना, प्रसंग आकार घेत असतात. कौरव आणि पांडव यांचा इतिहास आपल्याला विदित आहेच. त्या काळातील राजधर्माच्या परंपरेप्रमाणे, शास्त्राप्रमाणे कुरुवंशाचा अधिकृत राज्याधिकारी व वारस कोण होता? पांडू. त्याने काही दिवसांसाठी धृतराष्ट्राला राज्याचे अधिकार दिले (पॉवर ऑफ ॲटर्नी), पण हस्तिनापूरचे राज्य बळकविण्याचा व आपल्या दुर्योधन नावाच्या मुलाला राज्याचा वारस करण्याचे कुटिल प्रयत्न धृतराष्ट्र आणि त्यांच्या मुलांनी केला. त्यासाठी केलेले लाक्षागृह ते द्युतक्रीडा या घटना आपल्याला माहीतच आहेत. या 'धृतराष्ट्री' मानसिकतेचे वर्णन करताना श्री. दा. सातवळेकर म्हणतात- "धृतराष्ट्र ही एक मानसिकता आहे. लोभ, देश आणि पुत्रमोह हे या मानसिकतेचे प्रमुख अंग आहेत. धृत-राष्ट्र म्हणजे राष्ट्राला घट्टपणे पकडून ठेवणारा. जे राष्ट्र आपले अधिकारात नाही त्यावर आपल्या पाशवी बलाने, कुटिलतेने, अन्यायाने ताबा ठेवणे. त्या राज्याचे खरे वारस जर ते परत मागू लागले तर त्यांना ते न देता बळजबरीने त्यांना युद्धास भाग पाडणे; पण राज्य न देणे." पुढे ते म्हणतात- "सज्जनांच्या अतिद्वेषाने, पुत्रमोहाने, बल, संपत्ती आणि सत्ता यांच्या मदाने धुंद झालेली ही 'धृतराष्ट्रवृत्ती' न्याय आणि अन्याय, धर्म आणि अधर्म, कर्तव्य आणि अकर्तव्य, नीती आणि अनीती, युक्त आणि अयुक्त यांचा विचार करण्यास असमर्थ होत असते. चर्मचक्षूंनी जरी तो आंधळा असला, तरी खऱ्या विवेकाच्या दृष्टीनेच तो अंध बनलेला असतो. चर्मचक्षूंच्या अंधत्वापेक्षा त्याचे जे मानसिक आणि आत्मिक अंधत्व असते, ते फारच भयंकर असते." (पुरुषार्थ बोधिनी - पृ. क्र. २) संपूर्ण जागतिक इतिहासातील विविध कालखंडातील झालेल्या युद्धांचा तपशील आणि त्यामागील कारणीभूत असलेल्या मानसिकतेचा मागोवा घेतला तर याची सत्यता पटायला हरकत नसावी.

९८६०२९६१३१
(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)

## वेध

संजय रामगिरवार

# वर्दळीच्या मुख्य रस्त्यांवरून मोर्चे काढणे कितपत योग्य?

निवडणुका जवळ आल्या की शहरांत मोर्चांची संख्या अचानक वाढते. मिरवणुका तर वर्षभर चालतात. त्या होऊ नये असे अजिबात म्हणणे नाही. पण हे मोर्चे, मिरवणुका कुठून निघाव्या याचा विवेकशील विचार निश्चितपणे झाला पाहिजे. कारण सध्याचे मोर्चे, मिरवणुका या शक्तिप्रदर्शनाचे माध्यम झाले आहेत. ते शहराच्या वर्दळीच्या आणि मध्यभागातील मुख्य रस्त्यांवरून निघावे असाच साऱ्या राजकीय पक्षांचा, संघटनांचा आग्रह असतो. आग्रहच नाही तर अक्षरशः जबरदस्तीच असते. ते याचा मुळीच विचार करीत नाही की, त्यामुळे शहरांतील मुख्य रस्त्यांची रहदारी कमालीची प्रभावित होते. तासन्तास जाम लागतो. गाड्या तसुभर सरकायला मिनिटं लागतात. लोकांचा वेळ, पेट्रोल, डिझेल तर वाया जातेच; शिवाय प्रदूषणही होते. राष्ट्राच्या संपत्तीचा फिजूल खर्च होतो. सोबतच जनतेला होणारा मनस्ताप प्रचंड असतो. शेवटी ते सारेच दूषणे देत संतप्त मनाने कधीतरी उशिरा आपल्या घरी किंवा कार्यालयात पोहोचतात.

वाटायला गोष्ट छोटी आहे, पण ती डोंगराएवढी नक्कीच आहे. कुणालाच हे मोर्चे, मिरवणुका मुख्य रस्त्याने नको असतात. पण साऱ्यांचे हितसंबंध जुळलेले असल्याने, कोणत्याही राजकीय पक्षाला केव्हातरी मोर्च किंवा शक्तिप्रदर्शन करावेच लागणार असल्याने कोणताच पुढारी हा या गंभीर प्रश्नाला हात घालत नाही. सामाजिक संघटनाही एरवी प्रदूषण आणि वाहतुकीचा विषय



घेतात; पण मोर्चे, प्रदर्शन किंवा मिरवणुका मुख्य मार्गाने निघू नये म्हणून तेही काहीच बोलत नाही. कारण केव्हातरी त्यांनाही असे शक्तिप्रदर्शन करावे लागते. यात मोठी अडचण होते ती सामान्य माणसाची; तो काहीच बोलू शकत नाही. करू शकत नाही. चंद्रपुरात हा प्रश्न आणखी गंभीर आहे. कारण या महानगरात उरलेसुरले दोनच मुख्य रस्ते आहेत आणि तेही अत्यंत लहान, निमुळते होत गेलेले. त्यातही कस्तुरबा मार्गावरील शिवाजी चौकाकडे जाणारा मार्ग तर आहे की नाही, की बोळीच आहे, अशा स्थितीत आहे. रस्त्यांना लागूनच जुनी घरे आणि वर्षोन्वर्ष थाटलेली दुकाने असल्याने हे रस्ते वाढवताही येत नाही. दिवसेंदिवस महानगराच्या लोकसंख्येत वाढ होत असल्याने, वाहने वाढत असल्याने आणि रस्ते परंपरागत तोटकीच असल्याने वाहने तुंबतात. मोठा जाम लागतो तो 'प्राईम टाईम'मध्ये तर तासन्तास असतो. अशात एखादी मिरवणूक आली किंवा मोर्चा निघाला तर विचारूच नका, एवढा गोंधळ होतो. वाहतूक पोलिसांच्या नाकी नऊ येते. मग तुंबलेली वाहतूक दुसऱ्या कुठल्या तरी गल्लीबोळाच्या मार्गाने वळवली जाते. या साऱ्यात जनता भरडली जाते. अनेकदा या वाहतुकीच्या जाळ्यात रुग्णवाहिका अडकते. तिलाही जायला हे मोर्चेकरी मार्ग देत नाहीत. मध्यंतरी अशाच अडकलेल्या रुग्णवाहिकेत एका वृद्ध महिलेला मृत्यू झाला होता; किती हे भयंकर आहे! जवळपास असेच चित्र विदर्भातील अनेक शहरांचे आहे. पण कुठेच कुणीच पुढाकार घेऊन हे मोर्चे आणि मिरवणुका शहराच्या बाहेर नेत नाहीत. कारण तिकडे बघणारे कुणीच नसते. आपल्याला बघावे असे मोर्चेकऱ्यांना आणि मिरवणाऱ्यांना वाटत असले तरी त्यामुळे जनतेचा केवढा संताप होतो, याचा विचार कुणीच करीत नाही. पोलिसांनी अशा मोर्चे आणि मिरवणुकांवर मुख्य रस्त्यांवरून नेण्याची बंदी आणली तर त्यांचाही विरोध होतो. सत्ताधाऱ्यांचे फोन खणखणतात आणि शेवटी पोलिसांनाही नांगी टाकावी लागते. चंद्रपूर महानगरात तर आणखी एक विचित्र प्रथा पडली आहे. मोजून या महानगरात दोनच मुख्य मार्ग आहेत. दोन्ही मार्ग एकेरी आहेत. तरीही मोर्चेकरी यातील एका मार्गावर मुद्दाम विरुद्ध दिशेने मोर्चे नेतात. या मार्गावर जटपुरा नामक ऐतिहासिक द्वार आहे, ज्यातील एका लहानशा खिडकीतून एरवी अख्खी वाहतूक मार्गस्थ होत असते. हा मार्ग तसाही तुंबतो. त्यावर मोर्चा किंवा मिरवणूक निघाली की विचारायलाच नको, अवघा संतापच... यावर सत्ताधारी, विरोधक आणि विविध संघटनांनी चिंतन केले करणे गरजेचे आहे...

९८८१७१७८३२

## प्रासंगिक

# शरद पवार विरुद्ध उद्धव ठाकरे

मोरेश्वर बडगे



महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक दोन-अडीच महिने लांबली आहे. दिवाळीनंतरच फटाके फुटतील. निवडणुकीचे वारे मात्र केव्हाच वाहू लागले आहेत. लोकसभेत फक्त ४८ जागा होत्या. विधानसभेत तर २८८ जागा आहेत. या सगळ्या जागांचे वाटप आणि तिथे उमेदवार निश्चित करणं ही दोन्ही आघाड्यांसाठी सर्कस आहे. महायुतीचे नेते सावधपणे खेळत आहेत. त्या तुलनेत महाआघाडीचे नेते आक्रमक दिसत आहेत. लोकसभा निवडणुकीत महाआघाडीने ४८ पैकी ३० जागा जिंकल्या. त्यामुळे विधानसभेसाठी आघाडीचा आत्मविश्वास दुणावला आहे. सत्तेची स्वप्नं पडायला लागली आहेत. अजून निकाल यायचाच आहे. मात्र, मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण? यावरून महाआघाडीच्या नेत्यांमध्ये जुंपली आहे. याची सुरुवात शिल्लक सेनेचे सुप्रीमो उद्धव ठाकरे यांनीच केली. मुख्यमंत्रिपदाचा चेहरा आधी ठरवा, असा आग्रह उद्धव यांनी शरद पवार आणि नाना पटोले यांच्या समक्ष केला. पवार आणि पटोले त्यावर गप्प राहिले. पण आता रणकंदन सुरू झाले आहे. ठाकरे विरुद्ध पवार असे नाजूक वळण निवडणुकीला मिळाले आहे. चेहऱ्यासाठी एवढा वाद, जागावाटपात तर हाणामारी होणार. तुम्ही लिहून ठेवा. काँग्रेसचा उमेदवार दिल्लीत ठरतो आणि सोनिया गांधी ते ठरवतात, याची उद्धव ठाकरे यांना छान कल्पना आहे. तरीही त्यांनी जाहीरपणे हा प्रश्न उपस्थित केला. चेहरा नसेल तर पाडापाडी होते, अशी भूमिका त्यांनी मांडली. चेहरा मागण्यामागे उद्धव ठाकरे यांचे निश्चित काही दबावतंत्र असावे. तसे नसते तर मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करण्याचे ते व्यासपीठ नव्हतेच. तरीही ठाकरे बोलले. मुख्यमंत्रिपदात आपल्या पक्षाला रस नाही, असे पुढे काही दिवसांनी सांगून पवारांनी उद्धव ठाकरेंच्या आशा उंचावल्या. उद्धव दिल्लीचा तीन दिवसांचा दौरा करून आले. पण शरद पवारांच्या नाहीमध्ये हो दडले असते, हे त्यांना माहीत नसावे. लवकरच त्याची प्रचीती आली. शरद पवारांनी आता उलटी भूमिका घेतली आहे. हा माणूस कधी काय बोलेल, कधी पलटेल याचा भरवसा नाही. मुख्यमंत्रिपदात रस नाही म्हणणारे शरद पवार दहा दिवसांत निवडणूक जिंकायची भाषा करतात. हा रस कुठून आणि कोणासाठी आला? कोण विश्वास ठेवेल यांच्यावर? महाआघाडीचे सगळे नेते असलेच नमुने आहेत. जिधर बम, उधर हम. मुख्यमंत्रिपदाचा चेहरा निवडणूक निकालानंतर ठरेल, असे शरद पवारांनी कोल्हापूरमध्ये जाहीरपणे सांगितले. ज्याच्या जागा जास्त त्याचा मुख्यमंत्री हे सांगायलाही पवार विसरले नाहीत. एक प्रकारे पवारांनी उद्धव यांना त्यांची जागा दाखवून दिली. उद्धव आणि त्यांचे हनुमान यांची रंगबाजी आता चालणार नाही. त्यामुळे उद्धव यांच्या स्वप्नांना सुरुंग लागला आहे. उद्धव ठाकरे यांची व्होट बँक एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने केव्हाच हायजॅक केली आहे. ठाकरेंकडे आता मतं आहेत कुठे? संजय राऊत यांनी तर उद्धव यांची मतं खराब करण्याचा जणू विडाच उचलला आहे. मुस्लिम मतं लोकसभेत त्यांना मिळाली. पण आता विधानसभेत ती मिळणार नाहीत. प्रकाश आंबेडकर यांना पकडून दलितांची मतं खेचायचा त्यांचा डाव काँग्रेसने केव्हाच हाणून पाडला. महाआघाडीमध्ये आपणच सर्वोच्च नेते आहोत या भ्रमात उद्धव होते. सांगलीची जागा काँग्रेसची होती. उद्धव यांनी परस्पर तिथे आपला उमेदवार उभा केला. तो आपटणारच होता. आपटला. मात्र, या डावात उद्धव यांनी उगाच काँग्रेसशी पंगा घेतला. कागदावर महाआघाडी भक्कम दिसत असली तरी आतून पोकळ आहे. उद्धव आज एकदम एकटे आहेत. काँग्रेसच नव्हे तर शरद पवारही आता त्यांच्याकडे संशयाने पाहत आहेत.

गेल्या ५० वर्षांत पवारांना कोणी समजू शकलेले नाही. उद्धव ठाकरे यांनीही मार खाल्ला. भाजपासोबत युतीत राहिले असते तर उद्धव मजेत असते. मुख्यमंत्रिपद देतो असे सांगून पाच वर्षांपूर्वी पवारांनी उद्धव यांना भाजपापासून तोडले. काँग्रेसला सोबत आणून महाआघाडी बनवली. मुख्यमंत्रिपदी बसवले. मात्र, तो त्यांचा गेम होता. उद्धव त्यात फसले. आता कितीही आदळआपट केली तरी उपयोग नाही. शरद पवार हळूहळू आपले पत्ते खुले करीत आहेत. त्यांना आपल्या मुलीला राज्याची पहिली महिला मुख्यमंत्री करायचे आहे. दहा वर्षांपूर्वी पाहिलेले ते स्वप्न हाताशी आलंय्, असे त्यांना वाटतंय्. शरद पवार फुकटात पावसात भिजत नाहीत. या वयात ते महाराष्ट्र पिंजून काढत आहेत. फोडाफोडी करून मिशन सुप्रियाची तयारी चालवली आहे. इकडचे तिकडचे अडचणीतले दबंग नेते पकडायचे, त्यांना तिकीट द्यायचे आणि सत्ता गाजवायची. पवार गेली ५० वर्षे हेच करीत आले. भाजपामधले काही नेते यावेळीही त्यांच्या गळाला लागतीलही. हर्षवर्धन पाटील यांच्या नावाची जोरदार चर्चा आहे. शरद पवार यांची हवा सुरू आहे, असा एक फेक नॅरेटिव्ह मीडियाने उभा केला आहे. उद्धव यांच्याबद्दल सहानुभूती आहे, हाही त्याच फसव्या प्रचाराचा भाग. पण तुम्ही लिहून ठेवा, लोकसभा निवडणुकीत भाजपाला दणका बसला असे सांगितले जाते; पण ते अर्धसत्य आहे. लोकसभा निवडणुकीत २०१४ मध्ये भाजपाला ३१ टक्के मतं आणि २८२ जागा मिळाल्या होत्या. २०१९ च्या निवडणुकीत ३८ टक्के घेऊन भाजपाने ३०३ जागा जिंकल्या होत्या. आता झालेल्या निवडणुकीत भाजपाला ३७ टक्के मतं मिळाली. एक टक्का मतं कमी घेतली. त्यामुळे २४० जागांवर थांबावे लागले. महाआघाडीला ४८ जागांपैकी ३० जागा मिळाल्या असल्या तरी आघाडी आणि युती यांच्या मतांचा फरक फक्त दोन लाखांचा आहे. जागांच्या आकड्यात भाजपा हरला. येत्या विधानसभा निवडणुकीत दोन लाखांचा फरक चुटकीनिशी भरेल. हेही झाले नसते. पण कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष झाले. त्याचा हा तडाखा आहे. युती भक्कम करण्यासाठी अजित पवारांना भाजपाने जवळ केले. शिंदेच्या शिवसेनेची मतं भाजपाला मिळाली. मात्र, अजितदादांची मतं भाजपाला म्हणजे महायुतीला ट्रान्सफर झालीच नाहीत. मराठा फॅक्टर यावेळी कसा काम करतो ते पाहायचे. पडायचे की लढायचे याचा निर्णय मनोज जरांगे अजून करू शकले नाहीत. समाज त्यांच्या पाठीशी आहे हे मानलं तरी मराठा समाजात इतर पक्षांचेही नेते आहेत. जरांगे लढताहेत म्हणून इतर राजकीय पक्षातले नेते लढणार नाहीत अशातली परिस्थिती नाही. यावेळी मैदानात कधी नव्हे एवढे असंख्य उमेदवार उतरलेले दिसतील. मोठ्या प्रमाणात बंडखोरी होईल. अपक्ष उमेदवार रेकॉर्ड प्रमाणात असतील. मोठ्या प्रमाणावर मतविभाजन होईल. या मतविभाजनाचा महायुतीला फायदाच होईल. पश्चिम महाराष्ट्रापुरते शरद पवार चालतील. इतरत्र महायुती मोठी कमाई करेल. लोकसभेत भाजपाचे मतदार म्हणावे तेवढे मतदानाला गेले नव्हते. यावेळी धोका होणार नाही. यावेळचे निकाल धक्कादायक असतील.

९८५०३०४१२३
(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

### श्रीगणपती

सर्व देवांमध्ये अग्रपूजेचा मानकरी असलेल्या श्रीगणेशाचे रूप अत्यंत अनुपम असे आहे. सर्व प्राणिमात्रांमध्ये हत्ती हा अत्यंत बुद्धिमान म्हणून ओळखला जातो. त्याचं डोकं गणपतीच्या मस्तकावर विराजमान आहे. डोळे बारीक असले तरी कोणत्याही वस्तूच्या वास्तविक स्वरूपापेक्षा ती मोठ्या स्वरूपात पाहण्याची क्षमता त्याच्यात आहे. त्यामुळे तो दूरदृष्टीने प्रत्येक गोष्टींच्या परिणामांचा विचार करून तपासून पाहतो. त्याचे सुपासारखे कान असे संकेत देतात की योग्य आणि श्रवणीय असेच ऐकावे. ऐकताना वाईट गोष्टी बाहेरच ठेवून फक्त चांगल्या गोष्टी ऐकून मन बुद्धीपर्यंत जाऊ देण्याची व अमूल्य वेळेचा सदुपयोग करण्याची शिकवण देतात. गणपती आपल्या मोठ्या पोटात चांगल्या-वाईट, अनुकूल-प्रतिकूल अशा सर्व अनुभवांना सामावून सहन करण्याची शिकवण देतो. वाईट प्रवृत्तींना धडा शिकविण्यासाठी त्याच्या चार हातांपैकी दोन हातात शस्त्रे आहेत, एक हात आशीर्वादाचा आणि एका हातात ज्ञानरूपी मोदक आहे. ज्ञानाचा अहंकार होऊ नये म्हणून त्याने मोदक न खाता हातात सांभाळून ठेवला आहे. सर्वांना समान दृष्टीने पाहणारा म्हणून एकदंत आहे. तोंड लहान म्हणजे विनम्र आणि मितभाषी आहे. त्याचा एक पाय जमिनीवर असतो. वाहन उंदीर जो अत्यंत चपळ आहे. आपल्या चंचल मनाला आवर घालण्याची शिकवण देतो. अशा सर्वगुणसंपन्न श्रीगणेशाचे गुण आमच्या अंगी येण्यासाठी आपण त्याला कृतज्ञतापूर्वक प्रार्थना करून हा उत्सव आदर्श पद्धतीने कसा साजरा करता येईल याची काळजी घेऊया. त्यामुळे या उत्सवाचे धार्मिक महत्त्व जोपासले जाऊन, सामाजिक उत्तरदायित्व निभावता येईल.





**अंजली श्रीकांत पाध्ये**/९९७५५३६९०६

## वाचक पत्रे

### 'पॉलिग्राफ'ला मान्यता नसावी

पॉलिग्राफ (लाय डिटेक्टर) चाचणीला जरी न्यायदानाच्या वेळी पूर्ण पुरावा म्हणून धरला जात नाही तरी गुन्हा सिद्ध करण्यासाठी या चाचणीतील निष्कर्षांचा आधार घेता येतो. सर्वच आरोपींना स्वतःबद्दल माहीतच असते की, त्यांनी संबंधित गुन्हा केला किंवा नाही. असे माहीत असल्यामुळे असे आरोपी, पण प्रत्यक्षात गुन्हेगार, लाय डिटेक्टर टेस्टला होकार देऊन आपल्याच पायावर धोंडा कशाला पाडून घेणार? त्यामुळे साक्षी-पुराव्यांच्या आधारावर जर न्यायालयाला वाटले की, विशिष्ट प्रकरणामध्ये पॉलिग्राफ चाचणी आवश्यक आहे तर ती जरूर करण्यात यावी; जेणेकरून गुन्ह्याची उकल होणे सोयिस्कर होईल. इथे आरोपींच्या पूर्वपरवानगीच्या अटीचा नियम नेहमीसाठी रद्द करण्यात यावा.

**डॉ. तुषार झाडे**/९३२५१८५३०७

### समर्थांची यशोगाथा 'रघुवीर'

समर्थ श्रीरामदास स्वामी यांच्या जीवनावर आधारित 'रघुवीर' हा चित्रपट बघण्याचा योग आला. त्यांचे रोमांचकारी चरित्र, काही घटनांचे चित्रण यात आहे. सर्वांनी आवर्जून बघावा असा हा चित्रपट. त्यांच्या कार्याचा परिचय व त्यांनी समाजाला दिलेले विचार यात दर्शवण्यात आले आहेत. संपूर्ण आयुष्य दोन-तीन तासांत दाखविणे कदापि शक्य नाही. बालपणीचा काळ हा सवंगड्यांसोबतचा लहानपणीचे खेळ, अडलेल्यांना मदत करणे असे प्रसंग दाखविलेले आहेत. नारायणाच्या करामतींनी आईला चिंता वाटून तिच्या जीवाला घोर लागतो, लग्न हा एक उपाय असे आईला वाटणे योग्यच, हे चित्रण फार सुंदर केले आहे. नारायण ते समर्थ रामदासस्वामी असा त्यांचा जीवनप्रवास यात सुंदररीत्या उलगडून दाखविला आहे. अंधश्रद्धा, मानसिक दौर्बल्य दूर करणे तसेच बलोपासना, एकीचे बळ याला स्थान दिलेले आहे. चुकीच्या व्यक्तीला अद्दल घडविणे दाखवले आहे. लग्नमंडपातून पळून गेलेल्या नारायणाचा पुढचा प्रवास तपसाधना, औषध, ग्रंथांचा अभ्यास, भ्रमंती, तरुणांसाठी आखाडे उभारणे, प्रेरणा देणे, उद्धव व कल्याणसारख्या शिष्यांना घडविण्याचे उत्तम चित्रण या चित्रपटात दर्शविले आहे. दासबोध, मनाचे श्लोक लिहिणे सर्वांसाठी आजही मार्गदर्शक आहेत.

आदिलशाहीला न घाबरणारे, न झुकणारे श्रीरामदास्वामी श्रीरामाचे दास असल्याचे यवनांना ठणकावून सांगतात. एकत्रीकरणासाठी मंदिर, आखाडे उभारतात. श्रीशिवाजी महाराजांसोबत असलेल्या नात्यांचा प्रसंगही थोडक्यात दाखविला आहे. विधवा वेणाबाईंना दिलेली दीक्षा आणि मठाची दिलेली जबाबदारी, ती पार पाडावी म्हणून स्त्रीला दिलेले अधिकार हा प्रसंग छान आणि महत्त्वपूर्ण वाटतो. चित्रपट माहितीप्रधान असून निश्चितच कौतुकास्पद आणि प्रेरणा देणारा आहे. श्रीसमर्थांचे समर्थ रूप निर्मात्याने दाखविले आहे. शेवटी कल्याणकारी रामराया या प्रार्थनेची आठवण झाली. एकंदरीत चित्रपट छान झाला आहे. सर्वांच्या भूमिका योग्य व न्याय देणाऱ्या आहेत. नारायण आणि रामदास स्वामींची भूमिका उत्कृष्ट अभिनयाने साकार झालेला चित्रपट.

**प्रा. कीर्ती काळसर्पे**/८६००४६९२००

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# डॉ. फडकुले, पुजारी, सरदेशमुख ही साहित्यातली तीन घराणी !

## डॉ. जोशी यांचे प्रतिपादन

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर -**

सोलापूर - ''डॉ. निर्मलकुमार फडकुले, त्र्यं. वि. सरदेशमुख, प्रा. श्रीराम पुजारी हे शिक्षणातली, साहित्यातली तीन घराणी. या तिघांचाही माझ्यावर खूप प्रभाव आहे. कारण लग्नानंतर माझं बी ए, एम ए झालं, पीएचडीला डॉ. फडकुले सरच माझे गाईड होते. त्यांच्यामुळे विंदांच्या साहित्यावर पीएचडी करायचं ठरलं. त्यामुळे माझ्या वाचनाला आणखी बळ मिळालं,'' असे प्रतिपादन डॉ. गीता जोशी यांनी केले. प्रिसिजन वाचन अभियान कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

या कार्यक्रमात डॉ. जोशी यांची शिरिष देखणे यांनी मुलाखत घेतली. आपल्या वाचन प्रवासाबद्दल सांगताना डॉ. गीता जोशी म्हणाल्या की, ''संगमेश्वर महाविद्यालयाची लायब्ररी जणू माझं माहेर झालं. विद्यापीठाच्या खालोखाल सुसज्ज अशी ती लायब्ररी होती. तिथं मुलांना प्रवेश नव्हता. आम्ही मुलीच असायचो. पण तिथं कधी साड्यांवर, कपड्यांवर चर्चा कधी झाली नाही. केवळ अभ्यासावर चर्चा व्हायची. दमाणी साहित्य पुरस्कार समितीत मी होते. त्यामुळे नव्या साहित्यिकाचा परिचय झाला. नवं साहित्य वाचायला मिळालं.'' असं डॉ. गीता जोशी म्हणाल्या. प्रारंभी प्रिसिजन फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांनी सर्वांचं स्वागत केलं. ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी यांनी आपल्या वाचन प्रवासाविषयी मनोगत व्यक्त केलं. विद्या लिमये, डॉ. इला माटे, धनंजय गोडबोले, अशोक किल्लेदार यांनी डॉ. गीता जोशी यांच्या ''आहे कसा तो आननी'' या कथा संग्रहातील काही कथा आणि ''बहावा'' या कविता संग्रहातील काही कवितांचं अभिवाचन केलं.




**CHANGE IN NAME**

I hereby declare that my old name **Vinod Naganath Gaikwad** has been changed to new name **Vinod Nagnath Gaikwad** (As per Adhar card) R/o-post - Setalment Free co.No. 06 Solapur, North Solapur - 413001

**(Affidavit no.- 42664)**
**Date - 30/08/2024**

**CHANGE IN NAME**

I hereby declare that my old name **Naganath Manohar Gaikwad** has been changed to new name **Nagnath Manohar Gaikwad** (As per Adhar card) R/o-post - Setalment Free co.
No. 06 Solapur, North Solapur - 413001

**(Affidavit no.- 42665)**
**Date - 30/08/2024**

# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

'इंद्रभवन' डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर - ४१३००१

## सामान्य प्रशासन विभाग

जा.क्र.सआस/कक्ष.१/आस्था.८/२१ दि. ०४/०९/२०२४

## जाहीर प्रसिध्दीकरण

**आयुक्त सोलापूर महानगरपालिका यांजकडून**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

क्रमाक नआ/वै/१५०/२०१५... राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरीता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ दि. २८/०४/२०१५ लागू करण्यात आलेला आहे. सदरहू अध्यादेश निर्गमित करण्यामागे सार्वजनिक प्राधिकरणाने यापूर्वी असलेल्या सेवा अधिनियमांतर्गत अधिसूचित करुन त्याप्रमाणे संबंधित सेवा पुरविणे आवश्यक आहे. त्यामध्ये महानगरपालिका या नागरी स्थानिक संस्थाचा समावेश आहे. नागरी संस्थामार्फत देण्यात येणाऱ्या विविध सेवा-सुविधापैकी नागरिक केंद्रबिंदू मानून, नागरिकांना दैनंदिन जीवनामध्ये सातत्याने आवश्यक असणाऱ्या व ज्या लोकसेवांचा जास्तीत जास्त फायदा घेतलेला आहे व ज्या सेवा महत्त्वाच्या आहेत, अशा सेवा अध्यादेशाच्या कलम-३अ नुसार अधिसूचित करण्याबाबत महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एमसीओ-२०१५/प्र.क्र.१८९/नवि१४ दि. २३/०६/२०१५ चे शासन निर्णय घेतलेला आहे.

मा. शासन निर्णयाच्या सहपत्र ''अ'' मध्ये नमुद केलेल्या एकूण ४९ सेवा महानगरपालिकेने अध्यादेशाच्या कलम ३अ नुसार अधिसूचित करावयाच्या आहेत. त्यानुसार सोलापूर महानगरपालिका, सहपत्र ''अ'' महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५, कलम ३ अन्वये लोकसेवेची सूची. आवश्यक कागदपत्रे, फी, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी व द्वितीय अपिलीय प्राधिकारी यांचे नावे सोबत जोडलेल्या यादीत समाविष्ट आहेत.

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
**सामान्य प्रशासन विभाग**
**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम - २०१५**
**(कलम-३ अन्वये महानगरपालिकांनी जाहीर करावयाचा लोकसेवेचा तपशील)**

| अ. क्र. | लोकसेवाची सुची | आवश्यक कागदपत्र | फी र.रु. | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय प्राधिकारी | द्वितीय अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नव्याने कर आकारणी | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. मालकी हक्काची कागदपत्रे (खरेदीखत, वाटणीपत्र, बक्षीस पत्र इ.) | १,०००/- | १५ दिवस | कर निरिक्षक | कर अधिक्षक | सहा. कर मुल्य निर्धारण व संकलन अधिकारी |
| २ | पुनः कर आकरणी | विहित नमुन्यातील अर्ज | बाजार मुल्य किंवा खरेदी किंमत यापैकी जे. जास्त असेल त्याच्या १ % | १५ दिवस | कर निरिक्षक | कर अधिक्षक | सहा. कर मुल्य निर्धारण व संकलन अधिकारी |
| ३ | कराची मागणी पत्र | विहित नमुन्यातील अर्ज | ० | ३ दिवस | कर निरिक्षक | कर अधिक्षक | सहा. कर मुल्य निर्धारण व संकलन अधिकारी |
| ४ | कर माफी मिळणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>१. थकबाकी नसल्याचा दाखला | ० | ७ दिवस | कर निरिक्षक | कर अधिक्षक | सहा. कर मुल्य निर्धारण व संकलन अधिकारी |
| ५ | रहिवासी नसलेल्या मालम त्तांना करात सुट मिळणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | ० | १५ दिवस | कर निरिक्षक | कर अधिक्षक | सहा. कर मुल्य निर्धारण व संकलन अधिकारी |
| ६ | स्वयंमुल्यांकन | विहित नमुन्यातील अर्ज | ० | १५ दिवस | कर निरिक्षक | कर अधिक्षक | सहा. कर मुल्य निर्धारण व संकलन अधिकारी |
| ७ | आक्षेप नोंदविणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | ० | १५ दिवस | कर निरिक्षक | कर अधिक्षक | सहा. कर मुल्य निर्धारण व संकलन अधिकारी |
| ८ | उपविभागामध्ये मालमत्ता विभाजन | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. मालकी हक्काची कागदपत्रे (खरेदीखत, वाटणीपत्र, बक्षीस पत्र इ.) | प्रति भाग रु, ५००/- | १५ दिवस | कर निरिक्षक | कर अधिक्षक | सहा. कर मुल्य निर्धारण व संकलन अधिकारी |
| ९ | मालमत्ता पाडणे व पुनः बांधणी आकारणी | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | ० | १५ दिवस | कर निरिक्षक | कर अधिक्षक | सहा. कर मुल्य निर्धारण व संकलन अधिकारी |
| १० | नळाच्या मालकी हक्कात बदल करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. मालकी हक्क कागदपत्रे<br>३. थकबाकी नसल्याचे दखला<br>४. विभागीय अधिकारी यांचा दाखला | खरेदी किंमतीच्या १% | ७ दिवस | कर निरिक्षक | कर अधिक्षक | सहा. कर मुल्य निर्धारण व संकलन अधिकारी |
| ११ | नळ जोडणी आकारामध्ये बदल करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. मालकी हक्क कागदपत्रे<br>३. थकबाकी नसल्याचे दाखला<br>४. विभागीय अधिकारी यांचा दाखला | रु. २५/- | १५ दिवस | कर निरिक्षक | कर अधिक्षक | सहा. कर मुल्य निर्धारण व संकलन अधिकारी |
| १२ | तात्पुरते/कायम स्वरुपी नळजोडणी खंडीत करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचे दाखला | रु. २६०/- | ७ दिवस | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता |
| १३ | नळ पुनःजोडणी करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचे दाखला | रु. ५५५/- | १५ दिवस | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता |
| १४ | नळाच्या वापरामध्ये बदल करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचे दाखला<br>३. विभागीय अधिकारी यांचा दाखला | ० | १५ दिवस | कर निरिक्षक | कर अधिक्षक | सहा. कर मुल्य निर्धारण व संकलन अधिकारी |
| १५ | पाणी देयक तयार करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज | ० | ३ दिवस | कर निरिक्षक | कर अधिक्षक | सहा. कर मुल्य निर्धारण व संकलन अधिकारी |
| १६ | प्लंबर परवाना | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचे दाखला | रु. १,४३०/- | १५ दिवस | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता |
| १७ | प्लंबर परवाना नुतनीकरण करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शैक्षणिक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र<br>३. थकबाकी नसल्याचे दाखला | रु. २००/- | १५ दिवस | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता |
| १८ | थकबाकी नसल्याचा दाखला | १. विहित नमुन्यातील अर्ज | ० | ३ दिवस | कर निरीक्षक | कर अधिक्षक | सहा. कर मुल्य निर्धारण व संकलन अधिकारी |
| १९ | नादुरुस्त मीटर तक्रार करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज | ० | ७ दिवस | विभागीय अधिकारी | उपअभियंता | कार्यकारी अभियंता |
| २० | अनधिकृत नळ जोडणी तक्रार | १. विहित नमुन्यातील अर्ज | ० | ७ दिवस | विभागीय अधिकारी | उपअभियंता | कार्यकारी अभियंता |
| २१ | पाण्याची दबाव क्षमता तक्रार | १. विहित नमुन्यातील अर्ज | ० | ३ दिवस | विभागीय अधिकारी | उपअभियंता | कार्यकारी अभियंता |
| २२ | पाण्याची गुणवत्ता तक्रार | १. विहित नमुन्यातील अर्ज | ० | ३ दिवस | विभागीय अधिकारी | उपअभियंता | कार्यकारी अभियंता |
| २३ | व्यापार / व्यवसाय / साठा करणेसाठी ना हरकत प्रमाणपत्र | १. योग्यप्रकारे भरलेले अर्ज | जागाचा आकार व शिघ्र सिध्द गणकानुसार | ७ दिवस | कार्यालय अधिक्षक भूमी मालमत्ता | सहाय्यक आयुक्त | उपायुक्त |
| २४ | मंडपासाठी ना हरकत प्रमाणपत्र | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. रस्ता पुनर्स्थापन करार | जागेचा आकार व शिघ्र सिध्द | ७ दिवस | कार्यालय अधिक्षक भूमी मालमत्ता | सहाय्यक आयुक्त | उपायुक्त |
| २५ | नवीन जाहिरात / आकाश चिन्ह परवाना व परवाना नुतनीकरण | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. संबंधित म.न.पा.ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | रु. २.२०/- प्रती. चौ.मी. प्रती महा | १५ दिवस | कार्यालय अधिक्षक भूमी मालमत्ता | सहाय्यक आयुक्त | उपायुक्त |
| २६ | व्यवसाय प्रकारानुसार नवीन परवाना मिळणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | व्यवसाय प्रकारानुसार निश्चित केलेले दर | १५ दिवस | परवाना अधिक्षक | सहाय्यक आयुक्त | उपायुक्त |
| २७ | व्यवसाय प्रकारानुसार परवानेची नुतनीकरण | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | व्यवसाय प्रकारानुसार निश्चित केलेले दर | १५ दिवस | परवाना अधिक्षक | सहाय्यक आयुक्त | उपायुक्त |
| २८ | व्यवसाय प्रकारानुसार परवाना हस्तांतरण | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | रु. २१०/- | १५ दिवस | परवाना अधिक्षक | सहाय्यक आयुक्त | उपायुक्त |
| २९ | परवाना दुय्यम प्रत | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | रु. ११०/- | १५ दिवस | परवाना अधिक्षक | सहाय्यक आयुक्त | उपायुक्त |
| ३० | व्यवसायाचे नाव बदलणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | रु. २१०/- | १५ दिवस | परवाना अधिक्षक | सहाय्यक आयुक्त | उपायुक्त |
| ३१ | व्यवसाय बदलणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | व्यवसाय प्रकारानुसार निश्चित केलेले दर | १५ दिवस | परवाना अधिक्षक | सहाय्यक आयुक्त | उपायुक्त |
| ३२ | परवानाधारक / भागीदाराचे नाव बदलणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | रु. २१०/- | १५ दिवस | परवाना अधिक्षक | सहाय्यक आयुक्त | उपायुक्त |
| ३३ | भागीदाराच्या संख्येत बदल (वाढ/कमी) | विहित नमुन्यातील अर्ज | रु. २१०/- | १५ दिवस | परवाना अधिक्षक | सहाय्यक आयुक्त | उपायुक्त |
| ३४ | परवाना रद्द करणे | विहित नमुन्यातील अर्ज | ० | १५ दिवस | परवाना अधिक्षक | सहाय्यक आयुक्त | उपायुक्त |
| ३५ | कालबाह्य परवानासाठी नुतनीकरण सूचना | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | व्यवसाय प्रकारानुसार निश्चित केलेले दर | १५ दिवस | परवाना अधिक्षक | सहाय्यक आयुक्त | उपायुक्त |
| ३६ | नविन सिनेमा चित्रकरण परवाना (Movie Shooting Licance) नवीन परवाना व नुतनीकरण | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. संबंधित म.न.पा.ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | रु. १,०३०/- | १५ दिवस | परवाना अधिक्षक | सहाय्यक आयुक्त | उपायुक्त |
| ३७ | राज्याच्या खाद्य परवान्याकरिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र देणे (To Issue NOC form Municipality or Other Local Body for State Licanse for Food Bussiness) नवीन परवाना व नुतनीकरण | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. संबंधित म.न.पा.ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र<br>३. ज्या इमारतीत सदर आस्थापना / कारखाना होणार आहे. त्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र आणि सदरच्या मालकी हक्काबाबतची कागदपत्रे<br>४. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | रु. २१०/- | ३० दिवस | परवाना अधिक्षक | सहाय्यक आयुक्त | उपायुक्त |
| ३८ | खाद्य नोंदणी प्रमाणपत्र करिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे आरोग्य विषयक ना हरकत प्रमाणपत्र देणे (To Issue NOC form Municipality / Panchayar for Food Registation Certificate) नवीन | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. संबंधित म.न.पा.ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र<br>३. ज्या इमारतीत सदर आस्थापना / कारखाना होणार आहे. त्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र आणि सदरच्या मालकी हक्काबाबतची कागदपत्रे<br>४. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | रु. २१०/- | ३० दिवस | परवाना अधिक्षक | सहाय्यक आयुक्त | उपायुक्त |
| ३९ | लॉजिंग हाऊस परवाना देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे | रु. १,०३०/- प्रति वर्ष | ३० दिवस | परवाना अधिक्षक | सहाय्यक आयुक्त | उपायुक्त |
| ४० | लॉजिंग हाऊस परवान्याचे नुतनीकरण करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे | रु. १,०३०/- प्रति वर्ष | ३० दिवस | परवाना अधिक्षक | सहाय्यक आयुक्त | उपायुक्त |
| ४१ | मंगल कार्यालय / सभागृह वगैरे परवाना देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे<br>३. थकबाकी नसल्याचा दाखला<br>४. बांधकाम परवाना व वापर परवाना<br>५. प्रदुषण नियंत्रण मंडळाचा दाखला किंवा ना हरकत दाखला<br>६. अग्निशमन विभागाचा ना हरकत दाखला<br>७. विभागीय अधिकारी यांचा नळ जोडणी व मलनिःसारण जोडणी दाखला | महापालिका स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | परवाना अधिक्षक | सहाय्यक आयुक्त | उपायुक्त |
| ४२ | मंगल कार्यालय / सभागृह वगैरे परवान्याचे नुतनीकरण करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे<br>३. थकबाकी नसल्याचा दाखला<br>४. बांधकाम परवाना व वापर परवाना<br>५. प्रदुषण नियंत्रण मंडळाचा दाखला किंवा ना हरकत दाखला<br>६. अग्निशमन विभागाचा ना हरकत दाखला<br>७. विभागीय अधिकारी यांचा नळ जोडणी व मलनिःस्सारण जोडणी दाखला | महापालिका स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | परवाना अधिक्षक | सहाय्यक आयुक्त | उपायुक्त |
| ४३ | मोबाईल टॉवर परवाना (Mobile Tower Approval) (Ground Base Tower & Roof Top Tower) | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी दिलेला परवाना<br>३. संबंधित इमारतीच्या मालकी हक्काचा पुरावा<br>४. वैध भाडेकरारनामा<br>५. स्थळाचा नकाशा (१:१०००)<br>६. ज्या इमारतीवर टॉवर उभारायचा आहे. त्याचे वैध भोगवटा प्रमाणपत्र<br>७. संबंधित इमारतीच्या / जमिनीच्या मालकाचे ना हरकत प्रमाणपत्र<br>८. सक्षम प्राधिकाऱ्याचा अग्निशमन ना हरकत दाखला<br>९. सक्षम प्राधिकाऱ्याचे संरचनात्मक स्थिरता प्रमाणपत्र<br>१०. पर्यावरण विभागाची ना हरकत<br>११. संबंधित नागरी स्थानिक स्वराज संस्थेचे ना देय प्रमाणपत्र<br>१२. शासन वेळोवेळी निश्चित करेल असे इतर आवश्यक परवाने / दस्तऐवज | छाननी शुल्क रु. १०,०००/- विकास निधी Heritage Fund Free NOC Charges रु. ३०,०००/- | ६० दिवस | उपअभियंता बांधकाम परवानगी | सहाय्यक संचालक नगररचना | उपसंचालक नगर रचना |
| ४४ | रस्ता खोदाई परवानगी देणे (To Grant Road Cutting Permission) | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. संबंधित म.न.पा.ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र<br>३. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | १) डांबरी रस्ता र.रु. १,३७०/- प्रती चौ.मी.<br>२) काँक्रिट रस्ता रु. १,७४९/- प्रती चौ.मी. | ३० दिवस | विभागीय अधिकारी | शहर अभियंता | अतिरिक्त आयुक्त |
| ४५ | महाराष्ट्र शुश्रृषा-गृह नोंदणी अधिनियम १९४९ अंतर्गत शुश्रृषा-गृह परवाना देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदात्रे | ३ वर्षाकरिता रु. १०,५००/- + परतावा अनामत रक्कम रु. ३,५००/- | ३० दिवस | आरोग्य अधिकारी | सहाय्यक आयुक्त | उपायुक्त |
| ४६ | महाराष्ट्र शुश्रृषा-गृह नोंदणी अधिनियम १९४९ अंतर्गत शुश्रृषा-गृह परवान्याचे नुतनीकरण करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे | ३ वर्षांकरिता रु. १०,५०० + परतावा अनामत रक्कम रु. ३,५००/- | ३० दिवस | आरोग्य अधिकारी | सहाय्यक आयुक्त | उपायुक्त |
| ४७ | महाराष्ट्र शुश्रृषा-गृह नोंदणी अधिनियम १९४९ अंतर्गत शुश्रृषा-गृह परवान्यावर परवानाधारक / भागीदाराचे नाव बदलणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे | ३ वर्षाकरिता रु. १०,५००/- + परतावा अनामत रक्कम रु. ३,५००/- | ३० दिवस | आरोग्य अधिकारी | सहाय्यक आयुक्त | उपायुक्त |
| ४८ | फेरीवाले नोंदणी प्रमाणपत्र देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासन वेळोवळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे | महापालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित महानगरपालिकेने असा परवाना देण्याकरिता प्राधिकृत केलेला सुयोग्य व सक्षम | सहाय्यक आयुक्त | उपायुक्त |
| ४९ | महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संरक्षण आणि संरक्षण आणि संवर्धन अधिनियम १९७५ मधील कलम ८ मधील तरतुदीनुसार वृक्षतोड परवानगी देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे | महापालिका स्तरावर निश्चित केलेले दर | ४५ दिवस | संबंधित प्राधिकरणाचे वृक्ष अधिकारी | उपायुक्त | आयुक्त |

**सही/-**
**(शीतल तेली-उगले, भा.प्र.से.) आयुक्त**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

## महत्त्वाचे

### माहित संधूला सुवर्णपदक प्रांजलीने जिंकले कांस्यपदक




**हॅनोव्हर :** जर्मनीच्या हॅनोव्हर येथे आयोजित जागतिक कर्णबधिरांच्या नेमबाजी स्पर्धेत महिलांच्या ५० मीटर रायफल-प्रोन प्रकारात भारताच्या माहित संधूने २४७.४ गुणांच्या जागतिक विक्रमासह सुवर्णपदक पटकावले, तर महिलांच्या २५ मीटर पिस्तूल स्पर्धेत भारताच्या प्रांजली धुमाळने कांस्यपदक मिळवले. संधूच्या पाठोपाठ हंगेरीच्या मिरा सुझसाना व युक्रेनच्या युलिया येवतुशेन्कोने अनुक्रमे रौप्य व कांस्यपदक जिंकले. प्रांजलीने अवघ्या एका गुणाच्या फरकाने क्रोएशियाच्या लाना स्केलेडझिजाला मागे टाकले. युक्रेनच्या सोफिया ओलेनिच आणि हलीना मोसिनाने अनुक्रमे सुवर्ण आणि रौप्य पदक पटकावले. या स्पर्धेत भारताने आतापर्यंत चार सुवर्ण, सहा रौप्य आणि चार कांस्यपदक जिंकले आहेत.

### सिमरन महिलांच्या १००मीटर शर्यतीच्या अंतिम फेरीत

**पॅरिस :** फार्मात असलेल्या सिमरनने महिलांच्या १०० मीटर (टी-१२) शर्यतीच्या उपांत्य फेरीत १२.३३ सेकंद अशी वेळ नोंदवत स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. अभय सिंगच्या मार्गदर्शनाखाली सराव करणाऱ्या २४ वर्षीय सिमरनने उपांत्य फेरीत जर्मनीच्या कॅटरिन म्यूलर-रॉटगार्ड हिच्या पाठोपाठ दुसरे स्थान पटकावले. बुधवारी उष्ण वातावरणात झालेल्या प्राथमिक फेरीत सिमरनने १२.१७ सेकंद अशी वेळ नोंदविली होती. सिमरन, म्यूलर-रॉटगार्ड यांच्याशिवाय युक्रेनची ओक्साना बोटर्चुक, पॅरालिम्पिक विजेती व क्युबाची विश्वविक्रमवीर ओमारा दुरांड या अंतिम फेरीत अव्वल स्थानासाठी स्पर्धा करतील.

# भारताची पॅरालिम्पिकमध्ये सर्वोत्तम कामगिरी

## ५ सुवर्णांसह एकूण पदकसंख्या २५ ● धर्मवीरला सुवर्ण, प्रणव सुरमाला रौप्यपदक

**◆ पॅरिसर, ५ सप्टेंबर**

पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत पुरुषांच्या क्लब थ्रोमध्ये भारताने दुहेरी यश संपादन केले असून या स्पर्धेत धर्मवीरने सुवर्णपदक, तर प्रणव सुरमाने रौप्यपदक जिंकले. या दोन पदकांसह पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारताच्या पदकांची संख्या २५ झाली आहे. भारताने आतापर्यंत ५ सुवर्ण, ८ रौप्य आणि १२ कांस्यपदके जिंकली आहेत. ही भारताची पॅरालिम्पिकमधील आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी ठरली आहे.


आपल्या चमूसोबत हस्तांदोलन करताना धर्मबिर

टोकियो पॅरालिम्पिकमध्ये भारताने ५ सुवर्ण, ८ रौप्य व ६ कांस्यपदकांसह १९ पदकांची सर्वोत्तम कामगिरी केली होती. टोकियोतील या कामगिरीला मागे टाकत भारताने पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये सर्वाधिक पदके जिंकण्याची किमया केली आहे.

पुरुषांच्या क्लब थ्रो (एफ-५१) स्पर्धेत धर्मवीरने उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक जिंकले. त्याने आपल्या चौथ्या प्रयत्नांत ३४.९२ मीटर कामगिरी करून सुवर्णपदकाचा मान मिळवला, तर प्रणव सुरमाने आपल्या पहिल्या एटीएपीमध्ये ३४.५९ मीटरची कामगिरी करत रौप्यपदक जिंकले. सर्बियाचा जेलफो दिमित्रीजविक कांस्यपदक जिंकण्यात यशस्वी ठरला. जेलफोने ३४.१८ मीटर अशी सर्वोत्तम कामगिरी केली. आणखी एक भारतीय अमित कुमार सरोहा निराश झाला व त्याने २३.९६ मीटच्या कामगिरीसह १० वे स्थान मिळविले. सध्याच्या पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत भारताचे हे पाचवे सुवर्णपदक ठरले. ◀(वृत्तसंस्था)

## पॅरिस पॅरालिम्पिक २०२४ मधील भारताचे पदकविजेते



- १. **अवनी लेखरा (नेमबाजी)**- सुवर्णपदक, महिलांचे १० मीटर एअर रायफल (एसएच १)
- २. **मोना अग्रवाल (नेमबाजी)**- कांस्यपदक, महिलांचे १० मीटर एअर रायफल (एसएच १)
- ३. **प्रीति पाल (ॲथलेटिक्स)**- कांस्यपदक, महिलांची १०० मीटर शर्यत (टी ३५)
- ४. **मनीष नरवाल ((नेमबाजी)**- रौप्य पदक, मेन्स १० मीटर एअर (एसएच १)
- ५. **रुबिना फ्रान्सिस (नेमबाजी)**- कांस्यपदक, महिलांचे १० मीटर एअर पिस्तूल (एसएच १)
- ६. **प्रीति पाल (ॲथलेटिक्स)**- कांस्यपदक, महिलांची २०० मीटर शर्यत (टी-३५)
- ७. **निशाद कुमार (ॲथलेटिक्स)**- रौप्य पदक, पुरुष उंच उडी (टी-४७)
- ८. **योगेश कथुनिया (ॲथलेटिक्स)**- रौप्यपदक, पुरुष थाळीफेक (एफ ५६)
- ९. **कुमार (बॅडमिंटन)**- सुवर्णपदक, पुरुष एकेरी (एसएल ३)
- १०. **मनीषा रामदास (बॅडमिंटन)**- कांस्यपदक, महिला एकेरी (एसयू ५)
- ११. **थुलासिमथी मुरुगेसन (बॅडमिंटन)**- रौप्यपदक, महिला एकेरी (एसयू ५)
- १२. **सुहास एल. यथीराज (बॅडमिंटन)**- रौप्यपदक, पुरुष एकेरी (एसएल))
- १३. **शीतल देवी-राकेश कुमार (तिरंदाजी)**- कांस्यपदक, मिश्र कम्पाऊंड ओपन
- १४. **सुमित अंतिल (ॲथलेटिक्स)**- भालाफेक (एफ-६४)
- १५. **नित्या श्री शिवन (बॅडमिंटन)**- कांस्यपदक, महिला एकेरी (एसएच ६)
- १६. **दीप्ती जीवनजी (ॲथलेटिक्स)**- कांस्यपदक, महिलांचे ४०० मीटर (टी-२०)
- १७. **मारियप्पन थंगावेलू (ॲथलेटिक्स)**- कांस्यपदक, पुरुष उंच उडी (टी-६३)
- १८. **शरद कुमार (ॲथलेटिक्स)**- रौप्यपदक, पुरुष उंच उडी (टी-६३)
- १९. **अजित सिंग (ॲथलेटिक्स)**- रौप्यपदक, पुरुष भालाफेक (एफ-४६)
- २०. **सुंदरसिंग गुर्जर (ॲथलेटिक्स)**- कांस्यपदक, भालाफेक (एफ-४६)
- २१. **सचिन सर्जाराव खिलारी (ॲथलेटिक्स)**- रौप्यपदक, पुरुष गोळाफेक (एफ-४६)
- २२. **हरविंदर सिंग (तिरंदाजी)**- सुवर्णपदक, वैयक्तिक रिकर्व्ह तिरंदाजी.
- २३. **धर्मवीर (ॲथलेटिक्स)**- सुवर्णपदक, पुरुष क्लब थ्रो (एफ-५१)
- २४. **प्रणव सुरमा (ॲथलेटिक्स)**- रौप्यपदक, पुरुष क्लब थ्रो (एफ-५१)

# हरविंदर सिंगने घडवला इतिहास

**◆ पॅरिस, ५ सप्टेंबर**

पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत बुधवारी रात्री उशिरा भारताचा पॅरा तिरंदाज हरविंदर सिंगने सुवर्णपदक जिंकले आहे. पॅरालिम्पिकच्या इतिहासात भारताने प्रथमच तिरंदाजी स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. ३३ वर्षीय हरविंदर सिंगने पुरुषांच्या वैयक्तिक रिकर्व्ह तिरंदाजी स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पोलंडच्या लुकाझ सिजॅकचा ६-० असा पराभव केला. सध्याच्या पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत हे भारतातील चौथे सुवर्णपदक होते.



**हरविंदरचा अंतिम फेरीचा प्रवास**

हरविंदर सिंगने चीन तैपेईच्या सांग लंग हूला ७-३ ने पराभूत केल्यानंतर इंडोनेशियातील सेटियवान सेतियवानला ६-२ ने पराभूत केले. त्यानंतर त्याने उपांत्यपूर्व फेरीत कोलंबियाच्या हेक्टर ज्युलिओ रामेराझचा ६-२ असा पराभव केला. त्यानंतर हरविंदरने उपांत्य फेरीत इराणच्या प्रतिस्पर्धी मोहम्मद रझा अरब अमेरीला ७-३ ने पराभूत केले.

**कोण आहे हरविंदर सिंग**

हरयाणातील अजित नगरच्या शेतकरी कुटुंबातील हरविंदर सिंग दीड वर्षांचा असताना त्याला डेंगू झाला होता व उपचारार्थ त्याला इंजेक्शन देण्यात आले, परंतु दुर्दैवाने या इंजेक्शनच्या दुष्परिणामांमुळे त्याने पायाची गतिशीलता गमावली.

प्रारंभिक आव्हाने असूनही तो तिरंदाजीचे धडे गिरवू लागले. २०१८ जकार्ता आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धेत त्याने सुवर्णपदक पटकावले. हरविंदरने तीन वर्षांपूर्वी टोकियो पॅरालिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकून इतिहास घडवला, तो पॅरालिम्पिक पदक जिंकणारा भारताचा पहिला तिरंदाज ठरला. हरविंदर हा अर्थशास्त्रात पीएच.डी. पदवीही घेत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुवर्णपदक विजेता हरविंदर सिंगचे अभिनंदन केले आहे. ◀(वृत्तसंस्था)

# ज्युडोपटू कपिल परमारला कांस्य

**◆ पॅरिस, ५ सप्टेंबर**



पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये गुरुवारी भारतीय ज्युडोपटू कपिल परमारने पुरुषांच्या ६० किलो वजनी गटात ऐतिहासिक कांस्यपदक पटकावले. कपिलने प्रथमच भारताला ज्युडो खेळातून पदक जिंकून दिले. या पदकाबरोबरच भारताची पदक संख्या २५ झाली आहे.


कांस्यपदकासाठी झालेल्या लढतीत कपिल परमारने अवघ्या ३३ सेकंदात ब्राझीलच्या एलिल्टन डी ऑलिव्हिएरावर सरळ १०-० गुणाने मात केली. भारताला आणखी एका पदकाची आशा होती. तिरंदाज पूजा व हरविंदर सिंगने मिश्र सांघिक रिकर्व्ह खुल्या प्रकारात कांस्यपदकासाठी स्लोव्हेनियाच्या झिव्हा लॅवरिंक-डेजान फॅबकिक यांच्याविरुद्ध झुंज दिली, परंतु त्यांचे शर्थीचे प्रयत्न अपुरे पडले. भारतीय जोडीला स्लोव्हेनियाच्या जोडीकडून पराभव पत्करावा लागला. ◀(वृत्तसंस्था)

# साईश्वर गुंटूकचा १०० दिवसांत
## २८२२ किमी रनिंग चॅलेंजचा नवा विक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

जुळे सोलापूर येथील स्वामी विवेकानंद प्रशालेत इयत्ता नववीमध्ये शिकणारी येथील राष्ट्रीय धावपटू साईश्वर केशव गुंटूक याने सायरन स्पोर्ट्सतर्फे आयोजित हंड्रेड डेज ऑफ रनिंग चॅलेंज या १०० दिवसीय रनिंग स्पर्धेत दुसऱ्यांदा सहभाग नोंदवला असून त्या स्पर्धेत १०० दिवसात २ हजार ८२२ किमी अंतर पार करून एक नवा उपक्रम करत विक्रम आपल्या नावे प्रस्थापित केले आहे. दररोज सरासरी २८.२२ किमी एव्हढे अंतर पूर्ण करून हे एक आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा यशस्वीरीत्या पूर्ण केले. त्याबद्दल सायरन स्पोर्ट्सचे डायरेक्टर मयंक गुप्ता यांच्याकडून साईश्वरला प्रमाणपत्र देण्यात आले.

गेल्या ६ वर्षांपासून विजयपूर व गुलबर्गा येथील सिंथेटिक ट्रॅकवर आपला लाँग रनिंगचा सराव करता करता त्यातलाच एक भाग म्हणून हे चॅलेंज पूर्ण केले आहे. याअगोदरही साईश्वरने १० किमी, २१ किमी, ३३ किमी, ४२ किमी व ५१ किमी अंतर रनिंगमध्ये सहभाग नोंदवून वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये आपले नाव कोरले. तसेच हाही चॅलेंज कमीत कमी वेळेत पूर्ण केल्याबद्दल आयुक्त एम. राजकुमार यांनी साईश्वरचे कौतुक केले. साईश्वरला सिनियर ऑलिम्पियन केशवराज सिंह यांचे मार्गदर्शन व प्रशालेचे प्राचार्य अंबादास पांढरे, प्राचार्य चिदानंद माळी, क्रीडा शिक्षक कृष्णा कोळी आदींचे मार्गदर्शन लाभले.


पोलिस आयुक्त एम.राज कुमार यांच्याबरोबर धावताना साईश्वर गुंटुक.



# तंत्रज्ञानाच्या युगात, संस्कार शिक्षकच देऊ शकतो

## ● कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर; आर्यनंदी शिक्षक पुरस्काराचे वितरण



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ५ सप्टेंबर-**

शिक्षक हा समाजाचा केंद्र बिंदू असून, त्यांच्या अध्यापनामुळे मुलांना ज्ञान प्राप्त होते. शिक्षण मातृभाषेत असावे, ज्यामुळे मुलाचा बौद्धिक विकास लहानपणापासून योग्य रीतीने होतो. आजच्या डिजिटल युगामध्ये सर्व काही आपणास लगेच अवगत होते परंतु संस्कार शिकवण्यासाठी हाडाचा शिक्षकच गरजेचा आहे. तसेच त्यांनी सोलापूर विद्यापीठ अंतर्गत विविध नविन अभ्यासक्रम सुरु केले आहेत, त्याचा विद्यार्थांनी लाभ घ्यावा, असे आवाहन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर यांनी केले.

आर्यनंदी नागरी सहकारी पतसंस्था व आर्यनंदी एज्युकेशन अँड रिसर्च फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने शिवस्मारक सभागृह येथे कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच डॉ. प्रगती बागल, ज्येष्ठ पत्रकार अभय दिवाणजी यांच्या प्रमुख उपस्थितीत आर्यनंदी आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४ चे वितरण करण्यात आले. यावेळी संस्थाध्यक्ष डॉ. राजेश फडकुले, उपाध्यक्ष बाहुबली दुरूगकर, संस्थेचे संचालक प्रा. प्रेमचंद मेने, निलेश एखंडे, डॉ. सुरेश व्यवहारे आर्यनंदी निधी लि.च्या संचालिका डॉ. सौ. शिल्पा फडकुले, मुख्य कार्यकरी अधिकारी श्री वैभव आहेरकर व्यासपीठावर विराजमान होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प. पू. १०८ आचार्य आर्यनंदी महाराज व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक संस्थापक अध्यक्ष डॉ. राजेश फडकुले यांनी केले. प्रमुख अतिथी डॉ. प्रगती बागल यांनी पतसंस्थेच्या कार्याचे कौतुक केले. आर्थिक क्षेत्रात काम करत असताना, सामाजिक बांधिलकी जपणारी पतसंस्था असा उल्लेख त्यांनी केला. यावेळी सर्व पुरस्कार प्राप्त शिक्षकांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी संस्थेचे संचालक मनोहर नारायणकर, प्रविण बुर्से, अनुपमा रणदिवे, उमा तम्मनवार, सल्लागार सदस्य मोहनदास गुमते, अशोक भालेराव, शोभना सागर, श्रीमती मंजिरी सवळे, विलास कटके, विश्वजित आहेरकर उपस्थित होते. याप्रसंगी आर्यनंदी पतसंस्थेचे सर्व अधिकारी व कर्मचारी वृंद उपस्थित होते. सूत्रसंचालन दिपाली दुरुगकर, मयुरी दुरुगकर यांनी तर आभार संचालक निलेश एखंडे यांनी केले.

**● आर्यनंदी आदर्श शिक्षक पुरस्काराचे मानकरी**

डॉ. अंजली शिरसी (सु. रा. मुलींची प्रशाला, सेवासदन), वैशाली शहापुरे (स्वामी विवेकानंद शाळा), आफरीन दिंडोरे (म.न.पा. मुलांची उर्दू केंद्र शाळा क्र.७), प्रमिला निंबर्गी (नू.म.वि. मराठी शाळा), सुवर्णा केत (सहस्त्रार्जुन प्राथमिक विद्यामंदिर), उमा कुलकर्णी (शरदचंद्रजी पवार प्राथ. शाळा), आनंद दुरुगकर (म.फ. दमाणी प्राथ.विद्यामंदिर), संजय जवंजाळ (हर्षवर्धन हायस्कूल, हिप्परगे (तळे), सुभाष नागरसे (श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय), संगीता संतोष रेळेकर (सकुबाई हिराचंद नेमचंद प्रशाला), रामचंद्र धर्मसाले (ज्ञानसंपदा प्रशाला), प्रशांत शिंपी (संगमेश्वर कॉलेज), संभूदेव गावडे (छत्रपती शिवाजी सायंकाळ कला व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय), के. परमेश्वर (कुमठे माध्य. प्रशाला, कुमठे) यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

# अक्कलकोटच्या कुस्ती स्पर्धेत १६० मल्लांचा सहभाग

## ● प्रसादरुपी खुराक मानांकन चाचणी कुस्ती स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ५ सप्टेंबर-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वछस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली 'प्रसादरुपी खुराक मानांकन चाचणी कुस्ती स्पर्धा फतेसिंह क्रिडांगण इन्डोअर स्टेडियम येथे सुरु झाली. या स्पर्धेस १६० कुस्तीपटूंनी सहभाग नोंदविला होता.

स्पर्धेत १० ते १४ वयोगटातील यशस्वी कुस्तीगीरांना खुरका दिला जाणार असून ही तालुक्यात प्रथमच मॅटवरील कुस्ती स्पर्धा संपन्न झाले आहे.अमोलराजे भोसले यांच्याकडून यशस्वी कुस्तीगीरांना ट्रॅकसूट देण्यात येणार आहे. श्रींचे पूजन न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, संतोष भोसले, ॲड. संतोष खोबरे, उषाताई हंचाटे, डॉ.आर.व्ही. पाटील, मनोज निकम, मौलाली शेख, मारुती वडार, शाहू मगर, धनराज भुजबळ, तानाजी भोसले, मुख्याध्यापक नंदाजी कदम यांच्या उपस्थितीत झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अरविंद शिंदे, क्रीडा भारतीचे अभिजित लोके यांनी सूत्रसंचालन केले. गोटू माने यांनी आभार मानले.



**कुस्ती क्षेत्राला अच्छेदिन :** कुस्तीला उभारणी व नव चालना, संजीवनी मिळण्यासाठी, नवोदित पैलवानांच्या पाठीवरती कौतुकाची थाप मिळावी, अनेक होतकरू, कष्टकरी पैलवान समोर यावेत याकरिता गत जानेवारी पासून न्यासाकडून प्रसाद रुपी खुराक देण्यात येत आहे. सध्या कुस्तीक्षेत्रामध्ये वैविध्यपूर्ण आणि विकासात्मक प्रयत्न सर्व स्तरातून केले जात आहेत. अनेक मैदानामध्ये नवोदीत होतकरू आणि चांगल्या पैलवानांना पाठबळ मिळवून देण्यासाठी अनेक वस्ताद मंडळी झटत असतात. खऱ्या अर्थाने विविध तालमीतील उदयोन्मुख पैलवान जपत असतात. कुस्ती जगवताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. हे ओळखून श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील कुस्तीगीरांना न्यासाकडून प्रसाद रुपी खुराक देण्यात येत आहे. त्यामुळे कुस्तीगीरांना अच्छे दिन आले आहेत.

**- उपमहाराष्ट्र केसरी पै.भरत मेकाले, सोलापूर**

Pradnya Niketan Education Society, Pune.
**N. K. ORCHID COLLEGE OF ENGG. & TECH., SOLAPUR.**
Gut No. 16, Solapur-Tuljapur Road, Tale Hipparaga, Solapur-2.
**Phone No. : 9423084363**
website : www.orchidengg.ac.in email : office@orchidengg.ac.in
**FE ADMISSIONS 2024-25 AGAINST CAP VACANT SEAT**
*Applications are invited for admission to the **First Year** Engineering Courses for various branches from eligible candidates for* **Probable Vacant Seats after CAP Rounds.** *Interested candidates seeking admission should apply on or* ***before 10/09/2024 upto 11.00 p.m.*** *Admission schedule will be displayed on College website & Notice Board.*
Date : 06/09/2024 PRINCIPAL

### सोलापूर जिल्हा ज्युनिअर ॲथलेटिक्स स्पर्धा रविवारी

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

दोन वेळा पावसामुळे स्थगित झालेली मैदानी स्पर्धा रविवारी ८ सप्टेंबर रोजी सोरेगाव येथील एसआरपीफ मैदानावर सकाळी ९ वाजता पासून सुरू होईल. इच्छुक खेळाडूंनी ॲथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडियाचे युआयडी क्रमांक प्राप्त करून घ्यावे. माहितीसाठी संपर्क : राजू प्याटी (मो. ९३२६०५५९४०).

# शिक्षकांनी संस्कारक्षम पिढी निर्माण करावी

## ● साध्वी प्राचीश्रीजी : बसवेश्वर विचार मंच शिक्षक पुरस्कारांचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

'शिक्षकांनी शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना संस्काराचेही पाठ द्यावे. संस्कारक्षम पिढी निर्माण करण्याची जबाबदारी आज शिक्षकांवर आहे. पुस्तकी ज्ञानाबरोबरच विद्यार्थ्यांवर उत्तम संस्कारही करावेत' असे प्रतिपादन प्रवचन प्रभाविका साध्वी प्राचीश्रीजी यांनी केले.

बसवेश्वर विचार मंचच्यावतीने शिक्षक दिनाचे औचित्य साधून आयोजित आदर्श शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व उपक्रमशील शाळा पुरस्कार वितरण समारंभात ते बोलत होते.पूज्य साध्वी प्राचीश्रीजी व प्रसन्नाजी यांच्या मंगल सानिध्यात आमदार विजयकुमार देशमुख यांचे हस्त या समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानी सहस्त्रार्जुन शैक्षणिक संस्थेचे सचिव गजानन गोयल हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष दिलीप पतंगे, जैन स्थानकवासी संघाचे अध्यक्ष पदम राका, गौतम संचेती आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी आ. विजयकुमार देशमुख यांचे हस्ते शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व उपक्रमशील शाळांचा सन्मान करण्यात आशुतोष पुरवंत यांनी प्रास्ताविक केले. अतिथींचा सत्कार शैलजा पुरवंत, सायरा मोगल यांचे हस्ते करण्यात आला. चित्रा रंपुरे -धाराशिवकर व दत्ता भोसले यांनी सत्कारास उत्तर दिले. सूत्रसंचालन मल्लेश पुरवंत, आभार सचिन मोरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नागेश्वरी भागानगरे,अणवीर किणगी,बसवराज किणगी, सौ. इंदू किणगी, सचिन मोरे, सायरा मोगल यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल पतसंस्था फेडरेशनचे जिल्हाध्यक्ष दिलीप पतंगे, दैनिक तरुण भारतच्या मुख्य संपादक प्रशांत माने, डॉ. अंजली शिरशी, तुकाराम जाधव, मोहन पाटील, गेनसिद्ध चाबुकस्वार यांचाही सत्कार



**पुरस्काराचे मानकरी**

सौ.गीताभारती रामपुरे, सौ.सुनंदा बिराजदार-एस.व्ही.सी.एस., शंकर नाना आवताडे- मुख्याध्यापक,जवाहरलाल शेतकरी हायस्कूल मंगळवेढा,वसंत पवार जागृती विद्या मंदिर,बाळासाहेब शिंगाडे -विवेक वर्धनी विद्यालय व कनिष्ठ विद्यालय पंढरपूर, सुहास छंचुरे -श्राविका प्रशाला , सौ.नीता येरमाळकर - मुख्याध्यापिका-स. हि.ने. प्रशाला, सौ. चित्रा रंपुरे-धाराशिवकर -डॉ. आंबेडकर मेमो.नाईट हायस्कूल,सौ.वैशाली कदम -दयानंद मॉडेल स्कूल,मारुती माने- मल्लिकार्जुन हायस्कूल हत्तुरे वस्ती, रमेश यादवाड- मुख्याध्यापक श्री.न. फु.शहा कोठारी हायस्कूल, सौ.उषा क्षीरसागर- श्री.बसवेश्वर मराठी विद्यालय विडी घरकुल, खालीद अब्दुलरजाक- न्यू कस्तुरबा उर्दू प्रायमरी स्कूल आदि शिक्षकांचा तसेच प्रकाश आळंगे -श्री. सहस्त्रार्जुन प्रशाला, चंद्रकांत नवत्रे -व्हीव्हीपी तंत्रनिकेतन, दत्ता भोसले -छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज,वाल्मिकी उर्फ सचिन झुंजारराव-दयानंद महाविद्यालय, संतोष हिरोळे-मातोश्री सरस्वती चाकोते प्रशाला, डॉ.अभिजीत जगताप- आरोग्य अधिकारी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ ,सोलापूर, आप्पासाहेब चव्हाण -दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा तर उपक्रमशील शाळा म्हणून सहस्त्रार्जून शिक्षण संकुल, पंचशील प्राथमिक व माध्यमिक प्रशाला, छत्रपती शिवाजी प्रशाला, आयडियल उर्दू प्राथमिक व माध्यमिक शाळा यांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात.

# शेताकडून घरी येताना दुचाकीस्वारास धडक

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

काटी वडगाव रोडवर शेताकडून घरी येताना समोरून येणाऱ्या (एम एच.१३.डीपी.४८७३) दुचाकीस्वाराने धडक दिल्याची घटना ४ सप्टेंबर रोजी घडली.यात लिंगराज तानाजी गिरे (वय-४५, रा. मु.पो मार्डी ता.उ.सोलापूर) हे जखमी झाले. उपचारासाठी भाऊ अजय गिरे यांनी दाखल केले.

# खेळताना पडल्याने मुलगा जखमी

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

राहत्या घरी खेळत असताना पाय घसरून पडल्याने मुलगा जखमी झाला आहे. ही घटना चार सप्टेंबर रोजी घडली. यात आरुष इश्वर खंडागळे (वय-५ रा.भिमनगर शेळगी) हा जखम झाला. उपचारास आई नेहा खंडागळे यांनी दाखल केले.

# गोड बोला, शुभ बोला : साध्वी प्राचीश्रीजी

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

आपली वाणीच खरा अलंकार होय.वाणीने मनुष्य शोभून दिसतो. बोलताना शब्दात माधुर्य असावे, असे प्रतिपादन प्रवचन प्रभाविका साध्वी प्राचीश्रीजी यांनी केले.




आपले विचार, आचार, कर्म, वाणी आणि गुण सुंदर असतील तर इतर दागिन्यांची गरज नाही.सुंदर विचार हाच खरा दागिना होय. आपल्या प्रत्येक कृतीला विचारांचे अधिष्ठान हवे. दुसऱ्याला ऐकावसं वाटेल असेच बोला. गोड बोला,शुभ बोला. काया, वाचा व मनाने कोणालाही दुखवू नका. पूर्वी मुलांना शाळेत आठव्या वर्षी घातले जात. आज दुसऱ्याच वर्षी मुलांना शाळेत घातले जाते. शाळेत घालण्यामागचे कारण देखील म जेशीर असते. तेवढेच घरात चार तास शांतता लाभेल म्हणून मुलांना शाळेत सोडतात. पालकच जर मुलांना असे दूर लोटत असतील तर कसे? ज्या वयात आई-वडिलांची सोबत हवी त्याच वयात शाळेत घातले जाते. त्यामुळे नकळत दुरावा निर्माण होतो. मुले ऐकत नाहीत अशी बऱ्याच पालकांची तक्रार असते. मुलांना प्रेमाने समजावून सांगा. जीन्स आणि टी-शर्टच्या जमान्यात आज पदर दिसत नाही. घरातील मान मर्यादा पाळा. आदर्श पालक बना. आज पर्युषण पर्वाचा पाचवा दिवस म्हणजेच नक्षत्रानुसार भगवान महावीरांचा जन्म ोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

## दुचाकीने महिलेस ठोकरले

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

राहुटी येथे (गणेश पेट्रोलपंप जवळ) थांबले असता (दुचाकी एम एच १३ इ डी १८६९) या दुचाकी वाहनाने धडक दिल्याची घटना घडली. यात सुष्मा बाळू जाधव (वय-५०, रा. कोंडी उ. सोलापूर) या जखमी झाल्या. उपचारासाठी सिव्हिलमध्ये भाचा समाधान भोसले याने दाखल केले.

## निधन वार्ता...

### उद्धव मोटे

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**



शिंगोली ता. मोहोळ, जि. सोलापूर येथील दूरसंचार कर्मचारी (बीएसएनएल) उद्धव खंडू मोटे (वय ६९) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन सुना, नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते संजय मोटे यांचे ते वडील होते.

### भगवान सुरते

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**



सुरतगांव (ता.तुळजापूर) येथील रहिवासी विलास भगवान सुरते (वय ७०) यांचे अल्पशा आजाराने गुरुवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, तीन मुलं असा परिवार आहे.

### उत्तमराव खरात

**पिलीव, दि. ५ सप्टेंबर-**



पिलीव येथील ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष उत्तमराव विठोबा खरात (वय ८२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, चार मुली, सून, नातवंडे, जावई असा परिवार आहे.


## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकास विशेषतः मोजे गाताचीबाडी, ता. बार्शी व आसपासचे लोकास खालील सही करणारे आमचे अशिलातर्फे सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि.सोलापूर सब डि, ता.बार्शी पैकी मौजे गाताचीवाडी येथील जमीन ग.नं.१६ यापैकी क्षेत्र १.३०.५० आर चौ.मी.आकार रु.२.०९ पैकी यापैकी प्लॉट नं.१० याचे क्षेत्र ० हे.२० आर यासी चतुःसिमा पुर्वेस बार्शी ताडसौंदणे रस्ता, पश्चिमेस गुळमे यांची ग.नं. १५ ची जमीन, दक्षिणेस सतिश अंधारे यांची ग. न.१६ मधील उर्वरित जमीन उत्तरेस सचिन डमरे यांची मिळकत. येणेप्रमाणे वर्णनाचा खुला प्लॉट आतील तदंगभूत वस्तुसह.

वर नमूद मिळकत ही सतिश मालन अंधारे यांची स्वसंपादीत खरेदी मालकीची व कब्जे वहिवाटीची व ७/१२ हक्कपत्रकी नोंदलेली असून सदर मिळकत त्यांनी त्यांचे कायदेशीर गरजेपोटी विक्रोस काढून ती आमचे खरेदीदार अशिल १) उषा महादेव ढाकणे व प्रदीप विष्णू घोळवे यांना कायम खुष खरेदी देण्याचे ठरवून आमचे अशिलाकडून इसाराची रक्कम स्विकारली आहे, सदरहू मिळकत निर्वेध निजोखमी असल्याची हमी व खात्री आमचे अशिलास दिलेली आहे.

याउपर नमूद मिळकतीबाबत कोणाचे कांही साठेखत, गहाणखत, वारसा हक्क वहिवाटीचा हक्क, नजरगहाण, खरेदीखत, भाडेपट्टा, दान, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, बोजा, वाटणीपत्र, मृत्यूपत्र, कोर्ट केसेस, किंवा तत्सम स्वरुपाचे हस्तांतराचे व्यवहार असलेस संबंधीतांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ८ (आठ) दिवसाचे आत कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकती खालील पत्त्यावर द्याव्यात अन्यथा नमूद मिळकत निर्वेध, निजोखमी व खरेदीयोग्य आहे असे समजून ठरले मुदतीत कायम खुष खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मग मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे.

ही जाहीर नोटीस दिली. तारीख : ०५/०९/२०२४

सही/-
**अॅडव्होकेट दैवशाला सोपान जाधवर**
. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी,
ता. बार्शी
मो.नं.८२०८३२८५६२
(अशिलातर्फे अंडव्होकेट)



## जाहीर नोटीस

**सोलापूर येथील मे. लवाद अधिकारी श्री. संजय आर करवा साहेब यांचे न्यायालयात**

श्री अरुणोदय मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि; सोलापूर - अर्जदार/वादी
विरुध्द
श्री. सालेगाव अश्विनी सुरेश - वगैरे ३ - जाबदार/प्रतिवादी

| अ. क्र. | लवाद अर्जदार | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | ०५/२०२४ | नं : ३ बंडेवार व्यंकटेश अशोक ७ अ, गणेश मंदिर जवळ, यशवंत सहकारी गृह निर्माण सोसायटी, दक्षिण सोलापूर, सोलापूर ४१३००६ | १,७८,८३२/- | १२/०९/२०२४ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. ३ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस नं. ३ ची नोटीस अपुरा पत्ता कारणाने परत आल्यामुळे नं. ३ यांची नोटीस बजावणीचा रिपोर्ट अर्जदारास आलेला नाही या कारणाने परत आल्यामुळे नं. ३ यांची सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी वार शुक्रवार दि. १२/०९/२०२४ सकाळी ११.३० वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसाद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक : ३१/०८/२०२४ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**श्री अरुणोदय मल्टी-स्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि; सोलापूर**

**ठिकाण** : श्री. अरुणोदय मल्टी-स्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि; सोलापूर
**पत्ता** : प्लॉट नं. ७७ भाग्यलक्ष्मी पार्क, जुळे सोलापूर, सोलापूर ४१३००४

**सही/-**
**दिपक भा. केसकर**
(बी.ए.एलएल.एम अॅडव्होकेट)
ऑफिस : प्राची अपार्टमेंट फ्लॅट नं. ९, २२४/९, सिव्हील लाईन, गांधी नगर, हॉटेल त्रिपुरसुंदरीच्या मागे, सोलापूर.



स्थापना दि.२४/११/१९७९
रजि.एस.यु.आर./पी.आर.जी./(अे) ७ दि. २८/०१/१९८०

## डॉ. भाई गणपतराव देशमुख शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले

**तालुका - सांगोले, जिल्हा - सोलापूर**

**अधिमंडळाच्या ४५ व्या वार्षिक सर्वसाधारण बैठकीची नोटीस**

**(फक्त सभासदांसाठी)**

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, डॉ. भाई गणपतराव देशमुख शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले या संस्थेची ४५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक २४/०९/२०२४ रोजी दुपारी १.०० वाजता खालील कामकाजासाठी सूत गिरणीवर बोलाविण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी सदर सभेस अवश्य उपस्थित रहावे, ही विनंती.

**जा.क्र. डॉ.भागदेशेससूगि/ अ.वा.सा.बै./२६२/२०२४ सांगोले, दि. ०६/०९/२०२४**

**संचालक मंडळाचे आदेशावरुन डॉ. प्रभाकर माळी, चेअरमन, डॉ. भाई गणपतराव देशमुख शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले**

**बैठकीपुढील विषय**

**विषय क्र. १ :-** मागील दि.२६-०९-२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.
**विषय क्र. २ :-** सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल, ताळेबंद पत्रक, नफा-तोटा पत्रक आणि उत्पादन व व्यापारी पत्रक इत्यादि हिशोब पत्रके मंजूर करणे.
**विषय क्र. ३ :-** सन २०२३-२०२४ च्या अंतर्गत लेखापरीक्षण अहवालाची वाचून नोंद घेणे.
**विषय क्र. ४ :-** सन २०२३-२०२४ च्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालाची वाचून नोंद घेणे.
**विषय क्र. ५ :-** सन २०२२-२०२३ च्या शासकीय लेखापरीक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालाची वाचून नोंद घेणे.
**विषय क्र. ६ :-** सन २०२४-२०२५ साठी वैधानिक लेखापरीक्षकाची नेमणूक करणे.
**विषय क्र. ७ :-** सन २०२४-२०२५ करीता संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
**विषय क्र. ८ :-** सन २०२४-२०२५ करीता बाहेरील कर्ज उभारणीची मर्यादा ठरविणे बाबत.
**विषय क्र. ९ :-** शेतकऱ्यांकडून कच्चा कापूस खरेदी करणे बाबत विचार करणे.

**मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी सभेपुढे येणाऱ्या विषयांवर विचार विनिमय करणे.**

**टीप :-**
१) गणपूर्तीच्या अभावी सभा तहकूब झाल्यास ही सभा एक तासानंतर त्याच ठिकाणी त्याच दिवशी घेतली जाईल, त्यास गणपूर्तीची आवश्यकता भासणार नाही.
२) सभासदांना कांही प्रश्न विचारावयाचे असल्यास त्या बाबतच्या सूचना दिनांक १६/०९/२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत संस्थेकडे पोहचतील या बेताने पाठवाव्यात.
३) सभेस उपस्थित राहून कामकाजात भाग घेण्यासाठी संस्था प्रतिनिधी बाबतचा ठराव संस्था सभासदांनी दिनांक १६/०९/२०२४ पर्यंत संस्थेकडे पाठवावा.
४) उपरोक्त विषया संबंधीची माहिती संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळी अवलोकनार्थ उपलब्ध होईल.
५) ज्या सभासदानी वारस नोंद केलेली नाही त्यांना वारस नोंद करणे विषयी विनंती आहे.
६) सभासदांनी सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सलग्न शाखेतील त्यांचा बँक खाते नंबर गिरणीकडे कळवावा, ही विनंती.
७) ९७ व्या घटना दुरुस्ती अन्वये सभासदांना वार्षिक सभेस उपस्थित राहणे, संस्थेस कापूस घालणे आणि शेअरची वाढीव रक्कम भरणे बंधनकारक आहे. या अटींची पुर्तता न झाल्यास सदर सभासद अक्रियाशील यादीत समाविष्ठ होईल.

**विशेष सूचना :-** सभासदांना वार्षिक साधारण सभेस वेळेवर उपस्थित राहणे सोईचे व्हावे म्हणून महात्मा फुले चौक, सांगोले येथून वाहनांची सोय केलेली आहे.



Vidya Vikas Pratishthan's

## V.V.P. Institute of Engineering &Technology, Soregaon, Solapur - 413 008.

Mob: 7499982676, 8380050665
Email: vvpiet@rediffmail.com Web.: www.vvpengineering.org

## Admissions Open for 2024-25

**Institute Code: EN-06321**

**Against CAP Vacancy / Institute Level Seats**

Applications are invited from eligible candidates for admissions to **First Year B. Tech., Direct Second Year B. Tech., M. Tech. Engineering courses** for **Probable Vacant Seats Against CAP Rounds / Institute Level Seats on or before 10/09/2024 for the following Programs.**

1. **First Year and Direct Second Year B. Tech. Engineering**
   - Artificial Intelligence and Data Science
   - Computer Science & Engineering
   - Civil Engineering
   - Electrical Engineering
   - Electronics & Telecommunication Engineering
   - Mechanical Engineering
2. **M. Tech. Engineering**
   - Computer Science & Engineering
   - Mechanical (Design) Engineering

**For Admission Contact: 9545935455 / 9822174477**

**Principal**



श्री पांडुरंग प्रतिष्ठान पंढरपूर संचलित

## कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेकनॉलॉजी शेळवे-पंढरपूर

(Approved by AICTE, New Delhi, Govt. of Maharashtra and Affiliated to MSBTE Mumbai)
ता.पंढरपूर जि.सोलापूर

**प्रथम वर्ष व थेट द्वितीय अभियांत्रिकी पदविका प्रवेश २०२४-२५**

ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाइन प्रोसेस केलेली नाही परंतु संस्था स्तरावरील कोट्यातून प्रवेश तसेच तृतीय फेरीनंतर रिक्त असलेल्या जागेवर प्रवेश घ्यावयाचा आहे अशा विद्यार्थ्यांनी त्वरित संपर्क साधावा.

- प्रथम वर्षासाठी अंतिम दिनांक -१०/०९/२०२४
- थेट द्विताय वर्षासाठी अंतिम दिनांक -१३/०९/२०२४

| SR. NO. | BRANCH | प्रथम वर्ष (DTE CODE-6326) | थेट द्विताय वर्ष (DTE CODE-6326) |
|---|---|---|---|
| 1 | CIVIL ENGINEERING | 632619110 | 632619110 |
| 2 | COMPUTER TECHNOLOGY | 632625110 | 632625110 |
| 3 | ELECTRONICS AND TELECOMMUNICATION ENGINEERING | 632637210 | 632637210 |
| 4 | ELECTRICAL ENGINEERING | 632629310 | 632629310 |
| 5 | MECHANICAL ENGINEERING | 632661210 | 632661210 |

अधिक माहितीसाठी संपर्क
प्रा पंढरपूरकर एस. एस. - 9146597820 , प्रा. कोरबू आय. जे.- 8888489235.

प्राचार्य



## जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी कि. अर्ज नं : १०/२०२४

**अक्कलकोट येथील मे.सिव्हील जज्ज ज्यु.डी. साहेब यांचे कोर्टात**

हुवण्णा धोंडप्पा व्हनकोरे वगैरे - अर्जदार
विरुध्द
कोणी नाही - सामनेवाला

ज्याअर्थी वरील अर्जदारानी या न्यायालयात दिवाणी कि. अर्ज,१०/२०२४ बॉम्बे रेग्युलेशन कलम २ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेकरीताचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार नं.१ व २ याची मयत भाऊ परमेश्वर यांची मुलगी श्रीदेवी परमेश्वर व्हनकोरे (लग्नापुर्वीचे नांव ) व श्रीदेवी नागप्पा चौडीहाळ (लग्नानंतरचे नांव ) ही दिनांक : ०९/०८/२०२३ रोजी हचनाळ ता.इंडी येथे मयत झाली आहे. अर्जदार नं.१ ते ३ हेच तिचे कायदेशीर वारसदार असुन श्रीदेवी परमेश्वर व्हनकोरे (लग्नापुर्वीचे नांव) व श्रीदेवी नागप्पा चौडीहाळ (लग्ना नंतरचे नांव) हिचे मौजे वागदरी ता. अक्कलकोट येथील शेतजमीन गट नंबर ३७५ क्षेत्र २ हे. ०२ आर पोट खराब ० हे.०८ आर असे एकुण ३ हे.०० आर ही सामाईक शेतजमीन वर हिचे नांवे असल्याने त्याचे पश्चात सदर मिळकतीस अर्जदारांच्या नांवे वारसाप्रमाण पत्र मिळणेकामी मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी याबाबत कोणाची काही तक्रार अगर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसात अथवा दिनांक : ०५/१०/२४ रोजी या न्यायालयात स्वतः अगर वकीलामार्फत हजर राहुन आपली हरकत दाखल करावी. अन्याथा कोणाची हरकत नाही म्हणुन अर्जदाराच्या मागणी प्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल, याची नोंदी घ्यावी.

हे प्रसिध्दीकरण केले तारीख :-०५/०९/२०२४

**आज रोजी मे. कोर्टाच्या हुकूमाप्रमाणे माझ्या सहीने प्रसिध्द केले**

सही/-
**सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायाधिश क. स्तर
अक्कलकोट



## नगरपरिषद कार्यालय तुळजापूर

**जि.धाराशिव**

**जा.क्र-नपतु/स.वि/जाहीर प्रसिध्दी/२०२४/ दि. ०५/०९/२०२४**

**जाहीर सूचना - जाहीर सूचना - जाहीर सूचना**

नगरपरिषद तुळजापूर मार्फत तुळजापूर शहरातील सर्व नागरिकांना व जनावरे, वराह व श्वान मालकांना कळविण्यात येते की. तुळजापूर शहरामध्ये रस्त्यावर व गर्दीच्या ठिकाणी मोकाट जनावरे, वराह व श्वान फिरत असल्याचे निदर्शनास येत असून शहरात येणाया भाविकांना व नागरिकांना नाहक त्रास होत असून कामात अडचणी, वाहतुकीस अडवा-अडवी करत आहेत. तसेच शारदीय नवरात्र महोत्सव काही दिवसात सुरु होत असल्याने यात्रा कालावधीत अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही

तरी आपली जनावरे मोकाट फिरणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी अन्यथा गुरे, वराह मालकांवर प्राण्याना कूस्तेने वागवण्यास प्रतिबंध करण्याचाबत अधिनियम १९६० कलम ११(१) प्रमाणे सर्व गुरे, वराह मालकांवर गुन्हा दाखल करून सर्व मोकाट जनावरे, वराह व श्वान जप्त करण्यात येईल व प्रति जनावर, वराह च श्वान या प्रमाणे संबंधीत मालकावर रु.३०००/- दंड आकारण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच पकडण्यात आलेली मोकाट जनावरे गो-शाळेपर्यंत पोहचवणे याबाबतचा वाहतुकी खर्च नगरपरिषद अधिनियमातील तरतूदीनुसार वसूल करण्यात येईल. त्यानंतर आपली कोणतेही स्वरुपाची तक्रार ऐकून घेतली जाणार नाही तसेच ही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून त्याची अंमलबजावणी ७ दिवसानंतर कार्यवाही नगरपरिषदमार्फत करण्यात येईल याची नागरिकांनी नोंद घ्यावी.

**स्वाक्षरीत/- मुख्याधिकारी नगरपरिषद तुळजापूर**

शिक्का

**स्वाक्षरीत/- प्रशासक नगरपरिषद तुळजापूर**



## जाहीर नोटीस

**सोलापूर येथील मे. लवाद अधिकारी श्री. संजय आर करवा साहेब यांचे न्यायालयात**

श्री अरुणोदय मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि; सोलापूर - अर्जदार/वादी
विरुध्द
वंदाले रेश्मा सुरेश - वगैरे ३ - जाबदार/प्रतिवादी

| अ. क्र. | लवाद अर्जदार | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | ०६/२०२४ | नं : १ वंदाले रेश्मा सुरेश तिरुपती टेड्रर्स, ७५ ओम नम शिवाय नगर, विमानतळ रोड, सोलापूर ४१३००४ | १,३२,०६०/- | १२/०९/२०२४ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. १ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस नं. १ ची नोटीस अपुरा पत्ता कारणाने परत आल्यामुळे नं. १ यांची नोटीस बजावणीचा रिपोर्ट अर्जदारास आलेला नाही या कारणाने परत आल्यामुळे नं. १ यांची सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी वार शुक्रवार दि. १२/०९/२०२४ सकाळी ११.३० वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसाद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक : ३१/०८/२०२४ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**श्री अरुणोदय मल्टी-स्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि; सोलापूर**

**ठिकाण** : श्री. अरुणोदय मल्टी-स्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि; सोलापूर
**पत्ता** : प्लॉट नं. ७७ भाग्यलक्ष्मी पार्क, जुळे सोलापूर, सोलापूर ४१३००४

**सही/-**
**दिपक भा. केसकर**
(बी.ए.एलएल.एम अॅडव्होकेट)
ऑफिस : प्राची अपार्टमेंट फ्लॅट नं. ९, २२४/९, सिव्हील लाईन, गांधी नगर, हॉटेल त्रिपुरसुंदरीच्या मागे, सोलापूर.



## जाहीर नोटीस

**सोलापूर येथील मे. लवाद अधिकारी श्री. संजय आर करवा साहेब यांचे न्यायालयात**

श्री अरुणोदय मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि; सोलापूर - अर्जदार/वादी
विरुध्द
श्री. आकुडे संदीप प्रकाश - वगैरे ३ - जाबदार/प्रतिवादी

| अ. क्र. | लवाद अर्जदार | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | ११/२०२४ | नं : १ आकुडे संदीप प्रकाश प्लॉट नं. ०४ ब्रह्मपुत्रा बिल्डिंग, अमृत नगर, सुंदरम नगर जवळ, सोलापूर ४१३००४ | १,०१,९७२/- | १२/०९/२०२४ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. १ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस नं. १ ची नोटीस अपुरा पत्ता कारणाने परत आल्यामुळे नं. १ यांची नोटीस बजावणीचा रिपोर्ट अर्जदारास आलेला नाही या कारणाने परत आल्यामुळे नं. १ यांची सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी वार शुक्रवार दि. १२/०९/२०२४ सकाळी ११.३० वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसाद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक : ३१/०८/२०२४ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**श्री अरुणोदय मल्टी-स्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि; सोलापूर**

**ठिकाण** : श्री. अरुणोदय मल्टी-स्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि; सोलापूर
**पत्ता** : प्लॉट नं. ७७ भाग्यलक्ष्मी पार्क, जुळे सोलापूर, सोलापूर ४१३००४

**सही/-**
**दिपक भा. केसकर**
(बी.ए.एलएल.एम अॅडव्होकेट)
ऑफिस : प्राची अपार्टमेंट फ्लॅट नं. ९, २२४/९, सिव्हील लाईन, गांधी नगर, हॉटेल त्रिपुरसुंदरीच्या मागे, सोलापूर.



## जाहीर नोटीस

**सोलापूर येथील मे. लवाद अधिकारी श्री. संजय आर करवा साहेब यांचे न्यायालयात**

श्री अरुणोदय मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि; सोलापूर - अर्जदार/वादी
विरुध्द
श्री. बामणे केदारनाथ औदुंबर - वगैरे ३ - जाबदार/प्रतिवादी

| अ. क्र. | लवाद अर्जदार | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | ०४/२०२४ | नं : १ बामणे केदारनाथ औदुंबर प्लॉट नं. ७७ भाग्यलक्ष्मी पार्क, जुळे सोलापूर, सोलापूर ४१३००४ | २,४४,८०४/- | १२/०९/२०२४ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. १ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस नं. १ ची नोटीस अपुरा पत्ता कारणाने परत आल्यामुळे नं. १ यांची नोटीस बजावणीचा रिपोर्ट अर्जदारास आलेला नाही या कारणाने परत आल्यामुळे नं. १ यांची सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी वार शुक्रवार दि. १२/०९/२०२४ सकाळी ११.३० वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसाद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक : ३१/०८/२०२४ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**श्री अरुणोदय मल्टी-स्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि; सोलापूर**

**ठिकाण** : श्री. अरुणोदय मल्टी-स्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि; सोलापूर
**पत्ता** : प्लॉट नं. ७७ भाग्यलक्ष्मी पार्क, जुळे सोलापूर, सोलापूर ४१३००४

**सही/-**
**दिपक भा. केसकर**
(बी.ए.एलएल.एम अॅडव्होकेट)
ऑफिस : प्राची अपार्टमेंट फ्लॅट नं. ९, २२४/९, सिव्हील लाईन, गांधी नगर, हॉटेल त्रिपुरसुंदरीच्या मागे, सोलापूर.



## जाहीर नोटीस

**सोलापूर येथील मे. लवाद अधिकारी श्री. संजय आर करवा साहेब यांचे न्यायालयात**

श्री अरुणोदय मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि; सोलापूर - अर्जदार/वादी
विरुध्द
श्री. भिमणवरू सचिन सुभाष - वगैरे ३ - जाबदार/प्रतिवादी

| अ. क्र. | लवाद अर्जदार | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | ०३/२०२४ | नं : ३ शरणप्पा गुरप्पा शेवगार १४ मजरेवाडी गावठाण, विमानतळ रोड, सोलापूर ४१३००७ | २,६९,५३०/- | १२/०९/२०२४ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. ३ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस नं. ३ ची नोटीस अपुरा पत्ता कारणाने परत आल्यामुळे नं. ३ यांची नोटीस बजावणीचा रिपोर्ट अर्जदारास आलेला नाही या कारणाने परत आल्यामुळे नं. ३ यांची सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी वार शुक्रवार दि. १२/०९/२०२४ सकाळी ११.३० वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसाद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक : ३१/०८/२०२४ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**श्री अरुणोदय मल्टी-स्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि; सोलापूर**

**ठिकाण** : श्री. अरुणोदय मल्टी-स्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि; सोलापूर
**पत्ता** : प्लॉट नं. ७७ भाग्यलक्ष्मी पार्क, जुळे सोलापूर, सोलापूर ४१३००४

**सही/-**
**दिपक भा. केसकर**
(बी.ए.एलएल.एम अॅडव्होकेट)
ऑफिस : प्राची अपार्टमेंट फ्लॅट नं. ९, २२४/९, सिव्हील लाईन, गांधी नगर, हॉटेल त्रिपुरसुंदरीच्या मागे, सोलापूर.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त



### व्हॅलेंटाईन स्कूलमध्ये पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर यांचा सन्मान

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**
व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जन्मदिनानिमित्त शिक्षक दिन साजरा करण्यात आला. शाळेच्या रौप्य महोत्सवी वर्षापर्यंत अखंड ज्ञानदान करणाऱ्या शाळेच्या पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर यांचा शिक्षक दिनाच्या औचित्याने संस्थेकडून सन्मान पत्र देऊन सत्कार करण्यात आला. त्यांचा कार्याचा परिचय उपमुख्याध्यापिका मीना दुधनीकर यांनी करून दिला. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापुरे, उपाध्यक्ष यमूना दिड्डी, सचिव संतोष गड्डम व उपसचिव नागेश शेंडगे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मुख्याध्यापिका जी. एच. कल्याणी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. संस्थेचे सचिव संतोष गड्डम परिवारातर्फे दरवर्षी तिर्थक्षेत्र तिरुपती दर्शनासाठी रोख रक्कम देऊन धार्मिक कार्यास सहकार्य केले. तसेच काही शिक्षकांना भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. तसेच संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापुरे यांच्या वडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ शिक्षकांनी केलेल्या कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आले. ५ सप्टेंबर या दिवशी इ १० वीच्या विध्यार्थ्यांनी एकदिवसीय शिक्षक ही भूमिका पार पडली. यामध्ये मुख्याध्यापिका, उपमुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका, शिक्षक तसेच मावशी, शिपाई यांच्या कार्याचा आढावा घेतला. संस्थेचे सहसचिव नागेश शेंडगे यांनी शाळेच्या वतीने नवीन तयार केलेल्या सन्मान पत्राचे वाचन करुन त्यांच्या कार्यास शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन रेखा बाबानगरे व भाग्यश्री गिडवीर यांनी केले. नागमणी पेगडा यांनी आभार मानले.



### अक्कलकोट रोडवरील विविध नगरातील ड्रेनेज लाईन दुरुस्त करण्याची मागणी

**सोलापूर दि. ५ सप्टेंबर-**
अक्कलकोट रोडवरील एमआयडीसी भागातील नक्का वस्ती, जमादार वस्ती, नीलम नगर एम आय डी सी येथील ड्रेनेज लाईन तातडीने दुरुस्त करावी अन्यथा जनआंदोलन करण्यात येईल, असा इशारा संभाजी आरमारच्या वतीने निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. घाण पाणी रस्त्यावर आल्याने परिसरातील नागरिकांचे जीवन धोक्यात आले असून संबंधित विभागातील महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना सांगूनही दुर्लक्ष केले जात आहे. याच पार्श्वभूमीवर संभाजी आरमारच्या वतीने गुरुवारी महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देण्यात आले. एमआयडीसी सोलापूर येथील नक्का वस्ती व जमादार वस्ती परिसरातील फुटलेले ड्रेनेज तातडीने दुरुस्त करून दयावे अन्यथा नागरिकांच्या हितासाठी संभाजी आरमार उग्र जनआंदोलन करेल, असा इशारा संभाजी आरमारचे शहर प्रमुख सागर ढगे यांनी दिला आहे. याप्रसंगी स्वप्निल इराबत्ती, सुधाकर करणकोट, प्रदीप मोरे, गणेश श्रीगिरी, दिगंबर कोंडा, किशोर हबीब, अशोक अल्ली, नरेश पेंटा, एकनाथ मुशन, राजशेखर घंटे, सुरेश पूट्टा, प्रियंका कनोरे, नंदा मिन्न उपस्थित होते.




# श्री समर्थ मंडळाच्या गणपतीचे जल्लोषात आगमन

- ढोल-ताशांचा गजर अन् लेझीमचा बहारदार खेळ
- मिरवणुकीत महिलांचा उत्स्फूर्त सहभाग
- गणरायाच्या स्वागतासाठी वरूणराजाचीही हजेरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ५ सप्टेंबर-**
शहरातील मंगळवेढेकर चाळीतील श्री समर्थ तरूण मंडळाच्यावतीने तयार करण्यात आलेल्या श्री समर्थ गणपती चा गुरुवारी जल्लोषी मिरवणुकीने आगमन सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी कार्यकर्त्यांनी अतिशय सुंदरपणे ढोल-ताशा चे वादन अन लेझीमचा खेळ सादर करून नागरीकांची मने जिंकली. गणपतीची मिरवणुक ही अंतिम टप्प्यात आल्यानंतर वरूणराजाने देखील मिरवणुकीत हजेरी लावली. मिरवणुकीत महिलांचा सहभाग उल्लेखनीय होता.

यंदाचे मंडळाचे ४२ वे वर्ष आहे. मंडळाच्यावतीने यंदाच्यावर्षी मंडळाचे आधारस्तंभ अरूण रोडगे यांच्या संकल्पनेतून मंडळाच्यावतीने ११ फुट उंचीची फायबरची श्री समर्थ गणपतीची मूर्ती मुळचे सोलापूरचे असलेले व सध्या पुणे येथे स्थायिक असलेले मुर्तीकार अविनाश जिंदम यांनी तयार केलेली आहे. नूतन मुर्तीचा आगमन सोहळ्यास गुरुवारी सकाळी सोलापूरचे श्रध्दास्थान असलेल्या श्री आजोबा गणपती येथून विधिवत पूजा करून प्रारंभ करण्यात आला.

माजी महापौर शोभा बनशेट्टी, माजी उपमहापौर पद्माकर काळे, दिलीप कोल्हे, शिवसेना (उबाठा गट) जिल्हाप्रमुख पुरुषोत्तम बरडे, दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, परिवहन समितीचे माजी सभापती राजन जाधव, माजी नगरसेवक विक्रांत वानकर, सार्वजनिक मध्यवर्ती मंडळाचे अध्यक्ष विनायक महिंद्रकर, एकनाथ घाडगे, विजय पुकाळे, मंडळाचे भाऊसाहेब रोडगे, मंडळाचे अध्यक्ष साहिल बावळे, आप्पासाहेब रोडगे, आण्णासाहेब रोडगे, रतन खैरमोडे, चिदानंद वनारोटे, काका मेंडके, राजू कुरेशी, शिवजन्मोत्सव मध्यवर्ती मंडळाचे अध्यक्ष सुभाष पवार यांच्या हस्ते श्री समर्थ गणपतीची आरती करण्यात आली. त्यानंतर मिरवणुकीस प्रारंभ झाला. चांदीच्या आभुषणांनी सजविलेल्या श्री समर्थ गणपतीची छबी टिपण्यासाठी मिरवणूक मार्गावर नागरीकांनी गर्दी केली होती. मिरवणुकीच्या अग्रभागी कै. प्रभाकर रोडगे यांची प्रतिमा बग्गीत होती. श्री आजोबा गणपती मंदीर येथून सुरुवात झालेली ही मिरवणुक माणिक चौक, श्री सोन्या मारूती, दत्त चौक, राजवाडे चौक, नवी पेठ, पारस इस्टेट, मेकॅनिकी चौक, नवी वेस पोलिस चौकी, सरस्वती चौक मार्गे लकी चौक येथे मंगळवेढेकर चाळीतील गणेश मंदीराजवळ आल्यानंतर सायंकाळी वरूणराजानेदेखील हजेरी लावली. यावेळी पावसामध्ये कार्यकर्ते तल्लीन होऊन नाचत होते. यावेळी मंडळातील बापू रोडगे, राजू नकाते, सचिन बावळे, दादू रोडगे, सिध्दू पाटील, राजू जगताप, बुवा नकाते, शशिकांत तरटे, अजय गोडसे, मेघराज पसारे, अमर देवरनावदगी, दत्ता कासेगावकर, बाळू नकाते, श्रीपाद रणदिवे, सौरभ माने यांच्यासह मंडळातील कार्यकर्ते उपस्थित होते.

### दगड मारण्याच्या कारणावरून मारहाण

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**
दुचाकीवर दगड मारून नुकसान करत असताना दगड का मारले अशी विचारणा केली असता,दोघांनी मिळून फिर्यादी कृष्णा चंद्रकांत सुगरे (वय-४५,रा.सुशील नगर,विजापूर रोड) यांना मारहाण केली.तसेच भांडण पाहून त्यांची पत्नी व मुले भांडण सोडवण्यासाठी मध्ये आले असता,त्यांना देखील मारहाण केली व त्यात मुलगी स्नेहा याच्या डाव्या हाताच्या दंडावर काचेच्या तुकड्याने मार लागल्याने जखमी झाली आहे. अशा आशयाची फिर्याद कृष्णा सुगरे यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून केदार केनिराम जाधव (रा.सुशील नगर) व आकाश सोनकांबळे (रा.कमला नगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार सोनार हे करीत आहेत.

### कोन्हारीत वृद्धाला सर्पदंश

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**
शेतात पाण्याची मोटर चालू करण्यासाठी जात असताना उजव्या पायास सर्पदंश झाल्याची घटना चार सप्टेंबर रोजी घडली. यात लक्ष्मण नागनाथ गुंड (वय-६७, रा. कोन्हरी, ता. मोहोळ) हे जखमी झाले. उपचारास सार्वजनिक दवाखना मोहोळ येथे उपचार करुन पुढील उपचारासाठी सिव्हिल मध्ये मुलगी सारिका गरड यांनी दाखल केले.



### खड्डे दुरुस्तीसाठी बोंबाबोंब आंदोलन

- भस्मासुराचा फोटो लावत महापालिका निद्रिस्त व अकार्यक्षम असल्याचा आरोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ५ सप्टेंबर-**
गणेशोत्सव तोंडावर आला असून सर्व मंडळांची गणेशोत्सव साजरा करण्याची लगबग सुरू आहे परंतु सोलापूर शहरातील रस्ते खड्डे मुक्त करण्याबाबत सोलापूर महानगरपालिका निद्रिस्त असल्याचा आरोप करत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने भ्रष्टाचारी भस्मासुराचा फोटो खड्ड्यावर लावून महापालिका अधिकाऱ्यांच्या नावाने बोंबाबोंब आंदोलन करण्यात आले.

सोलापूर शहरातील नागरिक व गणेश भक्त रस्त्यावरील खड्ड्याला वैतागले असून महापालिकेला वारंवार निवेदन देऊन देखील परिस्थितीत फरक पडत नसल्याने गुरुवारी शहर प्रमुख महेश धाराशिवकर, उपजिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी विधानसभा प्रमुख बाळासाहेब गायकवाड, मीनाक्षी गवळी, शहर उपप्रमुख संताजी भोळे, संदीप बेळमकर, शिवा ढोकळे, उज्वल दीक्षित, ऋषिकेश दोरकर, विजय पुकाळे,दत्ता खलाटे, शशिकांत बिराजदार, सोमनाथ शिंदे, जर्गीस मुल्ला, असिफ मुल्ला, नाना कळसकर, बाबू दोरकर, मनोज कामेगावकर, अमोल धर्माधिकारी, प्रकाश काशीद, नागराज कंदकुर, अनुप वेर्णेकर, शिंदे, बाळू पवार, सुरज दीक्षित आदी उपस्थित होते.



### कुत्रा आडवा आल्याने दुचाकीवरून घसरून दोघे जखमी

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**
मोरवंची ते लांबोटी कडे येताना मोरवंची रोडवर कुत्रा आडवा आल्याने दुचाकी घसरून पडल्याने दोघे जखमी झाल्याची घटनाचार सप्टेंबर रोजी घडली. यात गोवर्धन नागनाथ साबळे (वय-३३) प्रियंका गोवर्धन साबळे (वय-२३,दोघे रा.मोरवंची,ता.मोहोळ) हे दोघे जखमी झाले. उपचारासाठी सिव्हिलमध्ये दीर सोमनाथ साबळे यांनी दाखल केले. कुत्रा आडवा अपघात होण्याचे प्रमाण वाढले असून प्रशासनाने या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणीर होत आहे.





## पोलीस पाटलांचे मानधन, सोयीसुविधा नियमितपणे मिळावे

- स्वयंम शिक्षा फाउंडेशनचे संस्थापक सोमनाथ वैद्य यांनी दिले उपमुख्यमंत्र्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ५ सप्टेंबर-**
पोलीस पाटलांचे मानधन व इतर सोयीसुविधा नियमितपणे मिळाव्यात या मागणीचे निवेदन स्वयंम शिक्षा फाउंडेशनचे संस्थापक सोमनाथ वैद्य यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटून दिले आहे.

यावेळी सोमनाथ वैद्य यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी पोलीस पाटलांच्या विविध प्रश्न आणि मागण्या संदर्भात सविस्तर चर्चा केली.दक्षिण सोलापूर मतदार संघामध्ये ५० पेक्षा जास्त पोलीस पाटलांची संख्या असून त्यांचे वेतन गेल्या ४ महिन्यांपासून प्रलंबित आहे. पोलीस पाटील हा गावातील अतिशय महत्वाचा घटक असून तो गावातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी दिवस रात्र काम करीत असतो. गावातील कोणतीही गुन्हेगारी कृती झाली की स्थानिक पोलीस हे पोलीस पाटलांच्या घरी येऊन ते पहिली प्राथमिक माहिती घेत असतात. असे हे पोलीस पाटील हे अत्यंत कमी मानधनामध्ये काम करीत आहेत. त्यांना मिळणारे मानधन व भत्ते व इतर सोयी-सुविधा नियमित मिळावे याकरिता त्यांनी सोलापूर पोलीस अधीक्षक यांच्याकडे मागणी केली आहे. पोलीस पाटीलांना मिळणारे मानधन नियमित मिळावे व अतिरिक्त भत्ते देण्याबाबत प्रस्ताव सोलापूर पोलीस अधीक्षक यांच्याकडून तात्काळ शासनाकडे मागविण्यात यावा, असे निवेदनात म्हटले आहे.









हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सोहनलाल पल्लोड, ओमप्रकाश दायमा यांना दाधीच समाजभूषण पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

श्री दाधीच (दायमा) समाज संस्थेतर्फे देण्यात येणारे राज्यस्तरीय दाधीच भूषण पुरस्कार यंदाच्यावर्षी सोहनलाल पल्लोड आणि ओमप्रकाश दायमा यांना जाहीर झाले आहेत. त्यागमूर्ती महर्षी दधीची जयंतीनिमित्त बुधवार ११ सप्टेंबर रोजी चाटी गल्ली येथील गायत्री भवनात सायंकाळी पाच वाजता हा पुरस्कार वितरण कार्यक्रम होणार आहे. उत्कृष्ट सामाजिक कार्य आणि योगदानासाठी श्री दाधीच (दायमा) समाज संस्थेतर्फे या पुरस्कारांचे वितरण करण्यात येते.




त्यागमूर्ती महर्षी दधीची जयंतीनिमित्त बुधवारी सकाळी नऊ ते दुपारी चार वाजेपर्यंत चाटी गल्ली येथील गायत्री भवनमध्ये दधीच युवा संघटनेतर्फे रक्तदान शिबिर होणार आहे. तर सायंकाळी पाच वाजता त्याच ठिकाणी पूजा, पुरस्कार वितरण तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. यानंतर रात्री आठ वाजता समाज बांधवांना महाप्रसादाचे वितरण करण्यात येईल. यावेळी समाज बांधवांनी उपस्थित रहावे, असे आवाहन श्री दाधीच (दायमा) समाज संस्थेचे अध्यक्ष भरत काकडा आणि सचिव विजयकुमार इटोदिया (दायमा) यांनी केले आहे.



# गणेशोत्सवानिमित्त बाजारपेठेत झुंबड!

## ● गौरी मुखवट्यांसह सजावटीचे साहित्य खरेदीसाठी ग्राहकांची वाढली रेलचेल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर -**

**लाडक्या गणरायाचे आगमन शनिवारी होणार आहे. याच पार्श्वभूमीवर शहरातील महत्वाच्या बाजारपेठा मधला मारुती, टिळक चौक, परिसर सजावटीचे, प्रासादिक, गौरी मुखवटे अशा अनेक वैविध्यपूर्ण साहित्यांनी सजल्या आहेत. विशेषत्वाने महिलांची बाजारपेठेत गौरी मुखवटे खरेदीसाठी गर्दी केलेली दिसत आहे.**



गणपती बाप्पांच्या स्वागतासाठी अबालवृद्ध गणेशभक्त आसुसलेला आहे. कधी गणेश चतुर्थी येते, अन् गणपती बाप्पा घरी येतोय, याची सर्वांनाच उत्सुकता लागून राहिली आहे. परंतु ती उत्सुकता आता संपत आली आहे. शनिवारी (दि. ७) सप्टेंबर मोठ्या उत्साहात आणि आनंदात भक्तांच्या घरोघरी बाप्पांचे आगमन होणार आहे. श्रींची प्राण प्रतिष्ठापना करण्यासाठी लागणारे विविध प्रासादिक साहित्य आणि गृह सजावट करण्यासाठी लागणारे असे दोन्ही साहित्य खरेदीसाठी ग्राहकांची लगबग बाजारपेठेत वाढलेली आहे.

दरम्यान गणपती बाप्पांच्या मंगलमय आगमनानंतर गौराई सोन पावलांनी भक्तांच्या घोरघरी विराजमान होणार आहे, त्यासाठी देखील विशेष खरेदी केली जात आहे. नववधूना लक्ष्मी देण्यासाठी आखीव - रेखीव गौराईचे मुखवटे बाजारपेठेत दाखल झाले आहेत. सौंदर्यपूर्ण अशा गौरी मुखवटे महिलांना आकर्षित करत आहेत. नवीन पेण येथील गौरी मुखवटे महिलांना भुरळ घालत आहेत. तसेच गौरी मुखवटे ठेवण्यासाठी लागणारे लोखंडी आडणी, गौरीचे पिलावळ, हात या वस्तू देखील उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत. एकंदर गणरायाच्या स्वागतासाठी बाजारपेठेत मंगलमय आणि चैतन्यमय वातावरण निर्माण झाले असून भाविकांनी आपल्या इच्छेनुसार खरेदी केल्याचे चित्र दिसत आहे.

**पाऊस उघडल्याने बाजारपेठेत ग्राहकांची वर्दळ वाढली**

गणेशोत्सव निमित्त बाजारपेठा सजल्या आहेत. तीन दिवस अगोदर पाऊस पडल्याने बाजारपेठेत शुकशुकाट होता. आता पाऊस उघडल्याने ग्रामीण भागातील ग्राहकांची गर्दी वाढली आहे.

**- बंडू सिध्दे, विक्रेते**

**गौरी मुखवटे घेण्यासाठी बाजारपेठेत आलो.**

गावाकडून आम्ही सोलापूर शहरातील बाजारपेठेत गौरी मुखवटे घेण्यासाठी विशेषत्वाने आलो आहोत. येथे सुंदर असे गौराईचे मुखवटे उपलब्ध आहेत. ते घेऊन आमच्या नवीन लग्न झालेल्या मुलीला देणार आहे. मात्र गौरी गणपतींचे दर यंदा थोडे वाढीव आहेत.

**- निर्मला सामंत, महिला ग्राहक**



# सोलापुरात पहिल्यांदाच गणेश मूर्तींचे बोमड्याल मंगल कार्यालयात प्रदर्शन

## ● श्री दुर्गा आर्टसचा विशेष उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि. ५ सप्टेंबर-**

भक्तगण आतुरतेने वाट बघत असलेला गणेशोत्सव अवघ्या ४ दिवसांवर आला असून यानिमित्ताने मूर्तिकारांची लगबग सुरू आहे.दरम्यान दुर्गा आर्टने दरवर्षी प्रमाणे यंदाही अक्कलकोट रोड वरील महालक्ष्मी मंदिर पाठीमागे असलेल्या बोमड्याल मंगल कार्यालय येथे प्रदर्शन आणि विक्री स्टॉल थाटले आहे.

पेण, हमरापूर, पुणे आणि नागर येथील आकर्षक आणि सुबक मूर्ती भक्तांसाठी उपलब्ध करून देण्यात आले असून यामध्ये मुंबई, पुणे येथील मानाच्या गणेश मुर्ती छोट्या आकारत उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे लालबाग,दगडू शेठ,सिद्धी विनायक,शारदा गणपती, तांबडी जोगेश्वरी,गुरूजी तालीम,बाल गणेश,श्री बैठक यासह खास गौरी सजावटीसाठी गणेश मूर्ती उपलब्ध आहेत. दरम्यान, आयोध्येतील रामलल्ला अवतारातील गणेश मूर्ती हे यंदाच्या वर्षी चे प्रमुख आकर्षण आहे.यंदा १५ टक्क्यांनी गणेश मूर्ती महागल्या असून ग्राहकांचा चांगला प्रतिसाद असल्याचे दुर्गा आर्टचे विठ्ठल मुनगापाटील यांनी सांगितले. दुर्गा आर्ट मधील मनमोहक गणेश मूर्ती सोलापुरात इतरत्र कुठेच मिळत नाही, असेही त्यांनी सांगितले.

## जुळे सोलापुरात आज श्रावण मास पुराण प्रवचन समाप्ती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

जुळे सोलापूर येथील ओंकार आश्रम सिद्धारूढ मठ यांच्यावतीने श्रावण महिन्यानिमित्त श्रावण मास पुराण प्रवचन समाप्ती कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.



हा कार्यक्रम शुक्रवार ६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता जुळे सोलापूर येथील ओंकार आश्रम सिद्धारूढ मठ येथे होणार आहे. हा कार्यक्रम बिदर येथील सद्गुरू डॉ. शिवकुमार महास्वामी यांच्या दिव्य सानिध्यात होणार असून यावेळी मातोश्री लक्ष्मीदेवी कलबुर्गी, मातोश्री सुशांतादेवी, शंकरानंद स्वामीजी (सावळगी) आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. भाविकांनी यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन सिद्धाराम मठाच्या वतीने आश्रम सिद्धारूढ मठ येथे होणार आहे. केले आहे.

## श्रीमंत मानाचा कसबा गणपती मंडळाचा यंदा संत मीराबाई अवतार देखावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

गणेशोत्सवनिमित्त बाळीवेस येथील श्रीमंत मानाचा कसबा गणपती मंडळाच्या श्री ची प्रतिष्ठापना मिरवणूकीचा शुभारंभ ७ सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता चार हुतात्मा पुतळा येथून करण्यात येणार आहे, अशी माहिती उत्सव समिती अध्यक्ष गुरूशांत मोकाशी यांनी पत्रकार परिषदेत दिली

सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त शितल तेली-उगले यांच्या हस्ते श्री ची महापूजा होऊन मिरवणूकीस प्रारंभ होणार आहे. प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही विविध धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक कार्यक्रम राबविणार आहेत. मंडळाच्यावतीने काढण्यात येणाऱ्या मिरवणूकीत प्रारंभी कसबाध्वज विविध एकतेचे प्रतिक असणारे पंचरंगी ध्वज, सनई, चौघडा, हलगी, बॅन्ड हलगीच्या तालावर नाचणारा घोडा, सामाजिक प्रबोधनात्मक चित्ररथ, घोडेस्वार, लोकमान्य टिळक यांची प्रतिमा असलेली बग्गी, सजवण्यात आलेले बैल जोडे आदींचा समावेश आहे. नाविन्यपूर्ण मिरवणूकीची परंपरा मंडळाने यंदाही कायम राखली आहे. यंदाच्या मिरवणूकीत गणेशोत्सव मिरवणूकीत ४०० युवक कार्यकर्त्यांचे पथक पारंपारिक लेझीमचे खेळ सादर करणार आहेत.



रविवार दि. ८ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता सामूहिक अथर्वशीर्ष पठणासाठी मंडळाच्या परिसरातील ५०० महिला उपस्थित राहणार आहे. मुंबई व पुणे धर्तीवर भव्य व दिव्य आरास देखावा सादर करण्यात येत आहे. यंदाच्या वर्षी श्री. संत मीराबाई हा देखावा सादर करण्यात येणार आहे.सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्या हस्ते ९ सप्टेंबर रोजी या देखावाचे उद्घाटन होणार आहे. दररोज सकाळी ७ वाजता नित्यपूजा, रूद्राभिषेक, नित्यपुजा, रूद्राभिषेक, महापूजा, भाविकांच्या हस्ते महाआरती, प्रसाद वाटप आदी कार्यक्रम आयोजित केले आहेत. १७ सप्टेंबर अनंत चतुर्थादशी निमित्त सकाळी ७ वाजता उत्सव मंडपात विजापूर येथील भाविकांच्या हस्ते पुजनानंतर विसर्जन मिरवणूकीस सुरुवात होईल. गाडीखाना चौक, होटगी मठ, मल्लिकार्जुन मंदिर, बाळीवेस चौक, चाटी गल्ली, सराफ कट्टा, मधला मारूती, माणिक चौक, जुनी फौजदार चावडी, सोन्या मारूती, दत्त चौक, मार्ग गणपती घाट येथे श्री चे आगमन होईल. श्री पूजनाने प्रतिकात्मक विसर्जनाने उत्सवाचे सांगता होईल. तत्पूर्वी उत्सव मिरवणूकी दरम्यान बाळीवेस चौक, दत्त चौक येथे श्री चे सामुहिक आरतीचे आयोजन करण्यात आले आहे. गणेशोत्सवानिमित्त आयोजित धार्मिक कार्यक्रमांचा सोलापूरकरांनी लाभ घ्यावा असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

या पत्रकार परिषदेस शिवानंद बुगडे, बिपीन धूम्मा, शशिकांत बिराजदार, आनंद मुस्तारे, शिवलिंग माळगे, योगेश इंडी, शिवानंद माळशेट्टी, जितेंद्र लाड आदी उपस्थित होते.

# लाडकी बहिण योजनेला भाऊबीजेपर्यंत मुदतवाढ मिळावी

## ● महिला बालविकास कल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्याकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

शहर-जिल्ह्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेस प्रचंड प्रतिसाद मिळत असून, सर्व लाभार्थ्यांना रक्षा बंधनाची ओवाळणी मिळाली आहे.

अजून असंख्य महिला भगिनी या योजनेच्या लाभापासून वंचित असून त्यांना या योजनेचा लाभ घेता यावा याकरिता आता या योजनेस भाऊबीज पर्यंत मुदतवाढ मिळावी, अशी मागणी राष्ट्रवादीच्या वतीने जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांनी महिला बाल विकास कल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्याकडे केली. राज्याच्या महिला व बाल



कल्याण विकास मंत्री आदिती तटकरे, युवक प्रदेश अध्यक्ष सुरज चव्हाण हे सोलापूर दौऱ्यावर आले असता सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते प्रांतिक पदाधिकाऱ्यांसह सर्वच फ्रंटल सेल अध्यक्ष आणि कार्याध्यक्ष यांच्या उपस्थितीत आमदार यशवंत माने, जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेरभाई बागवान यांनी आदिती ताईंना पुष्पगुच्छ आणि राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार व अदितीताई तटकरे यांचा नुकताच लोकप्रिय झालेला फोटो प्रोट्रेट सप्रेम भेट दिला.

सोलापुरात राष्ट्रवादीच्या वतीने घेण्यात आलेल्या उपक्रमाचे आदिती तटकरे यांनी विशेष कौतुक केले. यावेळी जिल्हा समन्वयक आ. यशवंत माने, जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, ज्येष्ठ नेते हेमंत चौधरी, माजी परिवहन सभापती आनंद मुस्तारे, माजी नगरसेवक नारायण माशाळकर, महिला आघाडी अध्यक्ष संगीता जोगधनकर, कार्याध्यक्ष चित्रा कदम, महिला आघाडी प्रदेश सरचिटणीस सायरा शेख, युवक अध्यक्ष सुहास कदम, कार्याध्यक्ष तुषार जक्का, शहर उपाध्यक्ष ओंकार हजारे, युवती अध्यक्ष किरण माशाळकर, सेवादल अध्यक्ष प्रकाश जाधव अल्पसंख्यांक शहराध्यक्ष अमीर शेख,युवक प्रदेश सरचिटणीस महेश कुलकर्णी, सनी देवकते, चेतन गायकवाड, युवक संघटक दत्तात्रय बडगंची, वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख बसवराज कोळी, सामाजिक न्याय विभाग कार्याध्यक्ष अनिल बनसोडे, वाहतूक सेल अध्यक्ष इरफान शेख, डॉक्टर सेल कार्याध्यक्ष महेश वसगडेकर, राष्ट्रवादी सोशल मीडिया शहराध्यक्ष वैभव गंगणे, कार्याध्यक्ष सोमनाथ शिंदे यांच्यासह प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.



**चौकातील खड्डे मजबुतीकरण...**

**सोलापूर : गणरायाच्या आगमनानिमित्त शहरातील खड्डे मजबुतीकरण करण्याचे काम महापालिकेने हाती घेतले आहे. अक्कलकोट रोड पाण्याची टाकी शांती चौक परिसरातील रस्ता दुरुस्ती करतानाचे छायाचित्र.** **(छायाचित्र : केवल तिवारी)**

# जनता बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळाची बौद्धिक व्याख्यानमाला १३ सप्टेंबरपासून

## ● भाऊ तोरसेकर, भूषणकुमार उपाध्यायांसह मान्यवर वक्त्यांच्या व्याख्यानांची मेजवानी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

**जनता बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळातर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाच्याहीवर्षी गणेशोत्सवानिमित्त बौद्धिक व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मंडळाचे गणेशोत्सव समितीचे अध्यक्ष लक्ष्मण सुतार यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली. दि.१३ ते १६ सप्टेंबर दरम्यान दररोज सायंकाळी ७ वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात ही व्याख्यानमाला होणार आहे.**


मा.सुबोध भावे


मा.डॉ.शैलेंद्र देवळाणकर


मा.भाऊ तोरसेकर


मा.भुषणकुमार उपाध्याय

व्याख्यानमालेचे हे ४८ वे वर्ष आहे. या व्याख्यानमालेचे उद्घाटन शुक्रवार १३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता सोलापूरचे पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्या हस्ते हुतात्मा स्मृती मंदिरात होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूर जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे राहणार आहेत. पहिल्या दिवशी सिने कलावंत, अभिनेते सुबोध भावे यांची प्रकट मुलाखत निवेदिका मंजुषा गाडगीळ घेणार आहेत.

व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प शनिवार दिनांक १४ सप्टेंबर रोजी महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर हे गुंफणार आहेत. विकसित भारताचे उद्दिष्ट आणि शिक्षणाची भूमिका हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय आहे. ज्येष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर रविवार १५ सप्टेंबर रोजी व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प गुंफतील. कायदा, व्यवस्था आणि लोकशाही या विषयावर ते सोलापूरकरांना मार्गदर्शन करणार आहेत. व्याख्यानमालेचा शेवट माजी पोलीस महासंचालक भूषणकुमार उपाध्याय यांच्या व्याख्यानाने होणार आहे. सोमवार १६ सप्टेंबर रोजी श्री. उपाध्याय ताणतणाव व मानसिक स्वास्थ्य या विषयावर व्याख्यान देणार आहेत. जनता बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळाच्या व्याख्यानमालेस गणेशभक्तांनी उपस्थित रहावे आणि मान्यवर वक्त्यांच्या व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जनता बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष लक्ष्मण सुतार यांनी याप्रसंगी केले.

या पत्रकार परिषदेस बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे, उपाध्यक्ष ॲड. मिलिंद कुलकर्णी, तज्ज्ञ संचालक ॲड. प्रदीपसिंह राजपूत, संचालक जगदीश भुतडा, पुरुषोत्तम उडता, आनंद कुलकर्णी, संचालिका चंद्रिका चौहान, बोर्ड ऑफ मॅनेजमेंट सदस्य डॉ. अजितकुमार देशपांडे, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मुकुंद कुलकर्णी, सरव्यवस्थापक प्रदीप बुट्टे, उपसरव्यवस्थापक अंजली कुलकर्णी, सहाय्यक सरव्यवस्थापक देवदत्त पटवर्धन, मकरंद जोशी, कर्ज विभाग प्रमुख आनंद ताशी, जनता बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष लक्ष्मण सुतार, उपाध्यक्षा प्रीती चौहान, सचिव नामदेव यलगोंडा, खजिनदार सुहास कमलापुरकर, व्याख्यानमाला समिती प्रमुख मदन मोरे, सुहास मुळजकर तसेच मंडळाचे विश्वस्त व पदाधिकारी उपस्थित होते.

## गणेशोत्सवात रात्री १२ वाजेपर्यंत वाद्य वाजविण्याची परवानगी द्यावी

### ● पालकमंत्र्यांकडे मध्यवर्ती मंडळ पदाधिकाऱ्यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ०५ सप्टेंबर-**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमिवर रात्री १२ वाजेपर्यंत वाद्य वाजविण्यास परवानगी मिळावी, अशी मागणी सार्वजनिक मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे मागणी केली.



यावेळी यंदाचे उत्सव अध्यक्ष विनायक महिंद्रकर, ट्रस्टी अध्यक्ष बसवराज येरटे, ट्रस्टी दास शेळके, उपाध्यक्ष विजय पुकाळे त्यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. पालकमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात यंदाच्या गणेशोत्सवामध्ये पहिला दिवस ७ सप्टेंबर, व शेवटचा दिवस अनंत चतुर्दशी दिवशी रात्री बारापर्यंत वाद्य वाजवण्यासाठी सूट देण्यात आली आहे. परंतु उत्सवाचा नववा, दहावा आणि शेवटचा विसर्जन दिवशी सकाळी सहा ते रात्री बारा पर्यंत वाद्य वाजवण्याची परवानगी मिळावी त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना सूचना कराव्यात, अशी मागणी केली आहे. या प्रकरणात पालकमंत्र्यांनी सकारात्मकता दर्शवल्याचे मध्यवर्तीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ८७९

जाळूं नये नाव पावलेनि पार ।
मागील आधार बहुतांचा ।।

केवळ आपल्यासाठीच न करता इतरांसाठीही कांही तरी चांगलं करावं हा भारतीय संस्कृतीचा मूलमंत्र आहे. हा मूलमंत्र मानवतेचा आधारस्तंभ असला तरीही अनेक लोक या आधारस्तंभाला मजबूती देत नाहीत. अर्थात या मुलमंत्राचे पालन करीत नाहीत. आपल्यापुरते झाले म्हणजे संपले, एवढाच विचार बहुतांश लोक करतात. रेल्वे, बसमध्ये प्रवास करतांना असो की, रेल्वे स्थानक, बसस्थानकावर बसले असतांना असो, कचरा टाकणे, त्या जागेचा आवश्यक तो उपभोग घेवून कळत न कळत थोडेफार नुकसान करून निघून जाणे, नको ते वाक्य लिहणे, असे प्रकार माणूस करतो. रेल्वेच्या शौचालयात काहीतरी घाण वाक्येही लिहीली जा-



तात. आपल्यानंतर त्या जागेचा कोणी उपभोग घेईल याचा विचार न करता माणूस अनेक दुष्कृत्य सहज करून जातो. नदीच्या या काठाहून पलिकडच्या काठावर नावेने जायचे आणि आता आपण नदीपार केली. त्यामुळे नावेची गरज नाही म्हणून ती नाव जाळणे मुर्खता आहे. ती नाव इतरांच्या कामाला येईल याचा विचार माणसाने करायला हवा. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,

**जाळू नये नाव पावलेनि पार ।**
**मागील आधार बहुतांचा ।।.**

माणूस स्वत: उपभोग घेतो आणि इतरांना उपभोग घेता येऊ नये म्हणून निर्माण केलेले किंवा उपलब्ध असलेले नष्ट करून टाकतो. मानवाची ही मनोविकृती अनेकवेळा आपणालाही अनुभवायला मिळते. मी या मनोविकृतीचा अनुभव अनेकवेळा घेतला आहे. त्यातला एक अनुभव असा,जालन्याहून माझी परभणी येथे बदली झाली होती. त्यामुळे आम्ही सामानाची आवराआवर केली. आमचे खाजगी सामान आम्ही बांधले. तेथून जे आम्हाला नेण्याचा अधिकार नाही, किंवा आम्ही नेऊ नये अशा सामानालाही ते हात लावत होते. ते असे का करत होते हे माझ्या लक्षात यायला वेळ लागला नाही. कारण एका मदतगाराने मला स्पष्टपणे विचारले, साहेब आपण बंगल्याच्या आवारात जो भेंडी, टमाटे, गवार, वांगे आदी भाजीपाला लावला आहे तो उपटून टाकू का? मी आश्चर्याने विचारले असे का? त्यावर तो म्हणाला पलिकडच्या बंगल्यातील साहेबांची अचानक बदली झाली होती, तेव्हा त्यांनी त्यांच्या बंगल्याच्या आवारातील सर्व भाजीपाला उपटून टाकायला लावला होता. मदतगाराचे हे उत्तर ऐकून तुकोबांची आजची अभंगवाणी मला आठवली नसेल तर आश्चर्यच. असो मी तर एवढेच म्हणेन की, आपणाला निर्माण करता आले नाही तरी चालेल; पण निर्माण केले नष्ट तरी करू नये. तसेच कोणत्याही बाबींचा, साधनांचा आवश्यकतेपेक्षा उपभोगही घेऊ नये आणि साठवणूकही करु नये.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शुक्रवार**
**दि. ६ सप्टेंबर २०२४**
**विक्रम संवत् २०८०,**
**शके - १९४६**
**संवत्सर - क्रोधी नाम**
**मास - ज्येष्ठ**
**शु. तृतीया (१५.००)**
**ऋतु - वसंत**
**नक्षत्र- हस्त (०९.२४)**
**योग - शुक्ल (२२.१३)**
**करण - वणिज (२८.२०)**
**सुर्योदय - ०६.२७**
**सूर्यास्त - १८.४७**

**दिनविशेष -**
**हरितालिका तृतीया**
**स्वर्णगौरी व्रत, वराह जयंती**
**चांगला दिवस**

**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३ ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष :** व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही. शक्यतो प्रवास टाळा.

**वृषभ :** नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**मिथुन :** जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क :** आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह :** संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले. शक्यतो प्रवास टाळा.

**कन्या :** लोकांशी संपर्क वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ :** राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक :** उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु :** प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील.

**मकर :** व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

**कुंभ :** सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन :** कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल.

# आता, वडीलांना मुलगा सांगेल, रस्त्यावर थुंकणे बरे नव्हे!

**● शाळांमधून स्वच्छतेचा संदेश ● लेट्स चेंज उपक्रम : विविध शाळांतील विद्यार्थ्यांचा उपक्रमात होणार सहभाग**

### जिल्हा शिक्षण अधिकारी कादर शेख यांची माहिती

**तभा वृत्तसेवा । ॲड. विजयकुमार जाधव**
**सोलापूर, दि.४ सप्टेंबर-**

शरीराचे अणि मनाचे आरोग्य सदृढ होण्यामध्ये महत्वपूर्ण ठरणाऱ्या स्वच्छतेबाबत विद्यार्थांसह लोकांमध्ये अधिक जनजागृती करण्याच्या उद्देशाने लेट्स चेंज उपक्रमाद्वारे मुलांना शाळेतच स्वच्छतेचे धडे देण्याचे प्रयत्न केले जाणार आहे. या स्पर्धेतील स्पर्धामुळे मुलं यात सहभागी होत असून, पोरगं समाजातील नागरिकंसह बापालाही रस्त्यावर थुंकणे बरे नव्हे असे सांगणार आहेत. जिल्हा शिक्षण अधिकारी कादर शेख यांनी दैनिक 'तरुण भारत' शी बोलताना अशी माहिती दिली.

शिक्षण अधिकारी शेख म्हणाले, शिक्षण विभागाच्या वतीने लेट्स चेंज उपक्रम शाळा स्तरावर राबविला जाणार आहे. यात तिसरी ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्या स्वच्छता मॉनिटर यांचा सहभागही उत्स्फूर्तपणे दिसणार आहे. शाळा व परिसरात नव्हे तर घरी आणि परिसरातही स्वच्छतेचे धडे हे मुलं सर्वांना देणार आहेत.




मुलांचे कार्य शाळास्तरावरुन सोशल मीडियावर टाकले जाणार आहेत. शालेय मुलांना स्वच्छतेचे धडे मिळावेत यासाठी हा उपक्रम लाभदायी ठरणार असल्याचे शिक्षण अधिकारी कादर शेख यांनी सांगितले आहे.

### जिल्ह्यातील विद्यार्थांचा सहभाग



स्वच्छ भारत मिशन योजनेतर्गंत जिल्ह्यातील जवळपास २ हजार ७७७ शाळेत 'लेट्स चेंज' अतर्गंत इयत्ता पाचवी ते आठवीतील विद्यार्थी मोठ्यांना स्वच्छतेचे धडे देणार आहेत. या उपक्रमांतर्गत स्वच्छता मॉनिटर उपक्रमामुळे शाळा व परिसर स्वच्छ राहिलच. त्याचबरोबर विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढेल. यासह विद्यार्थ्यांचा वैयक्तिक विकास होण्यास या उपक्रमामुळे मदत होणार असून त्यांना एक जबाबदार नागरिक घडवण्यात हातभार लागणार आहे. **- कादर शेख,** जिल्हा शिक्षण अधिकारी

### काय आहे लेट्स चेंज उपक्रम?

शिक्षण विभागाच्या वतीने लेट्स चेंज हा उपक्रम राबविला जाणार आहे. शाळा, परिसरात, घर परिसरात अस्वच्छता करणाऱ्यांची जनजागृती स्वच्छता मॉनिटर करणार आहेत.

### विद्यार्थी होणार स्वच्छता मॉनिटर

लेट्स चेंज उपक्रमांतर्गत विद्यार्थी स्वच्छता मॉनिटर होणार आहेत. या उपक्रमाबाबत शिक्षण विभागाच्यावतीने मुलांना, शिक्षकांनाही मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

### २ हजार ७७७ शाळांतील विद्यार्थी होणार सहभागी

शिक्षण विभागाच्या वतीने जिल्ह्यात लेट्स चेंज उपक्रम राबविले जाणार असून, या अभिनांतर्गत जिल्ह्यातील २७७७ शाळांतील विद्यार्थानी सहभाग नोंदविला आहे.

## सोनी महाविद्यालयात सायबर सुरक्षा उपक्रम संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि ५ सप्टेंबर -**

सैफुल येथील देशभक्त हरिनारायण बंकटलाल सोनी महाविद्यालय व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुल क्विक हिल फॉउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमामध्ये संगणकशास्त्र संकुलातील राहुल शिंदे व मोहिनी दुधाळ या विद्यार्थ्यांनी सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन केले. आजच्या पिढीसाठी सायबर सुरक्षेच्या जागरुकतेचे महत्व, वैयक्तिक डेटा सुरक्षित करणे, ऑनलाइन धमक्यांचे प्रकार जसे फिशिंग, हॅकिंग, मलवेअर इ. तसेच सुरक्षित ब्राऊझिंग सवयी आणि ईमेल शिष्टाचार असे बरेच मुद्दे स्पष्ट केले. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांच्या मार्फत त्यांच्या पालकांना तसेच समाजातील 'लोकांना याची माहिती मिळावी हा उद्देशाने हा कार्यक्रम राबविण्यात आला.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्या प्रॉ. डॉ. आशा रोकडे संचालिका डॉ. वासंती अय्यर व उपप्राचार्या प्रा. हरदिप बोमरा, कॉम्प्युटर विभागाचे विभाग प्रमुख प्रा. नवनाथ भंडारे, आयक्यूएसी प्रमुख प्रा. अरविंद बगले यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन सानिया शेख यांनी केले. शितल जाधव यांनी आभार मानले.

## शहरात महापालिका बांधणार १२ सांस्कृतिक भवन

**पालिका उपसमितीच्या बैठकीत विविध विषयांनाही मंजुरी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

महापालिका उपसमितीच्या बैठकीत मिळाली विविध विषयांनाही मंजुरी देण्यात आली आहे. दरम्यान, शासनाच्या १०० टक्के निधीतून अखेर महापालिका शहरातील विविध भागांमध्ये ६ कोटी रुपये खर्चून सर्व समाजाचे १२ सांस्कृतिक भवन उभारण्यात येणार आहे. या प्रस्तावाला उपसमितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

महापालिका आयुक्त तथा प्रशासक तेली-उगले यांच्या अध्यक्षतेखाली आणि अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त , सहाय्यक आयुक्त आणि विभाग प्रमुख यांच्यासह महापालिकेतील अधिकाऱ्यांच्या उपस्थित झालेल्या या बैठकीत महापालिकेच्या विविध विभागासह प्रशासनाचे विविध सुमारे ६० विषय मान्यतेसाठी नगरसचिव कार्यालयामार्फत ठेवण्यात आले होते. यामध्ये पाच ते सहा विषय महत्त्वाचे आणि गरजेचे होते तर सुमारे ४० वर विषय हे माहितीस्तव आले होते.

यापूर्वी महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत शहरातील सर्व समाजाचे सांस्कृतिक भवन बांधण्यासंदर्भातील ठराव मंजूर करण्यात आले होते. याच ठरावाच्या अनुषंगाने शासनाच्या १०० टक्के निधीतून अखेर महापालिका शहरातील विविध भागांमध्ये ६ कोटी रुपये खर्चून सर्व समाजाचे १२ सांस्कृतिक भवन उभारण्यात येणार आहे. यासाठी महापालिका प्रशासनाने प्रस्ताव तयार केला होता. या प्रस्तावाला उपसमितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. याची पुढील प्रक्रिया लवकरच होणार आहे.

शहरातील विविध भागांमधील १२ समाजाच्या सांस्कृतिक भवन बांधण्याचा विषय महापालिकेने अखेर शासन निर्देशानंतर पटलावर घेतला आहे. या बारा सांस्कृतिक भवन बांधणे कामासाठी ५ कोटी ९९ लाख ३५ हजार ७८० रुपयांची रक्कम लागणार आहे.

### असे आहेत १२ सांस्कृतिक भवन

छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक भवन, रेवण सिद्धेश्वर मंदिर विजापूर नाका, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे समाज सांस्कृतिक भवन, क्षत्रिय समाज मंदिर, राजमाता अहिल्यादेवी होळकर समाज मंदिर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, गवळी समाज सांस्कृतिक भवन, श्री आदि जांबमुनी महाराज मोची समाज, श्री बसवेश्वर महाराज सांस्कृतिक भवन,पद्मशाली समाजासाठी सांस्कृतिक भवन, मुस्लिम समाजासाठी सांस्कृतिक भवन, ख्रिश्चन समाजासाठी सांस्कृतिक भवन

## 'गुरुविद्या'चे आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

### श्री दत्त व सिद्धेश्वर प्रशालेचाही गौरव

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जन्मदिनी शिक्षक दिनी सालादाप्रमाणे गुरूविद्या प्रतिष्ठानचे यंदाही गुरूविद्या आदर्श शिक्षक व शिक्षकेतर पुरस्कार प्रतिष्ठानचे अध्यक्ष सातलिंग शटगार यांनी जाहीर केले.

यंदाच्या वर्षी आदर्श शिक्षक पुरस्काराची निवड समितीचे काम सोमशेखर भोगडे, सातलिंग शटगार, राजश्री तडकासे, श्रीदेवी यळमेली, रेणुका हब्बू, नमिता थिटे, मोहन भूमकर, प्रा. प्रभाकर नागणसुरे यांनी पुरस्कारासाठी नऊ शिक्षक, शिक्षकेतर आणि दोन आदर्श शाळाची निवड केली आहे. हा पुरस्कार वितरण समारंभ ८ सप्टेंबर रविवारी संध्याकाळी ५ वाजता हॉटेल समृद्धी सिद्धेश्वर पेठ येथे पुरस्कार वितरण प्रमुख पाहुणे मान्यवरांचा हस्ते होईल. पुरस्काराचे स्वरूप शाल, स्मुतीचिन्ह प्रमाणपत्र, शाल, हार असे असणार आहे. या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सचिवा श्रीदेवी यळमेली यांनी केले आहे.

**पुरस्कारमूर्ती : शिक्षक :** राजकुमार उबंरजे सिद्धेश्वर (उपमुख्याध्यापक सिद्धेश्वर), नागराज पंडित पाटील (रामलिंगेश्वर, तीर्थ), महादेव करे (यमाई देवी आश्रम शाळा, मार्डी), रुद्रमणी वैजिनाथ स्वामी (करंजकर विद्यालय), मिनाक्षी किरण कुलकर्णी (नू.म.वि शाळा), प्रिती अंकुश दिवसे (मनपा मुलांची शाळा रामवाडी), शबाना शकूर जिनेदी (मनपा मराठी शाळा रामवाडी). **शिक्षकेतर :** दत्तात्रय जयहिंद सुतार (छत्रपती शिवाजी), राचया इरया स्वामी (गेनसिध्द प्रशाला कुंभारी). **आदर्श शाळा :** श्रीदत्त प्रशाला आणि ज्युनियर कॉलेज आकाशवाणी, सिद्धेश्वर देवस्थान संचलित श्री सिद्धेश्वर कन्या प्रशाला



श्री उबंरजे श्री पाटील श्री करे
श्री स्वामी श्री सुतार श्री स्वामी
श्रीमती कुलकर्णी श्रीमती जिनेदी श्रीमती दिवसे

## बाबासाहेब इंगळे यांना पीएच.डी.

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**



औसा येथील प्रा. बाबासाहेब इंगळे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील प्रा. डॉ. एस. एस. सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शना खाली पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. औसा येथील आजाद महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागात कार्यरत असलेले प्रा. बाबासाहेब इंगळे यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड कडून पीएचडी पदवी प्राप्त केली आहे. त्यांनी ''सिंथेसिस अँड इन्व्हेस्टिगेशन ऑफ एन. आय.सी.यु. झेडन. फेराईट विथ हाई इनिशीयल परमियाबिलिटी '' या विषयावर प्रबंध सादर केला होता. या यशाबद्दल त्यांचे विद्यापीठातील संचालक प्रा. बी जे लोखंडे, प्रा.व्ही बी पाटील, सर्व प्राध्यापक, कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.



## ॲड. एस. आर. पाटील यांचा पुण्यात सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ५ सप्टेंबर-**

बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र ॲड. गोवातर्फे पुण्यात पार झालेल्या राज्य वकील परिषदेत येथील ज्येष्ठ विधीज्ञ सिद्राम रामचंद्र पाटील यांचा सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक, न्यायमूर्ती प्रसन्ना वराळे यांच्या हस्ते शाल, बुके, मानचिन्ह, संविधान पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला.

हा कार्यक्रम स्वारगेट येथील गणेश क्रीडा कला मंच (पंडित नेहरू स्टेडियम) येथे झाला. या परिषदेमध्ये महाराष्ट्र राज्यातील १५ ज्येष्ठ वकिलांचा सत्कार करण्यात आला त्यात पाटील यांचा समावेश होता. तसेच ॲड. विजय मोहिते, न्यायाधीश भीमराव नाईक यांना मरणोत्तर आणि जेष्ठ वकील डॉक्टर सुधाकर आव्हाड यांना विधी महर्षी पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश के. आर. श्रीराम, रेवती मोहिते-डेरे, संदीप मारणे, पुण्याचे प्रमुख जिल्हा न्यायाधीश महेंद्र महाजन, उद्योगमंत्री उदय सामंत, बार कौन्सिल ऑफ इंडियाचे अध्यक्ष ॲड. मनन कुमार मिश्रा, माजी अध्यक्ष मिलिंद थोबडे, बीसीएमजीचे अध्यक्ष राजेंद्र उमाप उपस्थित होते. प्रास्तविकेत ॲड. राजेंद्र उमाप यांनी केले. ॲड. स्वराली गोडबोले, ॲड. शमिता पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

## कल्याणकारी योजना आणि नागरिक यांना जोडणारा उपक्रम मुख्यमंत्री योजनादूत

**महाराष्ट्र शासन राज्यातील नागरिकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबवत आहे. या लोक कल्याणकारी योजनांचे प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी शासनाने शासन आपल्या दारी हा महत्त्वाकांक्षी उपक्रम प्रत्येक जिल्ह्यात सुरू केलेला होता. या उपक्रमाच्या माध्यमातून लाभार्थ्यांच्या दारापर्यंत जाऊन त्यांना शासकीय योजनांचा लाभ देण्यात येत होता. या अंतर्गत राज्यातील लाखो नागरिकांना विविध शासकीय योजनांचा एका छताखाली लाभ देण्यात शासन यशस्वी झाले होते. याच उपक्रमाचा विस्तार म्हणजे मुख्यमंत्री योजना दूत असून, याचा मुख्य उद्देश सामाजिक बदल घडविण्यासाठी ५० हजार तरुणांच्या प्रयत्नाद्वारे जनतेपर्यंत पोहोचणे हा आहे. कल्याणकारी योजना आणि नागरिक यांना जोडणारा उपक्रम म्हणजेच मुख्यमंत्री योजनादूत होय.**

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि मुख्यमंत्री जन-कल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे मुख्यमंत्री योजनादूत कार्यक्रम राबविला जाणार आहे. राज्यात कार्यरत प्रशासकीय यंत्रणेला मदत करण्याकरिता मुख्यमंत्री योजनादूत नेमले जातील. ग्रामीण भागात प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी १ व शहरी भागात ५००० हजार लोकसंख्येसाठी १ योजनादूत या प्रमाणात एकूण ५० हजार योजनादूतांची निवड करण्यात येईल. मुख्यमंत्री योजनादूतास प्रत्येकी १०,००० प्रती महिना एवढे ठोक मानधन देण्यात येईल. (प्रवास खर्च, सर्व भत्ते समावेशित)४) निवड झालेल्या मुख्यमंत्री योजनादूतासोबत ६ महिन्यांचा करार केला जाईल व हा करार कोणत्याही परिस्थितीत वाढविण्यात येणार नाही. उमेदवाराचा वयोगट १८ ते ३५ असावा. कोणत्याही शाखेचा किमान पदवीधर असावा. उमेदवाराला संगणक ज्ञान असणे आवश्यक. उमेदवाराकडे अद्यावत मोबाईल असणे आवश्यक. उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक. उमेदवारांचे आधार कार्ड असावे व त्याच्या नावाचे बँक खाते आधार संलग्न असावे. विहीत नमुन्यातील मुख्यमंत्री योजना दूत कार्यक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज, आधार कार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतचे पुराव्या दाखल कागदपत्रे/प्रमाणपत्र इत्यादी. अधिवासाचा दाखला (सक्षम यंत्रणेने दिलेला). वैयक्तिक बँक खात्याचा तपशील. पासपोर्ट साईज फोटो. हमीपत्र (ऑनलाइन अर्जासोबत च्या नमुन्यामध्ये) प्रत्यक्ष कामाचा अनुभव. सामाजिक बदलाचा भाग होण्याची संधी. विद्या वेतनातून युवकांना आर्थिक सहाय्य. शिकण्याबरोबरच कौशल्य विकास. सरकारी कामकाजाचा अनुभव. राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी(२७८३४), प्रत्येक नगरपालिका क्षेत्रासाठी(५३८३) एक तर महानगरपालिकेच्या १२९६ वार्ड साठी प्रत्येकी एक याप्रमाणे राज्यात एकूण ४७ हजार ५१६ योजना दूत ची निवड केली जाणार आहे. म्हणजे शहरी भागात १९ हजार ६८२ व ग्रामीण भागात २७ हजार ८३४ योजना दूत लवकरच निवडले जाणार आहेत.



### योजनादूताने करावयाची कामे

योजनादूत संबंधित जिल्हा माहिती अधिकारी यांच्या संपर्कात राहून जिल्ह्यातील योजनांची माहिती घेतील. प्रशिक्षित योजनादूतांनी त्यांना नेमून दिलेल्या ठिकाणी समक्ष जाऊन त्यांना ठरवून दिलेले काम पार पाडणे त्यांच्यावर बंधनकारक राहील. योजनादूत राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रचार आणि प्रसिद्धी करतांना ग्राम पातळीवरील यंत्रणांशी समन्वय करून शासनाच्या योजनांची घरोघरी माहिती होईल यासाठी प्रयत्न करतील. योजनादूत दर दिवशी त्यांनी दिवसभर केलेल्या कामाचा विहित नमुन्यातील अहवाल तयार करुन तो ऑनलाईन अपलोड करतील. योजनादूत त्यांना सोपविलेल्या जबाबदारीचा स्वतःच्या स्वार्थासाठी/नियमबाह्य कामासाठी उपयोग करणार नाहीत, तसेच ते गुन्हेगारी स्वरुपाचे/गैरवर्तन करणार नाहीत. योजनादूत तसे करत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यासोबत करण्यात आलेला करार संपुष्टात आणण्यात येवून त्यांना जबाबदारीतून मुक्त करण्यात येईल. ६) योजनादूत अनधिकृतरित्या गैरहजर राहिल्यास किंवा जबाबदारी सोडून गेल्यास त्याला मानधन अनुज्ञेय राहणार नाही.

**-सुनील सोनटक्के**
**जिल्हा माहिती अधिकारी.**

## संक्षिप्त वृत्त



### आर. एस. गायकवाड यांना डॉ. आंबेडकर राष्ट्रीय सेवारत्न पुरस्कार

**अणदूर, दि. ५ सप्टेंबर-**

वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा सहसचिव अणदूर चे सुपुत्र आर एस गायकवाड यांना नुकताच डॉ बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय सेवा रत्न पुरस्कार प्राप्त झाला . त्यांनी गेल्या ३०-३५ वर्षांमध्ये विद्यार्थी चळवळीपासून ते शैक्षणिक सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्य केले, त्यांनी अनेक चळवळीमध्ये, नामांतर लढ्यामध्ये मोठी कामगिरी बजावली आहे . त्यांच्या कार्याची दखल घेत सहारा चारिटेबल ट्रस्ट या राष्ट्रीय संस्थेने आर एस गायकवाड यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय सेवा रत्न पुरस्कार प्रदान केला आहे . या पुरस्काराचे वितरण वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष बाळकृष्ण शिंदे फुले आंबेडकर विद्वत सभेचे राज्य समन्वयक डॉ शहाजी चंदनशिवे वंचित बहुजन आघाडीचे धाराशिव जिल्हा महासचिव धनंजय सोनटक्के, बाबासाहेब जानराव, जिल्हा सहसचिव मोहन दादा बनसोडे ,महाराष्ट्र पोलीस टाईम चे संपादक उमेश काळे , वंचित बहुजन आघाडीचे परांडा तालुका उपाध्यक्ष मधुकर सुरवसे, परंडा तालुका सहसचिव राहुल पवार या सर्वांच्या उपस्थितीमध्ये या पुरस्काराचे वितरण करण्यात आले . यावेळी धाराशिव जिल्ह्यातील अनेक मित्रपरिवार कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आर. एस. गायकवाड यांना मिळालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय सेवा रत्न पुरस्कारामुळे त्यांच्या मित्र परिवारांनी आप्तेष्टांनी अभिनंदन व कौतुक केले.



### रामभाऊ जोशी हायस्कूल स्काऊटच्या विद्यार्थ्यांनी केली सुंदर परसबाग निर्मिती

**करकंब, दि. ५ सप्टेंबर-**

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेअंतर्गत रामभाऊ जोशी हायस्कूल करकंब येथील स्काऊट गाईड विद्यार्थ्यांनी स्काऊट शिक्षक महादेव पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली परसबागेची निर्मिती करून भाजीपाला व इतर पदार्थाचा समावेश शालेय पोषण आहार योजनेमध्ये व्हावा,निसर्गाशी जवळीक साधावी त्यातून पौष्टिक आहार निर्माण व्हावा या उद्देशाने सुंदर परसबागेची निर्मिती करण्यात आली आहे.ठिबक सिंचनाच्या साह्याने संपूर्ण परसबागेतील भाजीपाला व फळझाडांना पाण्याची सोय करण्यात आली. या परसबागेचे उद्घाटन मुख्याध्यापक हेमंत कदम, पर्यवेक्षक धनवंत करळे यांच्या हस्ते करण्यात आले. मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियानांतर्गत प्राथमिक तपासणी पथकाच्यावतीने परसबागेची मूल्यांकनही करण्यात आले.



### करकंब पोलिसांचा रूट मार्च

**करकंब, दि. ५ सप्टेंबर-**

करकंब पोलीस ठाणेच्यावतीने करकंब शहरातून दि.४सप्टेंबर रोजी गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद २०२४या सणांच्या अनुषंगाने करकंब पोलिसांचा रूटमार्च काढण्यात आला. उत्सव कालावधीत शांतता राखणे व कायदा व सुव्यवस्थेचा कोणताही प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पोलीस ठाणे हद्दीमध्ये करकंब शहरातील मुख्य रस्त्यावरून रूट मार्च काढण्यात आला. कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यावर उपाययोजना म्हणून करकंब पोलीसठाणे अंतर्गत दंगाकाबू योजना प्रात्यक्षिकाचेही आयोजन करण्यात आले. सदर रुटमार्चमध्ये एक पोलीस अधिकारी २४ पोलीस अंमलदार उपस्थित होते.

### मध्यवर्ती म. बसवेश्वर गणेशोत्सव मंडळच्या अध्यक्षपदी नागेश मायनाळे

**मंद्रुप, दि. ५ सप्टेंबर-**



येथील मानाचा मध्यवर्ती महात्मा बसवेश्वर गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी नागेश मायनाळे यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्ष आकाश हेळकर, केदार घाले, सचिव संतोष नंदुरे, खजिनदार विनायक लच्याणे, मिरवणूक प्रमुख मिथुन मुगळे, रवीकुमार कालदे, निंगू ख्याडे, राजू नंदुरे, म्हाळाप्पा घाले, दयानंद ख्याडे, महेश हेळकर आदी.



### शालेय समितीच्या अध्यक्षांनी तीर्थमध्ये मारला बोअर

**वळसंग, दि. ५ सप्टेंबर-**

तीर्थ (ता,. दक्षिण सोलापूर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळेतील विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी, यासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शिक्षक सिद्धेश्वर बिराजदार यांच्या कुटुंबीयांकडून बोअर मारून देण्यात आला. यावेळी वेदमूर्ती सिद्धारूढ स्वामी, शिक्षिका आशा वाले, गंगाबाई हिरेमठ, गंगाबाई कुर्ले, सुनील शिवानंद पाटील, दयानंद कोरे, हसन मुल्ला, माजी सरपंच ईलाई मुल्ला, मुख्याध्यापक उत्तमकुमार जाधव, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सिद्धेश्वर बिराजदार, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोअरला शंभर फुटालाच भरपूर पाणी लागल्यावर वे. सिद्धारूढ स्वामी यांच्या हस्ते गंगापूजन करण्यात आले.

# प्रवचनमालेतून आध्यात्म, समाज जीवनाचे धडे

## प्रभाकरदादा महाराज बोधले : बार्शीतील प्रवचनमालेचा सांगता समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ सप्टेंबर-**

श्रावण प्रतिप्रदेला श्रीभगवंत मंदिरात होत असलेल्या 'श्रावणमास प्रवचनमाला' वाग्यज्ञाला २१ वर्षे पूर्ण झाली. डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज बोधले यांच्या अमोघ वाणीतून गेली ३० दिवस विनामानधन श्रीसंत एकनाथ महाराज चरित्र व तत्त्वज्ञान या विषयावर बार्शीकरांना आध्यात्म आणि समाज जीवनाचे धडे मिळत आहेत.

डॉ. श्रीगुरु जयवंत महाराजांच्या प्रवचनाला तरुणांची असलेली लक्षणीय संख्या बार्शीच्या आध्यात्मिक परंपरेला अधिक मजबूत करत असल्याचे दिसून येते. संत एकनाथांचे चरित्र समाजाला प्रपंचात राहून परमार्थ साधण्यासाठी नवऊर्जा देते; शिवाय जीवनातील प्रतिकूल घटनांना सकारात्म



कतेच्या दृष्टीकोनाने पहायला शिकवते, असे या प्रवचन विषयाच्या सांगतेसमयी डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज मार्गदर्शन करतात. श्रावणमास प्रवचनमालेची मंगळवारी सांगता होत असताना सद्गुरु प्रभाकरदादा महाराज बोधले यांचे आर्शीवचन बार्शीकरांना पर्वणी ठरली. याप्रसंगी डॉ. बी.वाय.यादव, माजी मंत्री दिलीप सोपल, डॉ. रंगनाथ महाराज

> **महाप्रसादाचे वाटप**
>
> सर्व मंदिर परिसर जनसमुदायाने फुलून गेला होता. प्रवचनमालेच्या महाप्रसादाचे वाटप आदर्श लॉन्सचे श्री.रवि आण्णा राऊत हे प्रतिवर्षी निस्पृहपणे करतात. याप्रसंगी सर्वांचे आभार व्यक्त करत कार्यक्रमाची सूत्रे प्रा. विलास जगदाळे सर यांनी सांभाळली.

काकडे तसेच चि. वेदांत जयवंत महाराज बोधले यांनी आपल्या मनोगतातून प्रवचनमालेची कृतकृत्यता व्यक्त केली.

सद्गुरु बोधले महाराज संस्थान, डिकसळचे प्रमुख डॉ. प्रकाश महाराज बोधले यांनी आपल्या हटक्या शब्दशैलीतून ही प्रवचनमाला म्हणजे बार्शीकरांचा आनंदसोहळा आहे, असे सांगितले. बोधले परिवारातील श्री.आण्णासाहेब महाराज बोधले, आईसाहेब सौ.भाग्यलक्ष्मी (नयनी), सौ. अश्विनी जयवंत महाराज बोधले इ. सदस्यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी श्रीभगवंत देवस्थान ट्रस्टचे सरपंच श्री. दिलीपदादा बुडूख, श्री. नानासाहेब सुरवसे, श्री. मुकुंदशेठ कुलकर्णी उपस्थिती होते. त्याचबरोबर, सद्गुरु बोधराज भक्त मंडळाचे श्री. बोधले बहु, श्री. सोमाणी काका, श्री.भारत गरड, श्री.नाना राऊत ,श्री.पप्पू ढगे इ. सर्व सदस्य व पंचक्रोशीतील सद्गुरु बोधले फज परंपरेच्या शिष्यगणांनी हजेरी लावली.

## मनसेच्या वतीने वैद्यकीय सेवा बजावणाऱ्या सर्व डॉक्टर्स बंधूंचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.५ सप्टेंबर-**

काळ वेळ न पाहता जे होतात रुग्णसेवेत रुजू सांगा डॉक्टर तुमचे उपकार कोणत्या शब्धात मोजू या वाक्याप्रमाणे पंढरपूर शहर व तालुक्यात गेली अनेक वर्ष अविरतपणे वैद्यकीय सेवा बजावून लोकांचे प्राण वाचवून हजारो लोकांना जीवनदान देऊन त्यांचे कुटुंब आनंदी आणि सुखी राहावे यासाठी अविरतपणे काम करणाऱ्या माणसातील देव माणूस असलेल्या पंढरपूर येथील सर्व डॉक्टर्स बंधूंचा गौरव व सन्मान महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या हस्ते पार पडला.

याप्रसंगी व्यासपीठावर विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील, आय.एम.ए अध्यक्ष डॉ. शितल शहा, निमा अध्यक्ष डॉ.अमरसिंह जमदाडे, डेंटल असोसिएशन अध्यक्षा डॉ.ऋचा खूपसंगीकर, होमिओपॅथी असोसिएशन अध्यक्षा डॉ. जयश्री शिनगारे, पंढरपूर उपजिल्हा रुग्णालयाचे अधिक्षक डॉ. महेश सुडके,



> **दिलीप धोत्रेंना जनतेचा पाठिंबा**
>
> मनसे अध्यक्ष राज साहेब ठाकरे यांनी मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या कामाची दखल घेऊन राज्यातील मनसेचा पहिला उमेदवार म्हणून त्यांच्या नावाची घोषणा झाल्यानंतर त्यांना जनतेचा तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींचा वाढता पाठिंबा मिळू लागला. यामध्ये मोठी भर पडली ती विठ्ठलचे चेअरमन अभिजीत पाटील यांची यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत दिलीप धोत्रे यांची ताकत व अभिजीत पाटील यांची ताकत एकवटुन धोत्रे यांचे पारडे जड झाल्याची चर्चा सर्वत्र रंगू लागली आहे.

तालुका वैद्यकीय अधिकारी एकनाथ बोधले उपस्थित होते.

याप्रसंगी डॉक्टर्स बंधूंशी संवाद साधताना मनसे नेते दिलीपबापू धोत्रे यांनी सुरुवातीला सर्व डॉक्टर्स बंधूंचे आभार मानून आपला परिचय करून देताना शालेय जीवनापासून आतापर्यंतच्या राजकीय प्रवासाला उजाळा देत मनसेच्या वतीने पंढरपूर शहरात केलेल्या सामाजिक कार्याची माहिती दिली.

यानंतर पंढरपूर येथील सर्व डॉक्टर संघटनेचे अध्यक्ष, पदाधिकारी आणि वैद्यकीय क्षेत्रात काम करत असणाऱ्या सर्व डॉक्टर्स मंडळींचा भगवी शाल, फेटा बांधून पुष्पहार घालून व मनसे गौरवचिन्ह देऊन मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांच्या हस्ते सन्मान करून मनसे गौरव सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि डॉक्टर संघटनेच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (ता.४) पंढरपूर येथील लिंक रोड वरील हॉटेल चतुर्थी हॉल येथे करण्यात आले होते.

यावेळी मनसे जिल्हा अध्यक्ष प्रशांत गिड्डे, , संतोष कवडे, गणेश पिंपळनेरकर, अनिल बागल, ॲड. संदीप रणनवरे, ॲड. पराग जहागीरदार, उद्योजक सुहास शिर्के, आदित्य फत्तेपूरकर, अनिल सप्ताळ,शशिकांत पाटील यांच्यासह सर्व डॉक्टर्स संघटनांचे पदाधिकारी आणि डॉक्टर्स बंधू उपस्थित होते.



### विद्यार्थिनींनी चालवली वाफळकरवस्तीची शाळा

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ५ सप्टेंबर-**

शिक्षक दिनानिमित्त जि.प.प्रा.शाळा वाफळकरवस्ती येथील आरुषी वसेकर मुख्याध्यापिका,समृद्धी माळी,तनुजा माळी, आराध्या टेके शिक्षिका या विद्यार्थिनींनी शिक्षक बनून अध्यापन करत मुलांना शिकवण्याचा प्रयत्न करत शालेय कामकाज चालवले.

अध्यापनाचे कार्य करीत असताना या विद्यार्थिनींच्या व अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या चेहर्यांवरती आगळावेगळा आनंद दिसून येत होता.शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले पुष्पगुच्छ शिक्षकांना भेट देऊन त्यांना शुभेच्छा दिल्या.या उपक्रमाबद्दल पालकांनी समाधान व्यक्त करून विद्यार्थी, विद्यार्थिनी, मार्गदर्शक शिक्षकांचेअभिनंदन केले. शिक्षकदिन साजरा करण्यासाठी मुख्याध्यापक किरण ढोबळे, सहशिक्षक ज्ञानेश्वर दुधाणे यांनी मार्गदर्शन केले. संबंधित पालकांनी या उपक्रमाबद्दल सहकार्य केले.

## गौरवी खरात हिचे अबॅकस स्पर्धेत यश

**अक्कलकोट, दि. ५ सप्टेंबर-**

श्रद्धा इन्स्टिट्यूटतर्फे घेण्यात आलेल्या स्टेट लेवल अबॅकस स्पर्धेत अक्कलकोटमधील कनक क्लासेसची विद्यार्थिनी गौरवी किशोर खरात हिने सात मिनिटात १९१ गणित सोडवून तिसऱ्या रँकमध्ये आल्याबद्दल तिचा सोलापूर येथील सत्यविजय हॉलमध्ये ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला.

या यशामागे तिचे मार्गदर्शक शिक्षिका नेहा शहा यांचे अनमोल



मार्गदर्शन लाभले.

## अक्कलकोटमध्ये दंगा काबू पथकाचे प्रात्यक्षिक

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. ५ सप्टेंबर-**

श्री गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद उत्सव अनुषंगाने उत्सव कालावधीत शांतता राखणे, कायदा व सुव्यवस्थेचा कोणताही प्रश्न निर्माण होऊ नये म्हणुन उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावार यांच्या मार्गदर्शनाखाली दंगा काबू योजना प्रात्यक्षिक घेण्यात आले.



बुधवारी सायंकाळी साडेपाच ते साडेसहादरम्यान फत्तेसिंह मैदान अक्कलकोट येथे लाठी सेक्शन, ढाल सेक्शन व रायफल सेक्शन असे सेक्शन करून दंगा काबू योजना प्रात्यक्षिक घेण्यात आले. या प्रात्यक्षिकामध्ये अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणेकडील आठ हँड ग्रॅनेड व आठ स्टन सेल वापरून प्रात्यक्षिक घेण्यात आले. यावेळी पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, पोलीस निरीक्षक महेश स्वामी, सपोनि अनिल सनगल्ले अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणेकडील चार पोलीस अधिकारी व १७ पोलीस अंमलदार, अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याकडील ३ पोलीस अधिकारी व १७ पोलिस अंमलदार व वळसंग पोलीस ठाणेकडील ४ पोलीस अधिकारी व १३ पोलिस अंमलदार दंगा काबू योजना प्रात्यक्षिकमध्ये सहभागी झाले होते.

## विद्यार्थ्यांना अतिउच्च शिखरावर जाण्याचा मार्ग दाखवणारी व्यक्ती म्हणजे शिक्षक : ब्रह्माकुमारी अनिता बहेन

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ५ सप्टेंबर-**

शिक्षक दिनाच्या निमित्ताने प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय शाखा करकंब यांचेवतीने शिक्षकांना गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले.



प्रथम परमपिता शिव परमात्मा यांचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. अनिता बहेनजी यांच्या हस्ते आदर्श शिक्षक महादेव पुजारी, नागन्नाथ घाटुळे, संतोष भोसले, रमेश खारे, विजया पवार, ज्ञानेश्वर दुधाणे आदिंना मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले. शिक्षक ही अशी एकच व्यक्ती आहे जी विद्यार्थी,विद्यार्थिनींना आयुष्यात पुढे जाण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देते, विद्यार्थ्यांमध्ये अवगुण कमी करून जीवनामध्ये अत्युच्य शिखरावर जाण्याचा मार्ग विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणे दाखवते,जीवनात पुढे जाण्यासाठी प्रोत्साहन देते आपण मात्र एकाच ठिकाणी थांबते.आध्यात्म हासुध्दा एक शिक्षकच आहे की जो सर्वांना मी एक अविनाशी आनंदमय परमात्मा आहे त्याचीही साधना करा,त्यामुळे आयुष्यात चढ उतार जाणवणार नाहीत याविषयी ज्ञान मिळते, असे ब्रह्मकुमारी अनिता बहेन यांनी सांगितले. यावेळी ज्ञानेश्वर दुधाणे, नागनाथ घाटुळे, साधकमाता अंजली टकले, स्नेहा दुधाणे, संजीवनी शिंदे, आशा वागज, मंगल टकले, राखी पुरवत, नीता राऊत, सविता टकले आदी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### झेरॉक्स सेंटरवाल्याने महिलेचा हात पकडला

**बार्शी, दि. ५ सप्टेंबर-**

बॅंकेत आधारकार्डची झेरॉक्स दयायची असल्याने झेरॉक्स काढण्यासाठी गेलेल्या महिलेला झेरॉक्स सेंटरवाल्याने सदर महिलेचा हात पकडून टॉप फाडून विनयभंग केल्याचा प्रकार पंचायत समितीशेजारी ओम झेरॉक्स सेटरमध्ये घडला आहे.

सदर पिडाताच्या फिर्यादीवरुन संशयित रामचंद्र महालींग यादव (रा. बार्शी) याच्याविरुद्ध शहर पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. ३ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० च्या सुमारास पंचायत समिती ऑफिसशेजारी असलेल्या ओम झेरॉक्स येथे सदर पिडीता झेरॉक्स काढणेसाठी गेली होती. पैसे देताना हात पकडून अंगावरील टॉपची भाही फाडून छेडाछेडी करुन मनास लज्जा उत्पन्न होईल, असे कृत्य केले असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.



### महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांनी घेतले श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ सप्टेंबर-**

राज्याच्या महिला व बालविकास अदिती वरदा सुनील तटकरे यांनी आज श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी समाधान नागणे , नायब तहसीलदार वैभव बुचके, विजय जाधव तसेच मंदिर समितीचे कर्मचारी उपस्थित होते.

## वैरागमध्ये हुतात्मा दिन साजरा

### दुष्काळाची पार्श्वभूमी; मोर्चामुळे रोजगार हमीचा कायदा सहमत

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ५ सप्टेंबर-**

वैराग भागात सहा सप्टेंबर हा दिवस हुतात्मा दिन म्हणून साजरा केला जातो. कारण भीषण दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर ६ सप्टेंबर १९७१ रोजी विविध मागण्यांसाठी महाराष्ट्रातील अनेक गावात मोर्चे काढण्यात आले. या मोर्चावर इस्लामपूर, नागपूर, वैराग या ३ ठिकाणी गोळीबार करण्यात आला. या मोर्चामुळेच महाराष्ट्रात रोजगार हमीचा कायदा सहमत करण्यात आला हे विशेष.

बार्शी तालुक्यातील जनता दुष्काळात होरपळत होती. या पार्श्वभूमीवर वैरागमध्ये दुष्काळाच्या भीषण झळा



सोसणाऱ्या ग्रामस्थांनी दुष्काळी योजनात हलगर्जीपणा करणाऱ्याच्या विरोधात विविध मागण्यांसाठी मोर्चा काढला होता. विधानसभेचे तत्कालीन विरोधी पक्षनेते भाई उध्दवराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हाताला काम द्या कामाचे योग्य दाम द्या. आदी मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चात माजी आ. चंद्रकांत निंबाळकर, आ. विश्वासराव फाटे, भाई सर्जेराव सगर, भाई ज्ञानेश्वर पाटील, भाई सुभाष हुरे-पाटील, भाई गणपतराव जोशी, भाई जिवाजीराव पाटील, रोहिदास कांबळे आदी नेते यात सहभागी झाले होते.

> **हेच ते आठ हुतात्मे -**
>
> एकनाथ ज्योती साळुंके (वैराग), इब्राहीम चांदसाहेब शेख (वैराग), सुंदराबाई लक्ष्मण चव्हाण (वैराग), बब्रुवाहन तुळशीराम माळी (मानेगांव), भास्कर बाबुराव वाळके (मानेगांव) रघुनाथ श्रीपती माने (रातंजन), उध्दव श्रीपती गोफणे (हळदुगे), चतुर्भुज विठ्ठल ताकभाते (श्रीपत पिंपरी).

यावेळी प्रशासनाने जनतेच्या मागण्यांचा विचार करण्याऐवजी जिल्हाधिकारी डॉ. होले, उपजिल्हाधिकारी जोडवेकर व उपविभागीय पोलीस अधिकारी डेमला यांनी मोर्चेकऱ्यांवर लाठीमार करण्याचे आदेश दिले. यावेळी पोलीसांनी आंदोलकांवर बेछुट गोळीबार केला. यामध्ये हजारो लोक जखमी झाले, तर शेकडो लोक जायबंदी झाले. यावेळी आठ जणांना हौतात्म्य पत्करावे लागले. गोळीबार खटला चालवण्यासाठी बार्शी येथे विशेष न्यायालयाची स्थापना करण्यात आली होती. यात मोर्चेकऱ्यांच्या बाजूने वकील म्हणून न्या. बी. एन. देशमुख यांनी काम पाहिले होते. अनेक वर्षे हा न्यायालयीन लढा सुरु असताना शेवटी तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी शासनातर्फे हा खटला मागे घेतला होता .

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## – वळसंगच्या श्री शंकरलिंग प्रशालेत शिक्षक दिन साजरा –

**वळसंग, दि. ५ सप्टेंबर-**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन शिवशरण थळंगे होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्रीशैल दुधगी, सदस्य विश्वनाथ थळंगे, शिवशरण प्याटी, प्रकाश दुधगी, मल्लिनाथ थळंगे, रमेश दुधगी उपस्थित होते. स्वागत कलाशिक्षक अजय माणकोजी व विद्यार्थिनींनी स्वागत गीताने केले. प्राचार्य वीरेश थळंगे यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी समृद्धी साळे, गंगा बागलकोटी यांनी मनोगत व्यक्त केले. पर्यवेक्षक शिवानंद घोडके यांची कन्या दीप्ती घोडके हिचे डीआरडीओ रक्षा मंत्रालय भारत सरकार यांच्यामार्फत बेंगळुरू येथे बी. टेक. अप्रेंटिससाठी निवड झाल्याबद्दल तिचा सत्कार करण्यात आला. श्रीमंत भोसले यांनी दिप्ती घोडके हिची मुलाखत घेतली. याप्रसंगी तानाजी जमादार, सिदधाराम भैरामडगी, बाळकृष्ण गुंड, नीलकंठ कवटगी, सिद्धारूढ हिरेमठ, गंगाधर बिराजदार, संतोष कस्तुरे, विरेश थळंगे, विजय प्याटी, प्रा. संतोष शिंदे, विजयालक्ष्मी थळंगे, स्नेहा हळगोदे, रूपाली कलशेट्टी, प्रा. प्रतिभा तांडुरे, लिपिका राजश्री दुधगी, लिपिक गौरीशंकर चनशेट्टी, कर्मचारी कट्टेप्पा कोळी, विनोद दुधगी उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...

### जय भवानी गणेशोत्सव मंडळच्या अध्यक्षपदी दत्तात्रय वायदंडे

**नातेपुत, दि. ५ सप्टेंबर-**



पंचायत समिती माजी सदस्य माऊली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नातेपुते येथील जय भवानी गणेश उत्सव तरूण मंडळ पांढरे मळा, गिरजापती नगर येथील जय भवानी गणेश उत्सव मंडळच्या अध्यक्षपदी दत्तात्रय वायदंडे तर उपाध्यक्षपदी परेश कवितके, कार्याध्यक्ष किशोर बंडगर, खजिनदार रच्वना अडवीतोटे, यांच्या निवडी जाहीर झाल्या आहेत. मंडळाचे सभासद नातेपुते नगरपंचायतचे नगरसेवक आण्णासाहेब पांढरे, राजू पांढरे, अंकुश कचरे, अनिल शेख, राहुल पांढरे, सागर बिचुकले, तात्यासाहेब ठोंबरे, सचिन पांढरे, रामभाऊ पांढरे, दादासाहेब पांढरे, विनोद पांढरे, तानाजी महारनवर, ज्ञानदेव काळे, भरत थोरात, राहुल कुचेकर, नागेश मेटकरी, राहुल करे, विठ्ठल केसकर, गोरख पांढरे, गणेश जाधव, पांडुरंग सोलनकर, गौतम नाईकनवरे, बाबासाहेब नाईकनवरे, आशोक गोरे, संदेश पवार, विवेक गोरे, सुनिल पांढरे, विशाल चांगण, अविनाश पांढरे, गौरव ढोबळे, दीपक ढोबळे, विकी करे, सौरभ पांढरे, आशपाक मुलाणी, सोपान रुपनवर, मनोज बोकन, शुभम पांढरे, मुकेश धाईजे, अशुतोष महारनवर, यांच्या निवडी झाल्या.



### बार्शीतील श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालयात शिक्षक दिन साजरा

**बार्शी दि. ५ सप्टेंबर-**

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. गिरधारीलाल तातेड यांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष किशोर श्रीश्रीमाळ, ऑ. सेक्रेटरी आनंद पुनमिया, संचालक धीरज कुंकूलोळ, प्रमोद भंडारी, सुजित गुंदेचा, कमलेश तातेड आदी मान्यवर उपस्थित होते. त्यानंतर गिरधारीलाल तातेड यांचा वाचनालयाचे अध्यक्ष किशोर श्रीमाळ व संचालक धीरज कुंकूलोळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी वाचनालयाचे सभासद व वाचक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन वाचनालयाचे ग्रंथपाल सुरेश यादव यांनी केले, सहा ग्रंथपाल पल्लवी तौर मॅडम, क्लार्क विराज पतंगे हे उपस्थित होते.



### मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांचा सत्कार

**पिलीव, दि. ५ सप्टेंबर-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी नुकतेच कुलदीप यादव हे रुजु झाले आहेत. याबद्दल नूतन कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांचे काळमवाडी गावचे लोकनियुक्त सरपंच भुजंगराव शिंगाडे यांनी सत्कार केला. यावेळी त्यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष बळीरामकाका साठे तसेच श्रीकांत आवताडे व इतर मान्यवर उपस्थित होते

### दयानंद काळुंके यांना राज्यस्तरीय आदर्श दर्पणरत्न पुरस्कार जाहीर

**अणदूर, दि. ५ सप्टेंबर-**



तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जेष्ठ पत्रकार तथा जयमल्हार पत्रकार संघाचे सदस्य दयानंद तुकाराम काळुंके यांना गरुड फाऊंडेशन अरळी यांच्याकडून सन २०२४ चा राज्यस्तरीय आदर्श दर्पणरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. या अगोदर दयानंद काळुंके यांना विविध क्षेत्रातील दोन डझन पुरस्कार मिळाले आहेत. गरुड फाऊंडेशनच्या पुरस्काराचे वितरण लवकरच करण्यात येणार आहे असे गरुड फाऊंडेशनचे अध्यक्ष आकाश पुजारी यांनी निवडपत्र देऊन कळविले आहे. त्यांच्या या निवडप्रित्यर्थ जयमल्हार पत्रकार संघ, ८-फार्मा ग्रुप व खडकाळी मॉर्निंग क्लबच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

### गुरुसिद्धप्पा रुद्राक्षी यांचे देहदान

**विजयपूर, दि. ५ सप्टेंबर-**



विजयपूर येथील गुरुसिद्धप्पा बसप्पा रुद्राक्षी (८२) यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांच्या इच्छेनुसार त्यांचे पार्थिव बीएलडीई हॉस्पिटलला दान केले. रुद्राक्षी यांचे मंगळवारी सकाळी निधन झाले. यावेळी रुग्णालयातील शरीरशास्त्र विभागाचे डॉ. एस. व्ही. यातगिरी, डॉ. अश्विनी नुच्ची, डॉ. वीणा हरवाळकर यांनी पार्थिव स्वीकारले. विभागप्रमुख डॉ. आर. एस. बुलागौड यांनी ही माहिती दिली.

## डीसीसी बँकेच्या प्रशासकाला मुदतवाढ मिळणार?

### ● सहा वर्षांपासून बँकेचा कारभार प्रशासकाच्या हाती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ सप्टेंबर-**

शेतकऱ्यांची बँक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकच्या संचालकांनी डबघाईला आणि अवसायनात आणलेली त्यामुळे २०१८ मध्ये प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली असल्याने बँकेचा कारभार व्यवस्थित आहे. पुन्हा प्रशासक कारभारास मुदत वाढ मिळेल असे सध्या प्रशासन, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या वतीने बोलले जात आहे तर दुसरीकडे ८८ चौकशीच्या फेरीला तिसऱ्यांदा मुदतवाढ घेण्यात आली आहे.

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या प्रशासनात प्रशासक येऊन सहा वर्षे होत आले. ३१ऑगस्ट२०२४ रोजी सहा वर्षाच्या प्रशासक कालावधी संपला आहे. बँक प्रशासकाच्या वतीने मुदत वाढ मिळावी म्हणून सहकार व पणन विभाग पुणे कार्यालयास प्रस्ताव पाठवण्यात आलेला आहे. पावसाळा असल्याने आणि आगामी पुढील महिन्यात विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवत स्थानिक संस्थाच्या निवडणुका पावसाळ्यानंतर घेण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती बँकेची निवडणूक होणार नाही हे स्पष्ट झाले आहे. विधानसभा झाल्यानंतर म्हणजेच डिसेंबरमध्ये निवडणूक होण्याची शक्यता आहे. तर सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँक डबघाईत गेल्याने ३० मे २०१८ मध्ये बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करण्यात आले होते. तेव्हापासून डीसीसीवर प्रशासक कामकाज पहात आहे.

रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार सोलापूर जिल्हा बँकेची आर्थिक परिस्थिती काही टक्क्यांनी सुधारली आहे. मात्र एनपीए आणि जुनी कर्ज वसुली करण्यासाठी, बिगर शेती कर्जाची वसुलीवर जोर लावणे आवश्यक आहे. अनेक वेळा लेखी आणि सूचना, नोटीस देऊनही रक्कम जमा न करणाऱ्या खातेधारकावर कायदेशीर प्रक्रिया सुरू असल्याचे डिसीसी प्रशासनाने सांगितले आहे.



> सोलापूर जिल्हा मध्यवर्ती प्रशासकाची मुदत सपंली आहे. कारभारास मुदत वाढ मिळावी म्हणून ८ ऑगस्ट रोजी रीतसर प्रस्ताव पणन व सहकार विभाग पुणे यांना पाठविण्यात आला आहे. कोणत्याही प्रकारचा आदेश आलेला नाही. पुढील आठवड्यात आदेश येण्याची शक्यता आहे. जोपर्यंत आदेश येत नाही तोपर्यंत प्रशासकच कामकाज पाहणार आहे.
>
> **- कुंदन भोळे,**
> प्रशासक, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँक



## यावलीत निराधार महिलेवर अंत्यसंस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ५ सप्टेंबर -**

बार्शी तालुक्यातील यावली येथे ३ सप्टेंबर रोजी घरातच वृद्धापकाळाने यशोदा मारुती पाटील यांचे निधन झाले. त्यांना जवळचे असे कोणीच नसल्याने ग्रामपंचायतीने त्यांच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार केले.

कोणीच नसल्याने त्यांचा मृतदेह एक दिवस घरीच होता. ही बाब मंगेश चिकणे व जीवन लवटे यांना समजल्यावर त्यांनी तात्काळ ग्रामपंचायत सदस्य निलेश उबाळे यांना फोन करून माहिती दिली., त्यानंतर लगेच निलेश उबाळे यांनी ही गोष्ट ग्रामसेवक किरण वाघमारे यांच्या कानावर घालून ग्रामपंचायतीकडून त्या वृद्ध आजींचा अंत्यविधी करण्याची मागणी केली.

लगेच ग्रामसेवक किरण वाघमारे यांनी तहसील व पोलीस प्रशासनाला कळवून सरपंच प्रल्हाद तुरे, उपसरपंच सचिन उकरंडे, पोलीस पाटील दत्तात्रय मारकड व ग्रामपंचायत सदस्य शरद काकडे यांच्या मदतीने व गंगाराम काकडे, गोपाळ गायकवाड, दत्ता ताटे, इंद्रजित राक्षे, अतुल शिंदे, सुलतान मुलाणी आदी गावाकऱ्यांच्या उपस्थितीत या निराधार आजींचा हिंदू पद्धतीने रीतसर अंत्यविधी केला.

## गणेशोत्सव मिरवणुकीतील अडथळे दूर करा

### युवा सेनेचे करमाळा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन तपासे यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.५ सप्टेंबर-**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर करमाळा शहरातील सर्व गणेश मंडळांना मिरवणूक मार्गावर येणारे अडथळे व अडचणी तात्काळ दूर करा या मागणीचे निवेदन युवासेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) करमाळा तालुका समन्वयक कुमार माने यांनी करमाळा नगर परिषदचे मुख्याधिकारी सचिन तपसे साहेब यांना दिले.



या निवेदनात म्हटले आहे की गणेशोत्सव अवघ्या तीन दिवसांवर आला असून. करमाळा शहरातील प्रमुख रस्त्यावर तसेच श्री गणेशमूर्ती स्वागत व विसर्जन मिरवणूक मार्गावर मोठे खड्डे पडलेले आहेत. त्या मोठया खड्ड्यांमध्ये पाणीसाचत आहे.श्रीगणेशाचे ७ सप्टेंबर रोजी आगमन होणार आहे. या निमित्ताने शहरात व तालुक्यात मोठ्या जल्लोषात श्रीगणेशाचे स्वागत केले जाते तरी लवकरात लवकर मिरवणुक मार्गावरील मोठे तात्काळ खड्डे बुजवुन घ्यावे. तसेच मिरवणूक मार्गावरील जे विद्युत तारा खाली आल्या आहेत त्याचीही दुरुस्ती करून घ्यावी. आणि मिरवणुक मार्गावरील काटेरी झाडे झुडपे व झाडावरील फांद्या अडचणीचे ठरत आहे व मिरवणुक मार्गावरील स्वच्छतेचे काम करून घ्यावीत मिरवणुकी प्रसंगी मंडळांना याचा त्रास होतो.वरील सर्व विषयाचे योग्य ते नियोजन करणे या मागणीसाठी निवेदन देण्यात आले. यावेळी युवासेना उपजिल्हाप्रमुख मयुर यादव, युवा सेना तालुका प्रमुख शंभुराजे फरतडे, युवा सेना शहर प्रमुख समीर हलवाई, उपशहर प्रमुख अनिकेत केंगार,कल्पेश राक्षे,आदित्य जाधव, शहर समन्वयक प्रसाद निंबाळकर, किशोर पवार, गणेश राखुंडे, विघ्नेश कोतमिरे,अक्षय पोळ उपस्थित होते.



## जीवनामध्ये आर्थिक साक्षरता महत्त्वाची

### रायबान : अध्यापिका विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ सप्टेंबर-**

दैनंदिन जीवनामध्ये शैक्षणिक साक्षरते सोबत आर्थिक साक्षरता पण महत्त्वाची आहे. ऑनलाइनच्या या जगात सतर्क राहून आर्थिक व्यवहार करणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे कोणतीही आर्थिक फसवणूक होणार नाही, असे प्रतिपादन फेडरल बँक बार्शी शाखा व्यवस्थापक श्री. आनंद रायबान यांनी केले. ते अध्यापिका विद्यालय, बार्शी व फेडरल बँक बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिक्षक दिनानिमित्तच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

शिक्षक दिनाचे औचित्य साधून अध्यापिका विद्यालयात बँकिंग व्यवहार व सुरक्षा या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या अनुसया चौगुले, प्रमुख पाहुणे म्हणून शाखा व्यवस्थापक श्री आनंद रायभान, यज्ञा राऊत उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस हार घालून करण्यात आली. यानंतर द्वितीय वर्षातील विद्यार्थिनींनी स्वागत गीताद्वारे उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा जीवन लोखंडे यांनी केले. श्री रायबाग यांनी आपल्या भाषणात बँकेतील खाते कोणत्या प्रकारचे असते? आर्थिक गुंतवणूक कशा प्रकारे केली जाते? आर्थिक व्यवहार सुरक्षितपणे कशाप्रकारे करावेत याविषयी मार्गदर्शन केले. तसेच फेडरल बँकेच्या यज्ञा राऊत यांनी ऑनलाइन बँकिंग व्यवहार करताना कोणती व कशा प्रकारे काळजी घ्यावी याविषयी सविस्तर माहिती सांगितली.

शिक्षक दिनानिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनींनी उत्सफूर्त सहभाग नोंदवला. प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच प्रा. बजरंग वाघमोडे, प्रा. सोमनाथ देंडे, प्रा. सुभाष माळी आणि प्रा. प्रमोद मांडे यांनी देखील शिक्षक दिनानिमित्त आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रतिकांत हामणे यांनी केले तर आभार प्रा. अशोक घुले मानले.

## अनिल यादव, सुवर्णा जाधव यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि. ५ सप्टेंबर-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या आदर्श शिक्षक पुरस्काराचे करमाळा तालुक्यातील शिक्षक अनिल यादव व सुवर्णा जाधव हे मानकरी ठरले आहेत.





शिक्षकांच्या आदर्श कार्याची दखल घेत सोलापूर जिल्हा परिषद या पुरस्काराचे वितरण करत असते. अनिल यादव हे उमरड प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्याच्या उपक्रमशीलत्यामुळे उमरड शाळेने अनेक पुरस्कार मिळवले आहेत.स्वतः एक विदयार्थी प्रिय शिक्षक, निवेदन असणारे यादव हे या पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत. सौ. सुवर्णा जाधव या वांगी नं.१ च्या शाळेत अध्यपन करत आहेत.त्यांनी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेत विशेष मार्गदर्शन केले आहे.त्या विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी सतत प्रयत्न करत असतात.या शिक्षकांना शिक्षकदिनाचे ओचित्य साधून सोलापूर येथे पालकमंत्री ना.चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत.

## कोर्टातून पोटगी का मागतेस म्हणून पत्नीस पतीकडून मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ सप्टेंबर-**

तु मला कोर्टातुन पोटगी का मागतेस व तु मला घटस्फोट का देत नाहीस असे म्हणून पत्नीला पतीकडून लाकडी काठीने मारहाण केल्याची फिर्याद सीमा परशुराम जाधव यांनी पतीविरुद्ध शहर पोलिसांत दिली आहे.

परशुराम शिवाजी जाधव (रा. अलीपूर रोड, होनकळस प्लॉट, बार्शी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. गेली चार वर्षांपासून पती पत्नीमध्ये कौटुंबिक मतभेद असल्यामुळे दोघेजण एकमेकांपासुन विभक्त राहत आहेत. दि. ३१ ऑगस्ट रोजी सकाळी ६.३० वाजता पत्नी दोन मुलासह घरी असताना पती परशुराम हा घरासमोर येऊन हाक मारुन बाहेर बोलवले.

त्यावेळी तु मला कोर्टातून पोटगी का मागतेस व घटस्फोट का देत नाहीस, असे म्हणत शिवीगाळी करत लाकडी काठी मारुन तु जर मला घटस्फोट नाही दिला तर तुला जिवे मारुन टाकीन, असे म्हणून धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

## बार्शीत शिक्षकांचे व्यक्त केले ऋण

### शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयात माजी शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत शिक्षक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ सप्टेंबर-**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय बार्शी येथे आज दि. ५ सप्टेंबर रोजी मोठ्या उत्साहाने शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यावेळी शितोळे डी. बी., डॉ. पाटील डब्लू. आर., भोसले एम. आर., गायकवाड एस. डी., जगताप एम.बी., श्रीमती पाटील ए. डी., चव्हाण बी.ए., सौ. शिंदे एम. एच., गपाट एस.आर., मोरे टी. एस. उपस्थित होते. अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुंड डी. पी. हे होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे आणि डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.शेटे एस. एन. यांनी केले. त्यांनी कार्यक्रम आयोजित करण्यापाठीमागील भूमिका स्पष्ट केली. माजी शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्यकाळात केलेल्या अविरत कष्टाची व कामाची दाखल घेवून त्यांचा सन्मान शिक्षक दिनी करुन त्यांच्या ऋणातून उतराई व्हावी हा उद्देश्य आहे, असे सांगितले. मान्यवरांचा परिचय प्रा. डॉ. उलभगत सी.एस.यांनी करुन दिला.



> **बार्शीत माजी शिक्षकांना मान**
>
> शितोळे यांनी आपल्या मनोगतात या कार्यक्रमाविषयी कौतुक केले व माजी शिक्षकांना हा मान दिला त्याबद्दल आभार व्यक्त केले. प्राथमिक, माध्यमिक, तसेच उच्च शिक्षण या विविधस्तरावर शिक्षकाचे आपल्या जीवनात अत्यंत महत्त्व आहे. कौशल्य विकासासाठी तसेच जीवन घडविण्यासाठी शिक्षकांचे अतिशय महत्त्व आहे असे सांगितले.

अध्यापक विद्यालयाच्यावतीने या सर्व मान्यवरांचा सन्मान व सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अध्यापक विद्यालयातील द्वितीय वर्षातील विद्यार्थी कृष्णा त्तौर याने गुरुमहिमा आपल्या गीतातून व गिटार वादनातून व्यक्त केली. तसेच कलाश्री पवार, अक्षता शिंदे या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले व शिक्षकांविषयी आपली कृतज्ञता व्यक्त केली.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.दीपक गुंड सर यांनी अध्यापक विद्यालयातील माजी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा सन्मान व सत्कार करण्यापाठीमागिल आपली भूमिका स्पष्ट केली. त्यांचा अनुभव तसेच त्यांनी दिलेली सेवा याचा फायदा विद्यालयाच्या तसेच विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी झाला. कार्यक्रमाचे आभार प्रा.धुमाळ सर यांनी मांडले.

सूत्रसंचालन कु.वैष्णवी भोसले व कु.वैष्णवी शिराळकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. दीपक गुंड सर, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. गायकवाड तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केला. कार्यक्रमासाठी प्रथम व द्वितीय वर्षातील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

CMYK

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जगदाळे यांनी घेतली मनोज जरांगे यांची सदिच्छा भेट

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ सप्टेंबर -**

मराठा आरक्षण संघर्षयोद्धा मनोज जरांगे-पाटील यांची अंतरवली सराटी (जि. जालना) येथे जाऊन अशोक जगदाळे यांनी सदिच्छा भेट घेऊन श्री तुळजाभवानी मातेची प्रतिमा व कवड्याची माळ भेट देऊन सत्कार केला.

यावेळी अमर चोपदार, नितीन कासार, अमृत पुदाले, दीपक काशीद, रमेश जाधव, ताजुद्दीन शेख, नानासाहेब पाटील, राजकुमार पाटील, शिवाजी सावंत, राजकुमार बोबडे, सतीश माळी, सिकंदर भेगडे, शहाजी सोमवंशी, आकाश मुंगळे, पांडुरंग माने, ज्योतिबा जाधव, संजय जाधव, दिनकर जगताप, विक्रम जाधव, अरुण काळे, धनराज पाटील, रामकृष्ण पाटील, प्रशांत कुदळे, शिवाजी मते, दाजी पाटील, बाळासाहेब मते, अभिजीत पाटील आदी उपस्थित होते.





## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जयंती साजरी

**कदेर, दि.५ सप्टेंबर -**

श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय तलमोड (ता.उमरगा) येथे भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशालेचे मुख्याध्यापक मोरे जयवंत यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन जेवरे संध्या हिने केले. तसेच स्वातंत्र्य दिन यानिमित्त एमकेसीएल यांच्या वतीने घेण्यात आलेल्या सामान्य ज्ञान स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. ज्ञान दान करणाऱ्या सर्व शिक्षकांचे पुष्पगुच्छ देऊन शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी पांडुरंग पवार, गणेश सोमवंशी व प्रशालेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.



### श्री जंगलेश्वर महाराज मंदिर येथे बेल भंडारा कार्यक्रम संपन्न

**तेर, दि.५ सप्टेंबर -**


धाराशिव तालुक्यातील तेर येथील श्री जंगलेश्वर महाराज मंदिर येथे बेल भंडारा कार्यक्रमाची ५ सप्टेंबरला सांगता झाली. श्रावण महिन्यात श्री. जंगलेश्वराला सव्वा लाख बेल अपन केला जातो. कार्यक्रम समारोप प्रसंगी सामुहिक महिन्म अभिषेक करण्यात आले. यानंतर आरती होऊन महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी पुजारी अंगद चंदले व मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते.



### पार्वती प्रशालेत शिक्षक दिन साजरा

**जळकोट, दि.५ सप्टेंबर -**

दि. ५ सप्टेंबर रोजी पार्वती कन्या प्रशाला, जळकोट येथे ५ सप्टेंबर हा भारताचे दुसरे राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन शिक्षकदिन म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेच्या मुख्याध्यापिका लता सोमवंशी-कदम या होत्या. इ.५ वी मधून पायल राठोड, आतिक लष्करे, इ.६ वीमधून कुणाल बनछेडे, दिव्या ठणके, इ. ७ वीमधून श्रेयस कदम, शुभम कदम, हर्ष धनशेट्टी, सरस्वती कदम, दिपाली राठोड, रोहिणी राठोड, इ.८ वीमधून अनुसरा जमादार, सांची लोखंडे, विद्याराणी कदम, श्रेया कदम, प्रतीक्षा भोगे, इ.९ वीमधून प्रशांत माळगे यांनी भाषणात भाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इ.९ वीच्या विद्यार्थ्यांनी वैष्णवी बिराजदार व ऋतुजा राजमाने यांनी केले.




### आष्टा कासार येथे नेत्र व दंत शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**लोहारा, दि.५ सप्टेंबर -**

लोहारा तालुक्यातील आष्टा कासार येथील दत्त मंदिरात सेवानिवृत्त बहुउद्देशीय सामाजिक संस्था आष्टा का यांच्या वतीने एफ. अजमेरा रोटरी क्लब धाराशिव व रोटरी क्लब मुरूम सिटीचे नुतन अध्यक्ष कमलाकर मोटे यांच्या सौजन्याने शिक्षक दिनाचे औचित्य साधून दि.४ सप्टेंबर रोजी नेत्र व दंत शिबिर घेण्यात आले. या शिबिरास उत्स्फूर्त मिळाला. यावेळी २९४ रुग्णांची डोळ्यांची व १६५ रुग्णांची दातांची तपासणी करण्यात आली. कार्यक्रमास सरपंच सुलभा कांबळे, उपसरपंच वसंतराव सुलतानपुरे, सचिव सिद्रामप्पा तडकले, सुभाष बलसुरे, प्रा. नितीन अष्टेकर, मनोहर वाघमोडे, शरणप्पा शिदोरे, विलास पोतदार, धानप्पा आळंगे, प्रा. महादेव तडकले, शरणप्पा फुंडीपल्ले, चंद्रकांत बनसोडे, शिवशंकर स्वामी, प्रभाकर बचाटे, देविदास बनसोडे, राहुल गायकवाड, विष्णू सगर, मुरलीधर गोसावी, अण्णाराव पाटील उपस्थित होते.

### माणिकबाई जगदाळे यांचे निधन

**नळदुर्ग, दि.५ सप्टेंबर -**

नळदुर्गचे माजी नगराध्यक्ष उदय जगदाळे यांच्या



मातोश्री माणिकबाई अंबादास जगदाळे यांचे वृद्धापकाळाने दि.५ सप्टेंबर रोजी वयाच्या ९३ व्या वर्षी निधन झाले. दि.६ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता नळदुर्ग येथील आलियाबाद स्मशानभुमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात्य एक मुलगा, एक विवाहित मुलगी सुना, नातवंडे असा परीवार आहे. माजी नगराध्यक्ष उदय जगदाळे यांच्या त्या मातोश्री होत्या.

## मुख्यमंत्री वयोश्री योजना : ज्येष्ठांनी लाभ घ्यावा : आ. राणादादा

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.५ सप्टेंबर -**



मुख्यमंत्री वयोश्री योजनेच्या माध्यमातून जेष्ठ नागरिकांना वयोमानानुसार येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाय योजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने व उपकरणे खरेदी करिता एक वेळ एकरकमी ३ हजार रुपये रक्कम देण्यात येणार असून या योजनेची अंमलबजावणी अत्यंतिक अग्रक्रमाने करण्याच्या सुचना आ.राणाजगजिसिंह पाटील यांनी या योजनेचे जिल्हास्तरीय अध्यक्ष असलेले जिल्हाधिकारी व सदस्य सचिव असलेल्या सहाय्यक आयुक्त समाजकल्याण यांना दिल्या आहेत व ज्येष्ठांनी याचा आवर्जून लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

वय वर्षे ६५ आणि त्यावरील ज्येष्ठ नागरिकांसाठी महायुती सरकारने मुख्यमंत्री वयोश्री योजना सुरू केली आहे. या योजनेच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांना दैनंदिन जीवन सामान्य स्थितीत जगता यावे, त्यांच्या आरोग्यासंबंधित गोष्टींची व सुविधांची पूर्तता करता यावी याकरिता रक्कम उपलब्ध करून देण्यात येणार आहे. वयोमानानुसार येणारे अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य्य साधने, उपकरणे खरेदी करण्यासाठी पात्र व्यक्तींच्या बँक खात्यात एकरकमी ३ हजार रुपये रक्कम जमा करण्यात येणार आहेत.

या रकमेतून लाभार्थ्यांना चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड, स्टीक, व्हील चेअर, फोल्डींग वॉकर, कमोड खूर्ची, नि-ब्रेस, लंबर बेल्ट, सर्वाईकल कॉलर यासारखी उपकरणे खरेदी करता येणार आहेत. तसेच मनःस्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र इ. द्वारे प्रबोधन व प्रशिक्षण देऊन त्यांचे मानसिक स्वास्थ्य अबाधित ठेवले जाणार आहे.

धाराशिव जिल्ह्यात आजवर जवळपास १०००० अर्ज प्राप्त झाले असून १५०२ अर्जाची छाणनी पूर्ण करून पात्र करण्यात आले आहेत. यापूर्वी योजनेचे अर्ज समाजकल्याण विभागाचे कार्यालय व त्या अंतर्गत येणारे वसतिगृह व शाळा येथे स्वीकारण्याबाबत समाजकल्याण विभागाने कळविले होते.

मात्र जेष्ठांची होणारी गैरसोय विचारात घेवून जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना सदर अर्ज गावातच ग्रामपंचायत मध्ये जमा करून पुढे समाजकल्याण विभागाकडे देण्याबाबत आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी सूचित केले होते. त्यानुसार आता गावातच ग्राम पंचायतीमध्ये अर्ज जमा करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

शासकीय यंत्रणेला तर प्राधान्याने योजनेच्या अंमलबजावणीच्या सूचना देण्यात आल्या आहेत, मात्र वृध्दांना या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी युवकांनी देखील पुढे येवून सहकार्य करण्याचे आवाहन आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.

## शिवराज्याभिषेक सोहळा समितीच्या मावळ्यांचे आत्मक्लेष आमरण उपोषण




### उपोषणाचा दुसरा दिवस...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ सप्टेंबर -**

महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग जिल्ह्यामधील मालवण येथील जंजिरे राजकोट येथे गेल्या आठ महिन्यापूर्वी उभा केलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा जमिनीवर कोसळलेला आहे. या पुतळ्याचे उद्घाटन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच दोन्ही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांचे हस्ते झाले होते. परंतु अतिशय निकृष्ट व बेडव बांधकामामुळे, अनुभव नसल्यामुळे आणि भ्रष्टाचार झाल्यामुळे हा पुतळा अत्यल्पकाळातच धाराशाही झालेला आहे.

आज पर्यंत संपूर्ण भारतात कुठेही छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा जमिनीवर कोसळलेला नाही. अगदी शंभर शंभर वर्षांपूर्वीचे सुद्धा पुतळे सुस्थितीत असताना हा पुतळा जमिनीवर कोसळणे म्हणजे संपूर्ण राष्ट्राचा जगात अपमान झाल्याने देशाची मान शरमेनी खाली झुकलेली आहे. भारतातील तमाम शिवभक्त शिवप्रेमी तसेच राष्ट्रप्रेमी जनतेत असंतोषाची प्रचंड अशी लाट निर्माण झालेली आहे.

याच संतप्त भावनांना वाट करून देण्यासाठी तसेच या घटनेस जबाबदार संबंधितांवर ताबडतोब धाराशिव येथे गुन्हा दाखल करून त्यांना तात्काळ गजाआड करावे. या संपूर्ण घटनेची जबाबदारी म्हणून राजकीय शासकीय व प्रशासकीय उच्चपदस्थानी याची नैतिक जबाबदारी स्वीकारून आपल्या घटनात्मक पदावरून पाय उतार व्हावे यासाठी शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिवच्या वतीने आज दि.४ सप्टेंबर रोजी पासून जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव समोर धर्मराज सूर्यवंशी, अमोल सिरसट, दत्तात्रेय जावळे तालुका सचिव, योगेश आतकरे, सतीश थोरात असे समितीचे मावळे आत्मक्लेष आमरण उपोषणाला बसलेले आहेत.

या घटनेवर पांघरून घालणाऱ्या शासकीय प्रशासकीय व्यक्ती आपल्या पदावरून पायउतार होत नाहीत तोपर्यंत हे आत्मकलेश आमरण उपोषण थांबवणार नाही आम्ही आमच्या न्याय घटनादत्त अधिकारासाठी शेवटच्या श्वासापर्यंत संघर्ष करत राहू आणि शिवछत्रपतींच्या उदात्त प्रेरणे च्या मार्गावरून आम्ही आमचा न्याय हक्क मिळवू असा निर्धार उपोषणकर्त्यांनी केलेला आहे.

## येरमाळ्यात चोरट्यांचा धुमाकूळ; नागरिकांत घबराटीचे वातावरण

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.५ सप्टेंबर -**

गुरुवारी (ता.पाच) चार पाच अज्ञात चोरट्यांनी पहाटे येथील मेनरोडवरील एक किराणा दुकान, मोबाईल शॉपीच्या शटरचे कुलूप तोडून चोरी करण्याचा प्रयत्न केला.नेमका यावेळी एक रिक्षावाला आल्यामुळे चोरांचा चोरीचा प्रयत्न फसला असला तरी लोखंडी, कटावण्या, धारदार शस्त्र, गावठी कट्टा प्रमाणे हातात शस्त्र घेऊन चोरट्यानी मेनरोडवरून गाव ते चौरस्ता दुकानांची तासभर टेहळणी करत धुडगूस घातल्याचा प्रकार घडला. गौरी गणपती सन तोंडावर आल्याने याप्रकाराने ग्रामस्थात भीतीचे वातावरण निर्माण झाले असुन घडल्या प्रकारामुळे पोलीसांपुढे नवे आव्हान उभे राहिले आहे.

परिसरात चोरट्यांचा धुमाकुळ सुरु असुन गुरुवारी पहाटे चार वाजेच्या सुमारास येरमाळा गावात अज्ञात चोरट्याने चांगलाच धुमाकुळ घातला.

वाटमारी, किरकोळ चोरी, पॉकेटमार तसेच बसस्थानक परिसरामध्ये चोरीसह लुटीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. गुरुवारी पहाटे चार वाजेच्या सुमारास चार, पाच अज्ञात चोरट्यानी हातामध्ये लोखंडी सळई, कटावनी, गावठी कट्टा, धारदार शस्त्र, घेऊन धुडगूस घालत मेनरोडवरील बांगर बंधु किराणा दुकानाचे लोखंडी रॉडने शटर उचकटून चोरी करण्याचा प्रयत्न करत असताना मागील वस्तीतून एक रिक्षा रिक्षा नंबरला लावण्यासाठी घेऊन येत असल्याचे पाहून पळ काढला पुढे त्यांनी बसस्थानकातील रजा मोबाईल शॉपी कुलुप तोडण्याचा प्रयत्न केला.

दुकानाच्या शटरचे लोखंडी पट्टी न तुटल्याने तेथुन मेनरोडवरुन मुक्त संचार करीत रिक्षावाल्यास बारचे दुकान विचारत चौकातील अमरजित बार, हायवे बारची टेहळणी केली. दरम्यान रिक्षाचालकाणे त्यांचा चौकातून चक्कर मारुन गेल्याने त्यांचा बारमधील चोरीचा प्रयत्न फसला.

येरमाळ्यासारख्या मोठ्या गावामध्ये धारशस्त्रासह, गावठी कट्टा, लोखंडी कटावण्या घेऊन तासभर धुडघूस घतल्याची चर्चा गावभर झाल्याने येरमाळा पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### माझी वसुंधरा अभियान : पर्यावरणपूरक शाडू,मातीच्या गणेश मूर्ती बनविण्याची कार्यशाळा



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.५ सप्टेंबर -**

सन २०२४-२५ या वर्षामध्ये साजरा करत असलेल्या गणेशोत्सवनिमित्त नगर परिषद परंडा व माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत पर्यावरणपूरक शाडू मातीच्या गणेश मूर्ती बनविणे बाबतची कार्यशाळा आज दि.५ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत स्व. गोपीनाथ मुंढे सभागृह, परंडा येथे न.प.चे मुख्याधिकारी तथा प्रशासक मनिषा वडेपल्ली यांच्या उपस्थितीत व प्रशिक्षक कलाकार राजकुमार कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली एक दिवसीय कार्यशाळा पार पडली.

नगर परिषदचे पंडित कुलकर्णी, राजेंद्र कडबने, महेश कसबे, संतोष दीक्षित व महेश एकशिंगे कार्यशाळेसाठी उपस्थित होते. या कार्यशाळेसाठी शहरातील जिल्हा परिषद शाळा मुलांची व मुलींची विद्यार्थी व महात्मा गांधी विद्यालयाचे विद्यार्थी व शिक्षकांनी प्रचंड प्रतिसाद दिला..

यावेळी मुलांनी शाडू मातीपासुन सुबक अश्या गणेश मूर्ती बनविल्या होत्या.

## तेर-जागजी रस्त्यावर खड्डेच खड्डे; नागरिकांत संताप

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.५ सप्टेंबर -**

धाराशिव तालुक्यातील तेर-जागजी रस्त्यावर जागोजागी खड्डेच खड्डे पडल्याने नागरीकात संताप व्यक्त केला जात आहे.

धाराशिव तालुक्यातील तेर-जागजी रस्ता सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत असून तेर जागजी



रस्त्यावर तेर ते लाडजा ओढा दरम्यान रस्त्यावर मोठमोठे खड्डेच खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे पाऊस पडल्यानंतर या खडयात पाणी साठते. त्यामुळे नागरिकांना व वाहान धारकांना कसरत करतच खेड्यातून मार्ग काढत प्रवास करावा लागत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने तेर जागजी रस्त्यावर पडलेले खड्डे बुजविण्याचे काम तातडीने करावे, अशी मागणी नागरीकातून होत आहे.

### दै. तरूण भारत बातमीचा इम्पॅक्ट..

## बेशिस्त वाहनांवर पोलिसांकडून कारवाई; महामार्गाने घेतला मोकळा श्वास

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.५ सप्टेंबर -**

अपुऱ्या साईडपट्टयांमुळे येरमाळा बसस्थानक आणि बँक परिसरात वाहतुक कोंडी माथळ्याखाली 'दैनिक तरुण भारत' मध्ये गुरुवारी गावातुन गेलेल्या खामगाव पंढरपूर रस्त्यावर बसस्थानक परिसरात, भारतीय स्टेट बँकेसमोरील वाहन पार्किंगमुळे बसस्थानक, बँकेच्या परिसरात सतत वाहतुक कोंडी होत आहे. बसस्थानक परिसरात मोठया प्रमाणात रहदारी असते बेशिस्त पार्किंगकडे पोलिसांचे दुर्लक्ष आसल्याने वृत्त प्रकाशित होताच बेशिस्त पार्किंग केलेल्या वाहनावर पोलिसांनी कारवाई करत बसस्थानक, बँक परिसतील वाहने हटवल्याने महामार्गाने मोकळा श्वास घेतला.

येरमाळा गावातून खामगाव-पंढरपूर रस्ता गेला आहे. याच रस्त्यावर गावातील बसस्थानक, भारतीय स्टेट बँकेची शाखा आहे. दोन्ही ठिकाणी प्रवासाच्या, व्यवहाराच्या कामामुळे लोकांची नेहमी गर्दी असते. पादचारी, दुचाकी, चारचाकी वाहनांची रहदारी असते.

बँकेसमोरील गटारीच्या बाजूंची साईटपट्टी भरलेली नाही. त्यामुळे बँकेत येणारे चारचाकी, दुचाकी रस्त्यावरच उभी असतात. बेशिस्त पार्किंगला पोलिसांनी शिस्त लावावी, अशी मागणी होत होती.



स्थानिक येरमाळा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक विलास जाधव यांनी कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन दोन्ही भागातील बेशिस्त पार्किंग वाहणावर कारवाई करत पे-रिक्षा, चारचाकी वाहने रस्त्याच्या बाजूला हटवली. तर बँकेच्या, बसस्थानक परिसरातील दुचाकीच्या चाकतील हवा सोडुन देऊन यापुढे रस्त्यावर वाहने, दुचाकी दिसल्या तर दांडात्मक कारवाईचा इशारा बेशिस्त वाहने पार्किंग करणाऱ्यांना दिला.

तर या दोन्ही भागात वाहतुक शाखेकडुन यापुढे रस्त्यावर वाहने लावल्यास रस्ते वाहतुक नियमानुसार दांडात्मक कारवाई, खटले दाखल केले, जातील अशी सूचना अँटीसेफ्टीक व्हॅनच्या स्पीकरवरुन दिल्या असल्याचे धाराशिव वाहतुक शाखेचे सपोनि. बाळासाहेब शिंदे यांनी बोलताना सांगितले.

## उमरग्यात इच्छूकांची भाऊगर्दी ; जनता कोणाच्या पाठीशी उभे राहणार?

### विधानसभा मतदार संघातून ५ जण इच्छुक...

**तभा वृत्तसेवा / आकाश पोतदार**
**उमरगा, दि.५ सप्टेंबर -**

उमरगा विधानसभा मतदारसंघात विद्यमान आमदार ज्ञानराज चौगुले यांना महायुतीतर्फे शिवसेनेच्या वतीने पुन्हा एकदा उमेदवारी दिले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तर त्यांच्या विरोधात महाविकास आघाडीकडून प्रा. संजय कांबळे यांचे नाव चर्चेत येत आहे. याचवेळी दिग्विजय शिंदे ही उमरगा विधानसभा लढविण्याची तयारी करीत आहेत.

या मतदार संघाचा विचार करता आ. चौगुले हे कागदावर आजच्या घडीला तरी भक्कम दिसत असल्ये तरी महायुतीकडून त्यांना मदत होताना दिसत नाही. दुसरीकडे महाविकास आघाडीतर्फे सातलिंग स्वामी मतदारसंघात फिरत असून, मतदारांच्या गाठीभेटी घेत आहेत. कैलास शिंदे यांची या मतदार संघात जवळपास ३३ हजार मते निश्चित मानली जात आहेत. तसेच चारही उमेदवारांच्या मागील व आताच्या कारकिर्दीवर प्रकाशझोत टाकला असता या बाबीसमोर येत असताना दिसून येत आहेत. तर महाविकास आघाडीकडून उमरगा विधानसभा निवडणुकी लढवण्यास अजयकुमार देडे ही इच्छुक आहेत.

देडे यांच्या कडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आर.पी.आय गटाकडून संघमित्रा गायकवाड हे सक्षम महिला उमेदवार म्हणून नाव चर्चेत असून निवडणूक लढवण्यास इच्छुक आहेत.



उमरगा लोहारा तालुक्यातील ६० हजार हक्काची मते, ३ वेळा आमदारकीचा अनुभव, मजबूत संपर्क यंत्रणा, कार्यकर्त्यांची मोठी फळी, घरोघरी परिचय, शिवसेना पक्षाच्या फायदा, इच्छुक उमेदवारांवर नाराज असलेल्या मतदारांना कवेत घेण्याची क्षमता.





कैलास शिंदे हे धाराशिव डी.सी.सी बँकेचे उपाध्यक्ष, जिल्हा परिषद सदस्य म्हणून काम केले यांच्या अनुभव. तर २००९ साली विधानसभा निवडणुकीत कैलास शिंदे यांना ३३ हजार मते मिळाली होते. आज घडीला पाहीले तर यामध्ये वाड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कैलास शिंदे यांचे पुत्र आसल्याने दिग्विजय शिंदे यांना फायदा होण्याची शक्यता. जिल्हा परिषद सदस्य आणि माजी समाज कल्याण सभापती असल्याने काम केल्याचा अनुभव. तरुण चेहरा असल्याने फायदा होण्याची शक्यता.सामाजिक राजकीय क्षेत्रात मोठ्या जनसंपर्क तरुणांची मोठी फळी सोबत.



प्रा. संजय कांबळे शिक्षक आसल्याने शिक्षकाचे मोठें संघटन, सिनेट सदस्य पदाच्या अनुभवचा फायदा, मतदारसंघात जनसंपर्क आणि आघाडीत संवाद चालू असून त्याद्वारे मतदारसंघात चर्चेत नाव, प्रतिस्पर्धी इच्छुक उमेदवारांच्या तुलनेत प्रभावी व शक्यम पर्याय म्हणून प्रा. संजय कांबळे यांच्याकडे पाहिले जात आहे. समाज चळवळीती मोठें योगदान दिले असून पक्षाच्या माध्यमातून सामाजिक राजकीय क्षेत्रात चांगले काम व अनुभव.



सातलिंग स्वामी यांना मंत्रालयातील कामांचा अनुभव, अनेक आमदार यांचे स्वीय सहाय्यक म्हणून काम पाहिले. त्यामुळे प्रशासकीय कामकाज अनुभव कामी येणार. यामधून मतदारसंघातील प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे चित्र दिसून येत आहे. विधानसभा निवडणुकीत लढवण्यासाठी राजीनामा देण्याने चर्चातील प्रमुख नाव. आढावा बैठक, गावभेटी, माध्यमातून नागरीकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न.

## संक्षिप्त वृत्त...



### बावी आश्रम शाळेत शिक्षक दिन साजरा

**धाराशिव, दि.५ सप्टेंबर -**
विद्यानगर बावी येथील वसंत प्राथमिक जवाहर माध्यमिक व जवाहर कनिष्ठ महाविद्यालय येथे डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य दयानंद मनोहरराव राठोड कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रशासकीय अधिकारी जगताप बी.यु.व सर्व शिक्षक वृंदांनी डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक साकळे बी.एस. यांनी केले यावेळी संस्थेच्या वतीने संस्थेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा श्रीफळ व गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व कार्यक्रमाचे अध्यक्ष यांचे मार्गदर्शन झाले तसेच बहुतांश शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमासाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. शेवटी प्रा.व्हि.टी.राठोड यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

### ज्ञानज्योती बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचा आदर्श शिक्षकरत्न पुरस्कार जाहीर

**उमरगा, दि.५ सप्टेंबर -**



उमरगा तालुक्यातील जि.प.प्रा.शाळा औराद येथील उपक्रमशील शिक्षिका पाटील एस.बी.यांना ज्ञानज्योती बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचा आदर्श शिक्षकरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. समाजाची निस्वार्थ भावनेने आणि निष्ठेने सेवा करणाऱ्या, शैक्षणिक क्षेत्रात शिक्षकांना त्यांच्या कामात प्रोत्साहन देण्याच्या व त्यांच्या गुणांचा यथोचित सन्मान करण्याच्या उद्देशाने हा पुरस्कार देण्यात येतो. पाटील यांनी २० वर्षाच्या सेवेच्या कालावधीत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमाची दखल घेऊन हा पुरस्कार जाहीर झाला आहे. औराद शाळेत रुजू झाल्यापासून शाळेत झालेला अमूलाग्र बदल, शाळेची पटसंख्या वाढविण्यासाठी राबवलेले विविध उपक्रम, विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयीची गोडी निर्माण होण्यासाठी घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा, या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा सन्मान पुरस्कार जाहीर करण्यात आलेला आहे. पुरस्कारासाठी योग्य व्यक्तीची निवड केल्याबद्दल जि.प.प्रा.शाळा औराद येथील सर्व शिक्षकवृंद, ग्रामपंचायत कार्यालय औराद, शालेय व्यवस्थापन समिती औराद यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

### वर्गणी न घेता शाळेसाठी दिला पंखा भेट

**नळदुर्ग, दि.५ सप्टेंबर -**
गणेशोत्सवाची जोरदार तयारी सुरु आहे. अनेक गणेश मंडळ गणेशोत्सवाची वर्गणी गोळा करण्यासाठी फीरत आहेत. मात्र वसंत नगर नळदुर्ग येथील जय हनुमान तरुण गणेश मंडळाने शिक्षकांकडुन वर्गणी न घेता शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पंखा भेट दिला आहे. यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रवी राठोड हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन नवनाथ पवार, प्रिती जाधव, संतोष घाटे, शाळेतील सुरवसे एच.एम.,कुलकर्णी श्रीकृष्ण, राठोड अविनाश, वाघमारे वंदना, कुंभलकर नेहा, राठोड रवीना हे उपस्थित होते.

# दुर्मिळ होत चाललेल्या कावळ्यांची इथे रोजच भरते शाळा !

## सांबप्पा धरणे यांच्या भूतदयेमुळे कावळ्यांना दररोज मिळतेय अन्न आणि पाणी...

**तभा वृत्तसेवा/ मेघराज किलजे**
**जळकोट, दि.५ सप्टेंबर-**
सद्यस्थितीला कावळ्यांची संख्या रोडावली असल्याचे सांगितले जाते. कावळ्यांची शाळा भरली आहे की.. काय...! असे वाटत होते. मी लागलीच एक फोटो काढला आणि चौकशी केली असता, ही कावळ्यांची शाळा कोणी भरवली तर... उत्तर मिळाले ते खुपच समाधानकारक...! तर याविषयी अधिक माहिती गोळा केली तेव्हा कळले की, जळकोट (ता. तुळजापूर) येथील किराणा मालाचे दुकानदार सांबप्पा बसवणप्पा धरणे यांच्यामुळे ही कावळ्यांची शाळा भरत असल्याचे समजले.



सांबप्पा धरणे यांचे जळकोट येथे खुप जूने किराणा मलाचे दुकान आहे. ते दररोज सकाळी नळदुर्ग येथून जळकोटला दूकान चालविण्यासाठी येत असतात. ते जेव्हा जळकोट बस स्टँडवर बसमधून उतरतात. तेव्हा त्यांची वाटच पाहत बसलेले अनेक कावळे अचानकपणे जमा होऊन, त्यांचे जणू स्वागत करत असतात. स्टँड पासून जवळच असलेल्या दूकानाकडे जाईपर्यंत कावळे त्यांचा पाठलाग करत दूकानासमोर जमा होतात. म्हणजेच कावळ्यांची शाळाच भरते.



तेव्हा सांबप्पा धरणे सर्व प्रथम फरसाणचा एक संपूर्ण पुडा फोडून दुकान समोरच्या बाकड्यावर टाकतात. तेव्हा कावळे मोठ्या उत्साहात या चटकदार फरसाणवर ताव मारतात. शेजारीच पाण्याची ही सोय धरणे हे करतात, कावळ्यांची ही जत्रा रोजच भरत असल्याचे शेजारच्या दुकानदारांनी सांगितले. हे सदरचे दृश्य पाहून मन भरुन आले. सध्यस्थितीला अशी दुर्मिळ दृश्य पहावयास मिळणे कठीण झाले आहे.

पशुपक्ष्यांना, प्राणीमात्रांना जीव लावणारे सांबप्पा धरणे यांचे कौतुक गावातून केले जाते.श्री. सांबप्पा धरणे यांच्याविषयी त्यांच्या जवळच्या मित्रांनी सांगितले की, सांबप्पा धरणे हे लहाणपणापासूनच खुपच संवेदनशील भावनिक स्वभावाचे व्यक्ती आहेत.अगोदर समोरच्याला घासभर अन्न देऊनच मग अन्न ग्रहण करण्याची त्यांची पद्धत आहे. भुकेला कोणी दिसला की त्याला पोटभर अन्न देणे, पशुपक्ष्यांना प्राणीमात्रांची ही अन्नाची तजवीज करणे. यामुळे जनमानसांत त्यांना दानशूर सांबप्पा नावाने ओळखले जाते.सध्या अशी माणसे दुर्मिळ होत चालली आहेत. हेच खरं आहे...!

## महवाचन उपक्रमाअंतर्गत एकलव्य विद्या संकुलात काव्यवाचन, कथाकथन कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ सप्टेंबर-**
महाराष्ट्र शासन महावाचन उपक्रमाअंतर्गत एकलव्य विद्यासंकुल मंगरुळ यम गर वाडी तालुका तुळजापूर येथे काव्यवाचन व कथा कथन कार्यक्रम संपन्न झाला.ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र अत्रे,बालसाहित्यिक शिकतोडे यांनी कथा व काव्य वाचन केले.

शाळेतील चौथी वर्गाच्या मुली श्रावणी पाटोळे व प्राजक्ता आलमले यांनी सुंदर कथा सांगितल्या. या कार्यक्रमात खेळाडू व प्रशिक्षक माऊली भुतेकर व एमएचटीसीइटीमध्ये उत्तुंग यश मिळवल्याबद्दल माजी विद्यार्थी रोहित म्हेत्रे, डॉ.प्रणिता गडेकर व वकील जनक पाटील यांची भटके विमुक्त विकास प्रतिष्ठानच्या कार्यकारिणीवर निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष युवराज नळे होते. त्यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.अभय शहापुकर यांनी केले. विठ्ठल म्हेत्रे यांनी शाळेची माहिती सांगितली. सूत्रसंचालन अण्णासाहेब कोल्हटकर यांनी ते आभार अण्णासाहेब मगर यांनी मानले. यावेळी गोविंद सोमाणी, सर्व शिक्षक, कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते

## स्वातंत्र्य सेनानी चंद्रशेखर बदोले विद्यालयाच्या विद्यार्थीनींतर्फे शेवगा रोपे भेट

**तभा वृत्तसेवा**
**कदेर, दि.५ सप्टेंबर-**
स्वातंत्र्य सेनानी चंद्रशेखर बदोले उच्च माध्यमिक विद्यालय कसगी येथील सन २०१९ बॅच च्या विद्यार्थ्यांनी अश्विनी मनोजकुमार गुरव त्यांच्या जन्मदिवसाच्या औचित्य साधून विद्यालयाच्या परिसरात लावण्यासाठी २१ शेवगा फळभाज्याचे रोपे भेट म्हणून देऊन मुख्याध्यापक राजेंद्र माशाळे सर यांच्या हस्ते सर्व शेवग्याचे रोपे हिरव्या संरक्षण जाळी सह रोपण करण्यात आले.

सदर शेवग्याबरोबर विद्यालयात वीस गुंठ्याचा भाजीपाला परस्पर



तयार करण्यात आले आहे. त्यातून तयार होणारा भाजीपाला इयत्ता पाचवी ते आठवी विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारच्या माध्यमातून देणारे खाऊ म्हणून वापरण्यात येणार आहे. शेवग्याच्या शेंगेला वंडरस्ट्रीक तर झाडाला ट्री-फॉर लाईफ असे संबोधित करण्यात येते. इतर पालेभाज्या फळभाज्या पेक्षा अन्नामध्ये भरपूर प्रमाणात जीवनसत्व देणारे फळभाजी आहे. यावेळी विद्यालयातर्फे अश्विनी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

## जिल्हा सांख्यिकी विभागाच्या नुतन कार्यालयाचे जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांच्या हस्ते उद्घाटन

### नियोजनात येणार सुलभता, जिल्हा नियोजन भवनच्या इमारतीत स्थानांतर



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ सप्टेंबर-**
जिल्हयाच्या आर्थिक पाहणी अर्थसंकल्पीय प्रकाशनाकरिता लागणारी स्थानिक स्वराज्य संस्थेची आर्थिक आकडेवारी गोळा करण्यासह शासनाच्या विविध योजनांचे मुल्यमापन करणे यासह नियोजनाच्या विविध कामात सुलभता आणणाऱ्या सांख्यिकी विभागाच्या नुतन कार्यालयाचे उदघाटन जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांच्या हस्ते ५ सप्टेंबर रोजी करण्यात आले.

जिल्हा नियोजनात महत्वाची भुमिका पार पाडणाऱ्या सांख्यिकी विभागाचे कार्यालय यापूर्वी मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीत होते. तेथे या विभागाने आपल्या काम तत्परतेने पूर्ण केले आहे.मात्र,अनेक बाबींमुळे आणि नियोजनाच्या काळात दिवस रात्र काम करावे लागत होते.

जिल्हा नियोजन विभाग आणि सांख्यिकी विभागातील अंतरामुळे वेळ वाया जात होता. तसेच काही महत्वाची कागदपत्रे ने-आण करणे त्रासाचे होते. यामुळे हे कार्यालय जिल्हा नियोजन समितीनजीक असणे गरजेचे होते.

या कार्यालयाचे आता स्थानांतर झाले असून नुतन कार्यालय जिल्हा नियोजन भवनच्या इमारतीत आले आहे.नूतन कार्यालयामुळे जिल्हा सांख्यिकी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढण्यास मदत होणार आहे.

उदघाटनप्रसंगी जिल्हा नियोजन अधिकारी अर्जुन झाडे,सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी श्रीकांत कुंटला,प्रीतम कुंटला,सांख्यिकी विभागाचे उपसंचालक रामराज पडवळ,सांख्यिकी सहाय्यक मुकेश रामपुरे,सदाशिव वनवे,गणेश जोगदंड,रणजीत हाजगुडे,अन्वेषक अविनाश जगताप,रजनी निजवंते यांच्यासह जिल्हा नियोजन विभाग आणि अर्थ व सांख्यिकी विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

## स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, महात्मा बसवेश्वर विद्यालयात शिक्षक दिन

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.५ सप्टेंबर-**




येथील श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर व महात्मा बसवेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस ५ सप्टेंबर हा शिक्षक दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

याप्रसंगी संस्थेच्या वतीने सर्व शिक्षकांना, गुलाब पुष्प, देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. याप्रसंगी संस्थेच्या ज्येष्ठ संचालिका रजनीकाकू महाजन, प्रा.शिवाजीराव वडणे, कार्यवाह डॉ.कपिल महाजन, डॉ. शुभांगिनी महाजन, मुख्याध्यापिका सविता लोहार, मुख्याध्यापक नेताजी गायकवाड आदिजन मंचावर उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना डॉ. कपिल महाजन म्हणाले की, डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन हे शिक्षक होते. त्यांनी आपल्या कार्य कौशल्यातून देशाचे राष्ट्रपती होण्याचा मान मिळवला.

यावरूनच आपल्याला ठामपणे सांगता येते की एखादा शिक्षक हा किती कर्तृत्ववान व व्यासंगी असू शकतो. म्हणूनच आपण अशा महान शिक्षकांचा जन्मदिन शिक्षक दिन म्हणून पाळतो प्रत्येक शिक्षकात काही ना काही चांगले गुण असतातच. म्हणूनच आज आपण त्या सर्व शिक्षकांचा गौरव करीत आहोत. यावेळी प्राध्यापक शिवाजीराव वडणे यांनीही सर्व शिक्षकांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीता भावसार तर आभार सहशिक्षक विवेक जाधव यांनी मानले.

## मुला-मुलींच्या सुरक्षेसाठी चिकुंद्रा शाळेत सखी-सावित्री समितीची स्थापना

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.५ सप्टेंबर-**
बदलापुर येथे घडलेल्या दुर्दैवी आणि निंदनीय घटनेची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी शाळेतील मुला-मुलींच्या सुरक्षेसाठी चिकुंद्रा ता.तुळजापुर येथील जि.प.प्राथमिक शाळेत सखी-सावित्री समितीची स्थापना करण्यात आली असुन समितीच्या अध्यक्षपदी शालेय समितीच्या अध्यक्षा भाग्यश्री मोहिते यांची तर समुपदेशक म्हणुन केशर जाधवर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

बदलापुर येथील शाळेत घडलेली घटना अतिशय दुर्दैवी आणि निंदनीय आहे. या घटनेने संपुर्ण महाराष्ट्र हादरून गेला आहे. अशा घटनांची पुन्हा पुनरावृत्ती होऊ नये यासाठी सर्व स्तरातुन प्रयत्न केले जात आहेत. आज शाळेत मुलींना पाठवायचे की नाही हा गंभीर प्रश्न आई-वडिलांसमोर निर्माण झाला आहे. अशावेळी शाळेत विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित वातावरण राहावे यासाठी चिकुंद्रा येथील जि. प. प्राथमिक शाळेत सखी-सावित्री समितीची स्थापना करण्यात आली आहे शाळा व ग्रामस्थांनी घेतलेला हा निर्णय अतिशय चांगला कौतुकास्पद आहे. ही समिती शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी काम करणार आहे. विद्यार्थ्यांचा शारीरिक, भावनिक व बौद्धिक विकास होत असताना याचा विद्यार्थ्यांवरील तान कमी करण्यासाठी विद्यार्थी आणि पालकांचे समुपदेशन करणे हे समिती काम करणार आहे.

शाळेचे मुख्याध्यापक श्री मक्तेदार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ही समिती स्थापन करण्यात आली आहे. सखी-सावित्री या समितीच्या अध्यक्षपदी शालेय समितीच्या अध्यक्षा भाग्यश्री मोहिते यांची तर समुपदेशक म्हणुन केशर जाधवर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

समितीचे सचिव म्हणुन शाळेचे मुख्याध्यापक हे राहणार आहेत तर सदस्य म्हणुन एस. बी. गोरे, हिराबाई साबळे, सर्जे, मंजुश्री गायकवाड, कीरण भिसे, पोलिस पाटील महादेव गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे. तर विद्यार्थ्यांमधुन प्राजक्ता जाधवर, ऋतीका मेंढापुरे, ओंकार गंजे, अभय जाधवर यांना समितीवर घेण्यात आले आहे. यावेळी गावच्या सरपंच सोनाली कानडे, सोसायटीचे चेअरमन अमोल गायकवाड यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचे अर्ज भरण्यास युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**शिराढोण, दि.५ सप्टेंबर-**
महायुती सरकारने महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण-कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' राबवली जात आहे. या योजनेतंर्गत १८ ते ३५ वयोगटाच्या प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थींना १२ वी पास - ६,000, आय.टी.आय./पदविका - ८,000 व पदवीधर/पदव्युत्तर साठी महिना १0,000 प्रमाणे रक्कम मिळणार आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी उमेदवारांनी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या या योजनेसाठीच्या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे. आस्थापना/उद्योग/महामंडळामार्फत विना अनुभवी, बेरोजगार, इच्छुक पात्र उमेदवारांना प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षण देण्यात येईल. या योजनेअंतर्गत उमेदवारांना प्रशिक्षण कालावधीत कार्य प्रशिक्षणाद्वारे कुशल/अर्धकुशल प्रकारचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देणे अपेक्षित आहे. सदर कार्य प्रशिक्षणाचा कालावधी ६ महिने आहे. प्रशिक्षणा दरम्यान प्रशिक्षणार्थीची दैनिक हजेरी संबंधित आस्थापना/उद्योग ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येईल. सदर ऑनलाईन उपस्थितीच्या आधारे प्रशिक्षणार्थीचे विद्यावेतन प्रशिक्षणार्थीच्या थेट बँक खात्यात ऑनलाईन पद्धतीने दरमहा अदा करण्यात येईल. प्रशिक्षणार्थी महिन्यातून दहा दिवस किंवा त्यापेक्षा जास्त दिवस गैरहजर असला तर संबंधित प्रशिक्षणार्थीस त्या महिन्याचे विद्यावेतन अनुज्ञेय राहणार नाही. या योजनेअंतर्गत खाजगी क्षेत्रातील आस्थापना उद्योजकाकडे एकूण कार्यरत मनुष्यबळाच्या १0% व सेवा क्षेत्रासाठी २0% इतके उमेदवार कार्य प्रशिक्षणासाठी घेता येतील. केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय/निमशासकीय या आस्थापना/उद्योग/ महामंडळ यामध्ये मंजूर पदाच्या ५% इतके उमेदवार कार्य प्रशिक्षणासाठी घेता येतील. सदरच्या सहा महिन्याच्या कालावधीसाठी उमेदवारांना या योजनेअंतर्गत शासनांमार्फत शैक्षणिक अर्हतेच्या निकषानुसार विद्यावेतन दिले जाईल.

या योजनेच्या प्रशिक्षणानंतर प्रशिक्षण पूर्ण केलेले उमेदवार संबंधित उद्योग आस्थापना यांना योग्य वाटल्यास व उमेदवाराची इच्छुक असल्यास त्यांना रोजगार देण्याच्या दृष्टीने संबंधित आस्थापना निर्णय घेऊ शकतील. या कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रशिक्षणार्थींना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे शासनामार्फत विद्यावेतन देण्यात येणार आहे.

राज्य शासनाने योजनेची घोषणा केल्यानंतर मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचे फॉर्म भरण्यासाठी राज्यभरातील युवकांनी प्रतिसाद दिला आहे. पण या योजनेमुळे महाराष्ट्रात ठिकठिकाणी युवकांचा गोंधळ उडाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

काही ठिकाणी सर्व्हर जाम, पोर्टल बंद अशा अनेक समस्यांना युवक तोंड देताना दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर सरकारने ग्राम स्तरावर रचना लावून ऑफलाइन पद्धतीने फॉर्म भरून घेत असल्याचे डॉ सरोजनीताई राऊत यांनी सांगितले. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत आस्थापना व उद्योजक यांची ६६ शासकीय व १२ खाजगी अशा एकूण ७८ आस्थापना व उद्योजकांची नोंदणी झालेली आहे.

मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेअंतर्गत अधिसूचित करण्यात आलेली ६११0 शासकीय व १४४३ खाजगी असे एकूण ७५५३ इतकी रिक्त पदे आहेत. तर मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेअंतर्गत ६३५८ इतक्या उमेदवाराची नोंदणी झाली आहे. ३0 ऑगस्ट, २०२४ पर्यंत आस्थापनेमध्ये ६६७९ शासकीय व



८१६ खाजगी असे एकूण ७४९५ इतक्या उमेदवारांची निवड झाली आहे. तसेच आस्थापनामध्ये ४५२५ शासकीय व ४५0 खाजगी असे एकूण ४९७५ इतके उमेदवार प्रशिक्षणासाठी रुजू झाले आहेत.

यापुढेही योजनेपासून पात्र उमेदवारांनी अर्ज करण्याचे आवाहन केले आहे. फॉर्म भरताना कार्यकर्त्यांच्या माध्यमातून प्रत्येक घरापर्यंत जाऊन योजनेची माहिती सांगून सदर योजनेचे फॉर्म भरून घेण्याचे काम केले आहे. नवीन सुधारित जी.आर. नुसार नोंदणी करण्यास सुलभता आली आहे. युवा कार्य प्रशिक्षण योजनेकरीता एका उमेदवारास एकदाच लाभ घेता येईल त्यांनी पुन्हा अर्ज करू नये.

अद्यापही अर्ज सादर न केलेल्या १८ ते ३५ वयोगटातील पात्र उमेदवारांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करावे, असे आवाहन डॉ. सरोजनीताई राऊत यांनी केले आहे.

'मुख्यमंत्री - युवा कार्य प्रशिक्षण' योजनेला सर्वत्रच उत्तम प्रतिसाद मिळत आहे. पात्र उमेदवरांकडून ऑफलाईन केलेले अर्ज ग्राह्य धरले जातील. प्रवासात युवकांनी भरलेले फॉर्म व मिळत असलेल्या प्रतिसादावर बोलत असताना डॉ सरोजनीताई राऊत म्हणाल्या की, राज्य सरकारने बेरोजगारीवर आळा घालण्यासाठी या योजनेची सुरुवात केले आहे.

राज्यामध्ये युवक वर्ग आपले शिक्षण पूर्ण करून दरवर्षी मोठ्या संख्येने नोकरी व व्यवसायाच्या शोधात बाहेर पडत असतात. अशा बहुतांश युवकांना व्यवसाय व नोकरी संबंधीतचा अनुभव नसल्याने व्यवसाय सुरू करणे किंवा नोकरी मिळवण्यामध्ये बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागत असते.

अशा अडचणीमुळे तरुणांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण नियंत्रित ठेवण्यासाठी समस्या उद्भवत आहेत. म्हणून मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेमध्ये १२ वी पास, विविध ट्रेड मधील आय.टी.आय., पदवीधारक पदवी आणि पदव्युत्तर उमेदवारांचा समावेश आहे.

महाराष्ट्र मध्ये विविध उद्योग क्षेत्रात प्रचंड रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत तरी उद्योग आणि बेरोजगारांमध्ये ताळमेळ नसल्याने अनुभवा अभावी युवकांना शिक्षणानंतरही रोजगार मिळणे कठीण होत असल्याचे दिसत आहे. अशा विविध योजना राबवून राज्य सरकार बेरोजगारी चे प्रमाण कमी करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे. परंतु विरोधकांकडून या योजनेवर बोट ठेवण्याचे काम चालू आहे.

राजकीय धोरण असल्याचे सांगून सरकारने काढलेल्या योजना फसव्या असल्याचे सांगत अपप्रचार पसरविण्यात येत आहे. अशा कोणत्याही अपप्रचाराला पात्र उमेदवारांनी बळी पडू नये, असे डॉ. सरोजनीताई राऊत यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' या योजनेसंदर्भात उमेदवारांमध्ये संभ्रम निर्माण होत असून, त्यांना योजनेची योग्य माहिती मिळणे खूप महत्त्वाचे आहे म्हणून कळंब आणि धाराशिव तालुक्यामध्ये डॉ.सौ. सरोजनीताई संतोष राऊत या बहुतांश गावांमध्ये प्रवास करत आहेत.

तसेच कार्यकर्ते व व्यवस्थेच्या माध्यमातून 'मुख्यमंत्री - युवा कार्य प्रशिक्षण योजना' या योजनेची माहिती पत्रकाद्वारे व प्रत्यक्ष प्रवास करून लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचवण्याचे कार्य चालू असल्याचे सांगितले. अशा शासनाच्या विविध योजनांची जनजागृती करून, फॉर्म भरून घेत आहेत. तसेच फॉर्म बद्दलची स्थिती समजून घेणे आणि संबंधित शासकीय अधिकारी यांच्याकडे पाठपुरावा करण्याचे आवाहन डॉ.सरोजनीताईंच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

# अधिकारी दोन शिफ्टमध्ये तर कर्मचारी सोळा तास 'ऑन ड्युटी'

## विमानतळ सुरक्षा पथकातील अधिकाऱ्यांच्या कारभाराकडे जिल्हा पोलीस अधीक्षकांचे दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ०५ सप्टेंबर-**

विमानतळ सुरक्षा पथकात मंजूर संख्याबळापेक्षा केवळ ३५ पोलीस कर्मचारी कार्यरत असून यामुळे कर्मचाऱ्यांना १५ ते १६ तास कर्तव्य बजवावे लागत आहे. त्यातच येथील अधिकाऱ्यांनी आपला मनमानी कारभार सुरू केला असून अधिकारी दोन शिफ्ट मध्ये कर्तव्यावर तर कर्मचाऱ्यांना पंधरा ते सोळा तास कर्तव्यावर जुंपण्यात येत असल्याने कर्मचारी नाराजी व्यक्त करीत आहेत.

विमानतळ सुरक्षा पथकात एकूण ५७ संख्या बळ मंजूर आहे. परंतु या ठिकाणी केवळ ३५ कर्मचारी कार्यरत आहेत. विमानतळ परिसर मोठा असल्याने या ठिकाणी चेक पोस्टवर पोलिस अमलदारांना नेमण्यात येते. परंतु त्या चेक पोस्टवर कुठल्याच प्रकारच्या सुविधा उपलब्ध नाहीत. अनेक वेळा विमान सेवेला विलंब होतो, काही वेळा टेक्निकल प्रॉब्लेम येतात तर काही वेळा व्हीआयपी तथा व्हीव्हीआयपी यांचा दौरा असल्यामुळे कर्मचाऱ्यांना भर उन्हात, पावसात, दिवस-रात्र कर्तव्य बजवावे लागत आहे. विशेष म्हणजे या परिसरात सापांचा सुळसुळाट असल्याने एखादी दुर्देवी घटना घडल्यास त्यास जबाबदार कोण असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यातच येथील अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार सुरू असून कर्मचाऱ्यांना १५ ते १६ तास कर्तव्याला जुंपून येथील अधिकारी दोन शिफ्ट मध्ये कर्तव्य बजावत आहेत. आगामी काळात विधानसभा निवडणुका असल्यामुळे या ठिकाणी कर्मचाऱ्यांची संख्या वाढवण्याची गरज असल्याची मागणी होत आहे.

**आठ वर्षापासून महिला अधिकारी ठाण मांडून**

दरम्यान निवडणूक आयोगाने बदलीचे आदेश दिलेले असताना सुद्धा विमानतळ सुरक्षा पथकातील महिला अधिकारी मागील आठ वर्षापासून याच ठिकाणी ठाण मांडून आहेत. पोलीस उपनिरीक्षक ते सहाय्यक पोलीस निरीक्षक या पदावर पदोन्नती झाल्यानंतरही याच ठिकाणी कर्तव्यावर आहेत. विशेष म्हणजे या अधिकाऱ्यांनी स्क्रिनींग मशीनचे केवळ पंधरा दिवसाचे बेसिक ट्रेनिंग केल्याची माहिती आहे. त्यानंतर असणारे प्रशिक्षण घेतलेले नाही. यापूर्वी या महिला अधिकाऱ्यांची दोन ते तीन वेळा बदली झाली होती. परंतु त्यांनी बदली रद्द करून घेत याच ठिकाणी ठाण मांडले आहे. त्यातच या ठिकाणी असलेल्या असलेल्या कर्मचाऱ्यांना देखील या महिला अधिकाऱ्यांकडुन मानसिक त्रास देखील देण्यात येत असुन मागील सहा ते सात महिण्यापुर्वी या ठिकाणी कार्यरत एका कर्मचाऱ्याने आत्मदहन करण्याचा इशारा दिला असल्याची विश्वसनीय माहिती आहे.



## गोदावरी नदीपात्रात उडी घेतलेल्याचे वाचविले प्राण

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ०५ सप्टेंबर-**

गोवर्धन घाट पुलावरुन गोदावरी नदीपात्रात उडी घेतलेल्या एकाचे रुग्ण हक्क संरक्षण समितीचे मराठवाडा उपाध्यक्ष बलजितसिंघ बावरी यांनी जीवरक्षक दलाच्या मदतीने प्राण वाचविले.

शहरातील गोवर्धनघाट पुलावरुन आज दुपारी दोनच्या सुमारास कंधार तालुक्यातील हाळदा येथील पांडूरंग विठ्ठल सुसटेवाड यांनी गोदावरी नदीपात्रात उडी घेतली. पूर सदृष्य परिस्थितीमुळे जीवरक्षक दल गोदावरी नदी पात्रात तैनात असल्याने जीवरक्षक दलाच्या जवानांनी तातडीने पांडूरंग सुसटेवाड यांना बाहेर काढले. यावेळी याठिकाणी असलेल्या रुग्ण संरक्षण समितीचे मराठवाडा उपाध्यक्ष बलजितसिंघ बावरी यांनी तातडीने जीवरक्षक दलाच्या मदतीने पांडूरंग सुसटेवाड यांना तातडीने शासकीय रुग्णालयात दाखल केले. वेळीच उपचार झाल्याने सुसटेवाड यांचे प्राण वाचले. या घटनेची माहिती हाळदा येथील सरपंच यांना देखील देण्यात आली.

## संक्षिप्त वृत्त

### वैद्यकीय प्रवेश परीक्षेत एम.के. टी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नो सायन्सच्या विद्यार्थ्यांचे यश

**किनवट** -मनामध्ये जिद्द असेल तर कुठलेही कार्य कठीण नाही,अशाच प्रकारची प्रचिती नुकत्याच लागलेल्या नीट वैद्यकीय पात्रता परीक्षेच्या पहिल्या प्रवेश यादीतील निकालावरून स्पष्ट होते. योग्य मार्गदर्शन व सातत्यपूर्ण अभ्यास यांच्या बळावरती किनवट सारख्या आदिवासी, दुर्गम भागांमध्ये २ दोन वर्षांपूर्वी कार्यरत झालेल्या मातोश्री कमलताई ठमके इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नो सायन्स, गोकुंदा(ता. किनवट)मधील विद्यार्थ्यांची पहिल्या यादीत निवड होणे हे स्पष्ट करते,असे प्रतिपादन अभि. प्रशांत ठमके यांनी केले. महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या सभागृहात विविध शासकीय वैद्यकीय महाविद्यालया मध्ये निवड झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.यावेळी अध्यक्षीय समारोप करताना ते बोलत होते. मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्या शुभांगीताई ठमके, माजी प्राचार्य राजाराम वाघमारे, मुख्याध्यापक तथा प्राचार्य अंबादास जुनगरे व रामराव घुले हे उपस्थित होते. एम.के.टी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नो सायन्स चे विद्यार्थी सुयश प्रशांत ठमके यांने नीट परीक्षेत ५९५ एवढे गुण घेऊन राजीव गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,ठाणे ,तर यश रामराव घुले यांने ५७७ एवढे गुण प्राप्त करून शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड येथे पहिल्याच प्रयत्नात प्रवेश मिळवला असल्यामुळे यशस्वी विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसह सत्कार करण्यात आला. वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळावा म्हणून अनेक विद्यार्थी नांदेड सारख्या जिल्ह्याचे ठिकाणी राहून लाखो रुपये खर्च करून डॉक्टर बनवण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी झटत असतात. परंतु, आपले हे स्वप्न किनवट सारख्या भागामध्ये राहून सुद्धा पूर्ण होऊ शकत. ही बाब मातोश्री कमलताई ठमके इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नो सायन्स या संस्थेने सिद्ध करून दाखवली आहे. २५ विद्यार्थ्यांच्या पहिल्या बॅचमधील २ विद्यार्थ्यांची निवड होणे हे निश्चितपणे भविष्यातील सुंदर यशाची नांदी आहे. हे यावरून स्पष्ट होते. इन्स्टिट्यूट मधील तज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन, अद्यावत ज्ञान, सुसज्ज अभ्यासिका यामुळे हे शक्य झाले असे, मत गुणवंत विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना मांडले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.फैयाज आलम,प्रा.नैहाल अहमद,प्रा.शेख शब्बीर प्रा.सुघोष चव्हाण, उप मुख्याध्यापक प्रमोद मुनेश्वर, पर्यवेक्षक प्रा.इंगळे आर.व्ही, किशोर डांगे, सुभाष सूर्यवंशी, चव्हाण पी.पी.यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास नीट व जेईई या परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी,पालक, परिसरातील नागरिक, प्राध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी,हे मोठ्या संख्येने उपस्थित होते,सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.संतोष बैस ठाकूर यांनी केले तर आभार प्रा.सुबोध सर्पे यांनी मानले.

### सिडको क्षेत्रीय कार्यालयातील तीन कर्मचाऱ्यांस पदोन्नती

**नवीन नांदेड** -नांदेड वाघाळा शहर महापालिकेच्या आकृतीबंध शासन निर्णय दिनांक २०२३ अन्वये मंजूर झाल्यानुसार नांदेड मनपा आयुक्त डॉ.महेश कुमार डोईफोडे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १६ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी ४ वाजता निवड समितीची बैठक आयोजित करून मनपातील विविध मुळपदावरील कर्मचाऱ्यांस पदोन्नती देण्यात आली. सिडको क्षेत्रिय कार्यालय येथील तीन कर्मचारी सौ. मीना अजायबसिंग अडबलवार या लिपिक पदावरून वरिष्ठ लिपिक पदावर पदोन्नती तर मारोती शंकरराव सारंग व मदन ज्ञानोबा कोल्हे हे दोघे ही मूळ माळी पदावरून लिपिक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. नांदेड वाघाळा शहर महापालिकेच्या आकृतीबंध शासन निर्णय दिनांक २०२३ अन्वये मंजूर झाले या मनपाच्या आस्थापनेवरील चतुर्थ श्रेणी गट -ड मध्ये कार्यरत सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियम २०२४ मंजूर झाल्याने नांदेड मनपा सेवा प्रवेश नियमानुसार विहित अर्हता धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णयानुसार रिक्त पदावर पदोन्नती देण्यासंदर्भात मनपा आयुक्त डॉ. महेश कुमार डोईफोडे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १६ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी ४ वाजता निवड समितीची बैठक आयोजित करून सदरील निवड समितीने संदर्भ क्रमांक ३ अन्वये खालील प्रमाणे पदोन्नती देण्यास शिफारस केली आहे. संदर्भ क्रमांक ३ अन्वये निवड समितीने शिफारस केल्यानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापना श्रेणी गट- ड मधील पदावर कार्यरत असलेल्या व सेवा प्रवेश नियमानुसार विविध अर्हता धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा जेष्ठता विहीत अर्हता व पात्रतेनुसार आस्थापनेवरील गट- क मधील लिपिक टंकलेखन या पदावर वेतनश्रेणीच्या अटी शर्तीच्या अधीन राहून नियमित पदोन्नती देण्यात आली आहे. सदरील पदोन्नतीसाठी सिडको क्षेत्रिय कार्यालय येथील तीन कर्मचारी सौ. मीना अजायबसिंग अडबलवार या लिपिक पदावरून वरिष्ठ लिपिक पदावर पदोन्नती तर मारोती शंकरराव सारंग व मदन ज्ञानोबा कोल्हे हे दोघे ही मूळ माळी पदावरून लिपिक पदावर पदोन्नती देण्यात आली. आहे.सदरील पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांचे सिडको क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रीय अधिकारी संभाजी कास्टेवाड यांनी अभिनंदन केले.

### अतिवृष्टीची नुकसान भरपाई द्या :कलंबरकर

**मुखेड** - मागील ५० तासापेक्षा अधिक कालावधीपासून मराठवाड्यात नांदेड व मुखेड तालुक्यात सारखा पाऊस पडल्याने असल्याने अतिवृष्टीची नोंद झाली आहे.अतिवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत झाले होते,पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.तरी प्रशासनाने बाऱ्हाळी,मुक्रामाबाद,जांब व अंबुलगा महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद जाहीर केली आणि जाहूर,येवती,चांडोळा आणि मुखेड महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद दिली नाही.अतिवृष्टीने संपूर्ण मुखेड तालुक्यात पिकांचे नुकसान झाले आहे.संपूर्ण मुखेड तालुक्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टीने नुकसान झालेल्या पिकांची नुकसानभरपाई मिळाली पाहिजे अशी मागणी सरकार व प्रशासनाकडे प्रत्यक्ष बाधित पिकांच्या शेतीतून शेतकरी संघटनेचे शिवशंकर पाटील कलंबरकर यांनी केले आहे. मागील वर्षी अतिवृष्टी व ढगफुटीने पिकांचे नुकसान व जमीन खरडून गेली होती.त्याची नुकसान भरपाई अजून बऱ्याच शेतकऱ्यांना मिळाली नाही.त्यांना ती तात्काळ मिळावी.गेले वर्षी प्रशासनाने पंचनामे करतांना प्रत्यक्ष नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मधून वगळले होते,तसे प्रकार यावर्षी होऊ नयेत याची दखल तहसीलदार साहेबांनी घ्यावी असे मागणीत सांगितले आहे.

## 'नो डिजे नो डॉल्बी' सामाजिक बांधीलकी जोपासुनच गणेशोत्सव साजरा करावा : पो.नि. अंकुश माने



**तभा वृत्तसेवा**
**उमरी, ०५ सप्टेंबर-**

उमरी शहर व तालुक्यातील गणेश मंडळांनी सामाजिक विविध उपक्रमाचे देखावे करून 'नो डिजे नो डॉल्बी' या प्रमाणे सामाजिक बांधीलकी ठेवून गुलाल मुक्त फुलाची उधळन करून गणेश उत्सव साजरा करावे असे अव्हान ही उमरी पोलिस निरीक्षक अंकूश माने यांनी शांतता कमीटीच्या बैठकीत केले आहे .

उमरी पोलिस ठाणेच्या वतिने मान्यवराचे स्वागत करण्यात आले विशेष मुस्लीम सामाजीक कार्यकर्ते सय्यद चाँदसाब यांच्या वतिने ही मान्यवराचे स्वागत करण्यात आले.

या शांतता कमिटीचे अध्यक्ष पोलिस निरीक्षक अंकुश माने हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून मुख्यधिकारी निलम कांबळे , पोलीस उपनिरीक्षक मराळे , जिल्हा मध्यर्ती बँक संचालक कैलास देशमुख गोरठेकर , रेल्वे बोर्ड सदस्य पारस दर्डा , शिवसेना शिंदे गट अध्यक्ष सुभाष पेरेवार , माजी नगरसेवक एजाज खॉन , माजी नगरसेवक किशान रॅपनवाड सर , गंगाधर सवई , विद्यूत विभागाचे बी एस तोटावाड , कॉग्रेस तालुकाध्यक्ष प्रल्हाद पा इज्जतगावकर , भाजपाचे गजानन मालीपाटील , नगरसेवक प्र सोनू वाघमारे , मज्जीद कमीटीचे प्रमुख जावेदखॉन, नगसेविका अनुसयाबाई कटकदवणे ,तलाठी खानसोळे , दिगांबर जगताप , एम आय एमचे तालुध्यक्ष , यांची उपस्थिती होती.

पुढे पोलिस निरीक्षक अंकुश माने म्हणाले की हिंदू - मुस्लीम ऐक्यची परंपरा ही अशीच कायम राहावी शक्यो एक गाव एक गणपती ही संकल्पना राबवावी गणेश मंडळानी डिजे च्या भानगडीत पडू नये समाजापुढे विविध देखावे करून समाजापुढे आदर्श ठेवावा गुलाल ही केमिकल युक्त बाजारात येत आहे त्यामुळे त्वचेला डोळ्यावर परिणाम पडतो गुलाल त्या ऐवजी फुलाची उधळ केल्यास शेतकरी फुल वाल्याची खरेदी झाल्यास त्यांना ही चार पैसाची मदत होईल . गणेश मुर्तीची जागरण म्हणून पत्ते खेळू नये अवैध धंदे ताटू नये तसे निदर्शनास आल्यावर संबधीत मंडळावर योग्य ती कडक कारवाई करण्यात येईल यात कोणाचाही हायगय केली जाणार नाही विद्रुप गाणे लावून हा उत्सव साजरा करू नका धार्मिकच गाणे लावा गणपती उत्सवाला गालबोट लागेल असे वर्तन करू नका तशी मंडळानी ही खबरदारी घ्यावी कायद्याचे पालन करा गणेश मंडळाचा एक चांगला संदेश समाजापर्यंत पोहचेल अशी शिस्तबद्ध ठेवा असेही पो नि अकुंश माने यांनी मार्गदर्शन केले आहे

मुख्यधिकारी निलम कांबळे ही म्हणाल्या, नगर परिषद प्रशासन सदैव तुमच्या सेवेत असेल कांही समस्या उद्धभल्यास आमच्याशी संपर्क करावे गणपती समोर स्वच्छता राखावी तसे नगरपरिषद स्वच्छता अभियान सुरू ठेवणार आहे शक्यतो इकोविल गणपती बसवावे म्हणजे मातीचे असले तर खुप चांगल होईल नगर परिषदेकडून कोणतीच अडचण भासू दिली जाणार नाही असे मुख्यधिकारी निलम कांबळे यांनी गव्हाई दिली आहे.

कार्यक्रमाचे सुरेख असे सुत्रसंचालन छावाचे जिल्हा संघटक राजेश जाधव यांनी केले व आभार मानले. या बैठकीला तालुक्यातील सर्व पोलिस पाटील, प्रतिष्टीत नागरीक , सर्व पक्षाचे पदअधिकारी पत्रकार बांधव सामाजीक कार्यकर्ते गणेश मंडळाचे पदाधिकारी मोठया प्रमाणात उपस्थित होते.

## दुरूस्तीवर लाखो रूपय खर्च करूनही वारंवार विद्युत पुरवठा खंडीत

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, ०३ सप्टेंबर-**

दरवर्षी महावितरणकडून दुरूस्तीवर लाखो रूपय खर्च करून ही वारंवार विद्युत पुरवठा खंडीत होत असल्याने नागरिक चांगलेच वैतागले आहेत. गेली पंधरा दिवसापासून अचानक विद्युत पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण वाढल्याने अनेक छोट्या मोठ्या व्यवसायिकांना याचा फटका बसत आहे.

नायगांव शहरासह तालुक्यातील विद्युत पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण वाढत असुन . दरवर्षी महावितरणकडून खाजगी ठेकेदाराकडून दुरूस्ती करून त्याच्यावर लाखो रूपय खर्च केला जातो. परंतु दुरूस्ती नियमित करून विद्युत पुरवठा खंडीत होत असेल तर दुरूस्तीचा काय फायदा असा सवाल आता नागरिक विचारत आहेत.

## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी पन्नास हजार रुपये देण्याची भाजपाची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, ०५ सप्टेंबर-**

मागील चार दिवसापासून अतिवृष्टी मुळे मुदखेड तालुक्यात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्याच्या शेतीतील नुकसान झाल्यामुळे मुदखेड तालुका ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये देण्यात यावे यासाठी दि.४ सप्टेंबर २०२४ रोजी मुदखेड तालुका व शहर भाजपाच्या वतीने तहसील कार्यालयात येथे निवेदन देण्यात आले.

मागील चार दिवसापासून मुदखेड तालुक्यात मोठ्या प्रमाणात पावसाने थैमान मांडला असून सदरील अतिवृष्टीमुळे मुदखेड तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. तसेच विमा कंपनी मार्फत विमा क्लेम करणे बंधनकारक आहे. शेतकऱ्यांना ७२ तासात ऑनलाईन विमा क्लेम करण्यासाठी अवधी असते परंतु सततच्या पावसामुळे लाईट व इंटरनेट सेवा सतत खंडित होत असल्याने शेतकऱ्यांना अनेक अडचणीचा सामना करावा लागत आहे. तसेच कंपनीमार्फत दिलेला हेल्पलाइन नंबर १४४४७ हा पूर्ण पणे व्यस्त व लागत नसल्यामुळे शेतकऱ्यांना विमा क्लेम न करता शेतकऱ्यांना आपल्या कार्यालयामार्फत सरसकट पंचनामे करून विम्याची मिळणारी रक्कम अदा करण्यात यावे

तसेच मुदखेड तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना प्रत्येकी ५०,००० हजार रुपये देण्यात यावे असे निवेदन मुदखेड भाजपाच्या वतीने तहसील कार्यालय येथे देण्यात आले आहे.यावेळी उपस्थित असलेले भाजपा जिल्हा महामंत्री प्रवीण गायकवाड, मारोती पाटील शंखतीर्थकर, संजय सोनटक्के, संजय आऊलवार, रामसिंग चव्हाण, मारोती जाधव,भीमराव पाटील कल्याणे, माधव पाटील कदम, कानोबा बिस्मिल्ले, संतोष पाटील गाडे,मनोज कमटे,ईश्वर पिन्नलवार,चांदु बोकेफोड, किशोर पारवेकर,गुलाब पाटील सुर्यवंशी, प्रकाश सूर्यवंशी, प्रभाकर पांचाळ, ऋषी पारवेकर, अमोल आबादार ,शिवा तरोडेकर, संदीप मोडवान, सुशील मंगल, गोविंद गुड्डमवार, संतोष येरपलवार, चंद्रकांत येगुरले, यांच्यासह भाजपा कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

## राष्ट्रपतींच्या हस्ते भिक्खू संघास चिवरदान

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ०५ सप्टेंबर-**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते भिक्खू संघाला चिवरदान करण्यात आले. तसेच भिक्खू संघाकडून त्यांना बुद्ध मूर्ती भेट देण्यात आली. डॉ. भदंत उपगुप्त महाथेरो, भदंत बोधिपालो महाथेरो, अखिल भारतीय भिक्खू संघाचे नांदेड जिल्हाध्यक्ष भदंत पंयाबोधी थेरो, भदंत पय्यानंद थेरो, भदंत नागसेनबोधी थेरो, भदंत सत्यपाल थेरो, भदंत करुणानंद थेरो, भदंत महाविरो, भदंत धम्मशील थेरो आदी भिक्खू संघ उपस्थित होता.

## ग्रामिण पोलिसांनी कत्तलीसाठी जाणारे गोवंश पकडले

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ०५ सप्टेंबर-**

ग्रामीण पोलिसांनी कत्तलीसाठी जाणारे गोवंशयी जातीचे १८ बैल व एक आयचर वाहन असा एकूण १९ लाख १७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याची कारवाई दि.४ सप्टेंबर रोजी धनेगाव येथे केली.

बोंढार ते धनेगाव मार्गावर एका वाहनात कत्तलीसाठी गोवंशाची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यावरुन ग्रामीण पोलिसांच्या पथकाने धनेगाव येथे आयचर क्र.एमएच-२०-इएल-७८८७ यास दि.४ सप्टेंबर रोजी पहाटे चारच्या सुमारास थांबविले असता त्यामध्ये गोवंशीय जातीचे १८ बैल आढळून आले. पोलिसांनी या प्रकरणी शेख फिरोज रब्बानी, कुरेशी अबूजर बशीर, जावेद अजीज शेख, शेख गुलाम रसुल शेख सर्व रा.बोरगाव ता.सिल्लोड जि.संभाजीनगर व हबीब खान हुसेन खान रा.जळगाव यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि कारवाई पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने, गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे, पोहेकॉ. शेख सत्तार, पंचलिंग यांनी पार पाडली.

## जबरी चोरी प्रकरणातील आरोपीस अटक ; तीन लाखांचा ऐवज जप्त

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ०५ सप्टेंबर-**

जबरी चोरीच्या प्रकरणातील एका आरोपीस भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने दि.४ सप्टेंबर रोजी ताब्यात घेतले असून, त्याच्याकडून ४४ ग्रॅम सोन्याचे तीन गंठण जप्त केले आहेत.

भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत जबरी चोरीची घटना घडली होती. या घटनेतील आरोपी अर्धापूर तालुक्यातील मालेगाव येथे स्पेशल आलू बिर्याणी हॉटेलवर असल्याची माहिती मिळताच भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने मालेगाव येथे जावून मुकेश गजानन कल्याणकर रा.मालेगाव यास अटक केली. त्याची कसून चौकशी केली असता गणेश दिलीप धबाले, राहुल जाधव व यश चित्तडवाड या



तिघांनी मिळून गुन्हा केल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून ४४ ग्रॅम सोन्याचे तीन लाख २१ हजार ५२७ रुपये किंमतीचे दागिणे जप्त केले.

हि कारवाई पोलीस निरीक्षक रामदास शेंडगे, गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक विनोद देशमुख, पोहेकॉ. गजानन किडे, प्रदीप गर्दनमारे, ओमप्रकाश कवडे, सूर्यभान हासे, नवनाथ गुट्टे यांनी पार पाडली.

## कंधार-लोहा तालुक्यातील शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई द्या : प्रा. डॉ. पुरुषोत्तम धोंडगे

**तभा वृत्तसेवा**
**कंधार, ०५ सप्टेंबर-**

लोहा,कंधार तालुक्यात अतिवृष्टीमुळे तीन दिवस झालेल्या मुसळधार पावसामुळे खरीपांच्या पिकाचे मोठे नुकसान झाले असून कापूस,हळद,तूर,ज्वारी, मुग,उडीद,भाजीपाला या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. शेतीचे तात्काळ पंचनामे करुन कंधार,लोहा तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करुन सरसगट शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी अशी मागणी प्रा. डॉ.पुरुषोत्तम धोंडगे यांनी कंधार तहसीलदार यांना निवेदनाद्वारे केली आहे.

लोहा-कंधार तालुक्यात अतिवृष्टी व मुसळधार पावसामुळे जमिनी पाण्याखाली गेल्याने हाताला पीक गेल्यामुळे शेतकरी अस्मानी संकटात सापडला आहे.७२ तासांमध्ये झालेल्या नुकसानीची ऑनलाईन नोंद करण्याचे प्रशासन सांगत आहे.पण ऑनलाईन साईट चालत नसल्याने शेतकरी हातबल होत आहेत. ही जाचक अट रद्द करून सरसकट पंचनामे करून दोन्ही तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी.

२०२३ वर्षातील पिकांची आणेवारी ५० टक्के च्या आत असूनही अद्यापपर्यंत शेतकऱ्यांना मागील वर्षाचा पिकविमा मिळाला नाही. नांदेड जिल्ह्यात लोहा,कंधार तालुका वगळता सर्व तालुक्यांना पिकविमा मिळाला पण या दोन्ही तालुक्यातील शेतकऱ्याला पिकविमा मिळाला नसल्याने या शेतकऱ्यावर अन्याय झाला आहे.शासनाने मागील वर्षाचा २०२३ चा पिकविम्यासह या वर्षाचा पिकविमा व नुकसान भरपाई त्वरित देऊन शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा असे तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनातून अशी मागणी केली आहे निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री,महसूल



मंत्री,जिल्हाधिकारी नांदेड,जिल्हा कृषी अधिकारी नांदेड,कंधार उप विभागीय कार्यालय यांना देण्यात आल्या आहेत.

निवेदनावर बाबाराव पा.शिंदे,कटीराम पा.कदम,भीमराव वंजे,पंडितराव पेठकर, माधवराव पिकविमा मिळाला पण या दोन्ही तालुक्यातील शेतकऱ्याला पिकविमा मिळाला नसल्याने या शेतकऱ्यावर अन्याय झाला आहे.शासनाने मागील वर्षाचा २०२३ चा पिकविम्यासह या वर्षाचा पिकविमा व नुकसान भरपाई त्वरित देऊन शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा असे तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनातून अशी मागणी केली आहे निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री,महसूल मंत्री,जिल्हाधिकारी नांदेड,जिल्हा कृषी अधिकारी नांदेड,कंधार उप विभागीय कार्यालय यांना देण्यात आल्या आहेत.

निवेदनावर बाबाराव पा.शिंदे,कटीराम पा.कदम,भीमराव वंजे,पंडितराव पेठकर, माधवराव पेठकर,माधव भालेराव,उद्धव पाटील लाडेकर,सरपंच आत्माराम पा.लाडेकर,राजीव पाटील डफडे,विठ्ठल डफडे,आकाश डफडे,माधव लुंगारे,राजीव लुंगारे शिवाजी पा.भुत्ते,हनमंत आनकाडे,शामराव गायकवाड,विलास सांगवे,विठ्ठल भुत्ते,राजू तोरणे, ऋषिकेश तोरणे,विकास गायकवाड,आधिच्या स्वाक्षऱ्या आहेत.

लातूर
दिनांक
लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले

# खा. शिवाजीराव काळगे यांच्या वाढदिनी शालेय साहित्याचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**शिरूर अनंतपाळ, दि. ५ सप्टेंबर-**

शिरूर अनंतपाळ तालुक्याचे खासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांच्या वाढदिवसानिमित्त महाविकास आघाडी शिरूर अनंतपाळच्या वतीने जिल्हा परिषद कन्या शाळा शिरूर अनंतपाळ येथे शालेय साहित्याचे वाटप करून साजरा करण्यात आला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे, काँग्रेस पक्षाचे नेते बसवराज मठपती, सेवानिवृत्त



आदर्श शिक्षक महादेव पारशटे गुरूजी, मराठवाडा साहित्य परिषदेचे प्रा. बालाजी येरोळे, गुंडेराव आवाळे गुरूजी, उमाकांत सिंदाळकर गुरूजी, काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष अशोक कोरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष व्यंकट हांद्राळे, गुरुनाथ अचवले, काशिनाथ धुमाळे, संभाजी पारशट्टे, तानाजी वलांडे उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त



### रामनाथ महाविद्यालयात शिक्षकदिन साजरा

**औसा, दि. ५ सप्टेंबर-**

तालुक्यातील आलमला येथील श्री रामनाथ विद्यालयाच्या प्रांगणात प्रथम सर्वपल्ली राधाकृष्णन व संतश्रेष्ठ श्री चक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापिका अनिता पाटील यांच्या हस्ते करुन शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने विद्यालयातील नववी, दहावीतील विद्यार्थ्यांनी शिक्षक, प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी बांधवांचा गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. विद्यालयाचे वरिष्ठ लिपिक ईश्वर वाडकर यांनी शाळेत उत्तम कामगिरी केली. याबद्दल त्यांचा सचिव प्रभाकर कापसे यांच्या हस्ते रामनाथ कर्मचारी आदर्श पुरस्कार, शाल, श्रीफळ, पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. पर्यवेक्षक पी. सी. पाटील यांनी विद्यार्थ्यांना सर्वपल्ली राधाकृष्णन व संत श्रेष्ठ श्री चक्रधर स्वामी यांच्या जीवनावर प्रकाश टाकत विविध उदाहरणे देऊन माहिती सांगितली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गौरीशा धाराशिवे, हर्षदा बिराजदार, हर्षदा गांधले, डी. आर. उकरडे, भास्कर सुर्यवंशी यांनी पुढाकार घेतला होता.



### चिलखा येथे पु.अहिल्यादेवी होळकर पुण्यतिथी साजरी

**अहमदपूर, दि. ५ सप्टेंबर-**

अहमदपूर तालुक्यातील चिलखा येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त पु.अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतीमेस रुद्राभिषेक व.ध्वजारोहन तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतीमेचे पूजन डॉ. पांडुरंग टोम्पे., पांडुरंग लोकरे, ज्ञानोबा बडगिरे, रामप्रसाद होळकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बाळासाहेब होळकर, हरिओम होळकर, अनंतराव होळकर, शंकरराव जोशी, संतोष होळकर, अ‍ॅड. सोमनाथ फुले, यशवंत इंगळे, दिगंबर आगलावे, बाबुराव शिंदे, राजकुमार बाजगिर, वाल्मिक पोले माधव होळकर, आशोक माणे, विट्ठलराव होळकर, शिवदास होळकर, शिवानंद माणे, मारोती माणे, मंडोदरीबाई जांभूळकर, मिरा होळकर, उज्वला होळकर उपस्थित होते.



### महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात डॉ. राधाकृष्णन जयंती साजरी

**उदगीर, दि. ५ सप्टेंबर-**

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात दिवंगत राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जयंती तसेच शिक्षक दिनानिमित्त डॉक्टर राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ.आर.के.मस्के, ग्रंथपाल डॉ. एल.बी.पेन्सलवार, दिनविशेष समितीचे प्रा.डॉ.संजय सोमवंशी, प्रा.डॉ.गौरव जेवळीकर, कार्यालय प्रमुख दयानंद स्वामी यांच्यासह प्राध्यापक कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

### गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजवावेत : आ. देशमुख

**लातूर, दि. ५ सप्टेंबर-**

श्री गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर लातूर शहरातील रस्त्यावरील खड्डे त्वरित बुजवण्यात यावेत, मिरवणूक मार्गावरील अडथळे दूर करावेत, रस्त्यावर आलेल्या झाडाचा फांद्या बाजूला हटवाव्यात आदी सूचना माजी मंत्री आ. अमित देशमुख यांनी लातूर महापालिकेचे आयुक्त यांना पत्र पाठवून केल्या आहेत. लातूर महापालिकेचे आयुक्त मनोहरे यांना पाठवलेल्या पत्रात आमदार अमित देशमुख यांनी म्हटले आहे की, सततच्या पावसामुळे शहरात रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले आहेत, पाणीपुरवठ्याच्या पाईपलाईनचे खोदकाम आणि इतर कामामुळेही रस्ते खराब होऊन जागोजागी चिखल निर्माण झाला आहे. गणेशोत्सवाच्या दरम्यान मिरवणुकांना या खड्ड्यामुळे अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे, अनेक ठिकाणी मिरवणूक मार्गात झाडाच्या फांद्याही रस्त्यावर आल्या आहेत. मिरवणुकीच्या दिवशी फक्त एक दिवसासाठी आवश्यकतेनुसार हे स्टील रॉड काढून घ्यावेत, असेही देशमुख यांनी या पत्रात म्हटले आहे, महापालिका प्रशासन युद्ध पातळीवर हे काम हाती घेईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

# शेतकऱ्यांना जास्तीत जास्त नुकसान भरपाई देणार

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे; हेर, लोहारा शिवरातील पीक नुकसानीची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. ५ सप्टेंबर-**

लातूर जिल्ह्यात २ सप्टेंबर रोजी ३२ महसूल मंडळात अतिवृष्टी झाली आहे. या अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचले. यावेळी त्यांनी उदगीर तालुक्यातील हेर आणि लोहारा शिवारातील पीक नुकसानीची पाहणी केली, तसेच शेतकऱ्यांकडून नुकसानीची माहिती घेतली.

शेतकऱ्यांना मदत करताना नियम, निकष न पाहता एनडीआरएफचे निकष बाजूला ठेवून जास्तीत जास्त नुकसान भरपाई दिली जाईल. राज्य शासन सदैव



शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून यावेळी झालेल्या नुकसानीच्या काळातही शेतकऱ्यांना पूर्ण ताकदीने मदत केली जाईल, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितले.

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्यासह माजी आमदार गोविंद केंद्रे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, उदगीरचे उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर यावेळी उपस्थित होते. दोन सप्टेंबर रोजी उदगीर, जळकोट तालुक्यातील सर्व महसूल मंडळात अतिवृष्टी झाल्याने सोयाबीन व इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांना तातडीने नुकसान भरपाईबाबत आश्वस्त केले. मराठवाड्यात अतिवृष्टी झाल्यानंतर लगेचच विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत. लातूर जिल्ह्यातही अतिवृष्टीने सोयाबीनसह इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे आज प्रत्यक्ष पाहणीमध्ये दिसून आल

### सोयाबीनसह इतर पिकांचे मोठे नुकसान

अतिवृष्टीमुळे सोयाबीनसह इतर पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे दिसून येत आहे. अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची मदत शेतकऱ्यांना लवकरात लवकर देण्यात येईल. पंचनाम्याचे अहवाल येताच नुकसानभरपाईबाबत पुढील कार्यवाही तातडीने केली जाईल, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## लातूर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. ५ सप्टेंबर-**

भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिनानिमित्त श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित लातूर कॉलेज ऑफ फार्मसी लातूर, लातूर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी लातूर, लातूर कॉलेज ऑफ सायन्स राजीव गांधी इन्स्टिट्यूट ऑफ पॉलीटेक्निक लातूर, एसव्हीएसएस लातूर कॉलेज ऑफ नर्सिंग लातूर या महाविद्यालयामध्ये शिक्षक दिन साजरा करण्यात आला.

संचालक माधुरी बावगे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून शिक्षक दिन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर



बावगे, संचालक नंदकिशोर बावगे, प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला, प्राचार्य डॉ.वीरेंद्र मेश्राम, प्राचार्य संतोष मेदगे, उपप्राचार्या योगिता बावगे, उप प्राचार्या क्षितिजा माळी, प्रा. अतुल कदम, प्रा. माधुरी पोळकर प्रा. शुभम वैराकार आदी शिक्षक उपस्थित होते. प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपल्या आई वडिलांचे स्वप्न अभ्यास करून व प्रामाणिकपणे जिद्दीने साकार करावे. मोबाईलचा वापर कामापुरता करावा. गुरु व शिष्य नाते कसे असावे याबद्दल सखोल मनोगत व्यक्त केले. शिक्षकांनी शिकवत असताना विद्यार्थ्यांमध्ये दुजाभाव करू नये . दोघानीही एकमेकांचा आदर करावा असे मत संचालिका माधुरी बावगे यांनी यावेळी व्यक्त केले. शिक्षकदिनानिमित्त महाविद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर आणि विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. सूत्रसंचालन ऋतुजा वनवे आणि आभार आकांक्षा फड यांनी मानले.

## मंगेशकर महाविद्यालयात व्यापार कौशल्ये विकास उपक्रमाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. ५ सप्टेंबर-**

तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयातील कौशल्य विकास केंद्र अंतर्गत दि.४ सप्टेंबर रोजी प्रात्यक्षिक व व्यावहारिक ज्ञानावर आधारित आणि विद्यार्थी केंद्रित व्यापार कौशल्ये विकास उपक्रमाचे (बिझनेस स्किल्स डेव्हलपमेंट क्टिव्हिटी) उद्घाटन सहयोगी प्राध्यापक डॉ.सचिन हंचाटे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविक समन्वयक प्रो.मोहन बंडे यांनी विद्यार्थ्यांस आपल्या दैनंदिन अध्ययनासोबतच त्यांच्या अंगी असलेल्या कला-कौशल्यांचा विकास व्हावा, बाजार व्यवस्थापन, व्यापाराचे व्यावहारिक ज्ञान मिळावे या उद्देशाने महाविद्यालयात बिझनेस स्किल्स डेव्हलपमेंट उपक्रम सुरू केला आहे. त्यात दर आठवड्यातील एक दिवस किमान दोन विद्यार्थ्यांचा समूह आपल्या स्वगृही व पालकांच्या देखरेखीत खाद्यपदार्थ किंवा कोणत्याही वस्तू तयार करून योग्य दरात त्याची महाविद्यालयात विक्री करणार आहे. बिझनेस स्किल्स डेव्हलपमेंट क्टिव्हिटीच्या उद्घाटन प्रसंगी सानिया मुल्ला, बी.ए.द्वितीय वर्ष व तमन्ना पटेल, बी.सी.ए.द्वितीय वर्ष यांनी खिचडी खाद्यपदार्थाची स्वगृही निर्मिती करून महाविद्यालयात विक्री केली. यावेळी कौशल्य विकास विभागातील डॉ.सुचिता किडीले, डॉ.विकास कुलकर्णी, प्रा.गंगाप्रसाद तोटावार, विलास होटकर यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

## साखर उद्योग गौरव पुरस्कार प्राप्त दिलीपराव देशमुख यांचा सद्गुरु गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. ५ सप्टेंबर-**

द डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन इंडिया यांच्या वतीने देशातील साखर उद्योगात देण्याचा येणारा अतिशय प्रतिष्ठित मानाचा पुरस्कार राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी लातूरचे भूषण दिलीपराव देशमुख यांना देशपातळीवरिल साखर उद्योग गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला, त्यामुळे लातूरकरांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे

या अनुषंगाने गुरुवारी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर पंढरपूर देवस्थानचे सहअध्यक्ष तथा श्री नाथ संस्थान औसाचे अध्यक्ष सद्गुरू श्री.गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी आशियाना निवासस्थानी दिलीपराव देशमुख सुवर्णा दिलीपराव देशमुख यांचा सपत्नीक सत्कार केला त्यांना आशीर्वाद दिले तत्पूर्वी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी आदरणीय गहिनीनाथ महाराज यांचे पुष्पगुच्छ देवून सन्मान केला. यावेळी हभप गहिनीनाथ महाराज औसेकर महाराज यांनी देशमुख दाम्पत्यांना आशिर्वाद दिले यावेळी आशियाना बंगल्यावर जागृती शुगर चे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष तथा संचालक अँड श्रीपती काकडे, प्रा.डॉ. बी व्हि मोतीपवळे, गिरीश पाटील, महालिंगप्पा मंठाळे, नागेश कुंभार आदी मान्यवर उपस्थित होते.

**लातूरच्या शिरपेचात मानाचा तुरा**

यावेळी बोलताना विठ्ठल रुक्मिणी देवस्थानचेसह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर म्हणाले, लातूरच्या जडणघडणीत मोलाचा वाटा उचलनारे, सामाजिक, राजकीय, संगीत, सांस्कृतिक, कला, अध्यात्मिक क्षेत्रात आपले वेगळेपण जपनारे



एक कुशल प्रशासक लातूरचे भूषन म्हणून ओळख असलेल्या सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांना नुकताच मानाचा साखर उद्योग गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले त्यामुळें लातूरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असून माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली लातूर जिल्ह्यात मांजरा साखर परिवाराने अत्यंत सूक्ष्म नियोजन करत पारदर्शकता ठेवून १० साखर कारखाने चालवले तेही नफ्यात व शेतकऱ्यांना अधिक भाव देण्याचा प्रयत्न केला आहे त्यामुळे जिल्ह्यांत व्यापार वाढला लोकांना रोजगार मिळाला आहे त्याचे श्रेय दिलीपराव देशमुख यांच्याकडे जाते.

# महादेव कोळी समाजाचे भाजपा प्रदेशाध्यक्षांना साकडे

## समाजाचा प्रश्न सोडवण्यासाठी बैठक घेणार

### आ. चंद्रशेखर बावनकुळे यांचे शिष्टमंडळाला आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. ५ सप्टेंबर-**

मराठवाड्यातील आदिवासी महादेव कोळी, मल्हार कोळी जमातीकडे सबळ पुरावे असतानाही रक्तनात्यात जाचक अटी लावून जात पडताळणी समितीकडून सर्रासपणे प्रकरणे अवैध केले जात आहेत. याबाबत सकल आदिवासी महादेव कोळी जमातीकडून भाजपा प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे याना आदिवासी आमदाराच्या लाबीकडून होत असलेल्या अन्यायाबाबत निलंगा येथे समाजाच्या वतीने निवेदन दिले. असता मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या सोबत तात्काळ बैठक लावण्याचे आश्वासन शिष्टमंडळाला दिले.

मराठवाड्यातील आठही जिल्ह्यामध्ये महादेव कोळी, मल्हार कोळी यांची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे. परंतु या जमातीला सुलभतेने जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी जाणीवपूर्वक अडचणी आणल्या जात



आहेत. आदिवासी संशोधन प्रशिक्षण संस्थेतील आयुक्त राजेंद्र भारूड व ठराविक मतदार संघातील आदिवासी आमदाराच्या लाबीच्या आदेशाप्रमाणे राज्यातील जात पडताळणी समित्या कारभार करतात. या संशोधन समितीवर त्याच प्रवर्गातील अधिकाऱ्यांची नेमणूक केल्यामुळे ठराविक जमतीला सवलतीचा लाभ मिळत आहे. तर विस्तारित क्षेत्रातील अन्य जमातीवर अन्याय केला जात आहे. अनुसूचीत जाती व इतर मगासवर्गीय प्रवर्गासाठी रक्त नात्याचा निर्णय लागू असून केवळ अनुसूचीत जमातीसाठी हा निर्णय लागू करण्यात आला नाही. त्यामुळे हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान होत असून अनेक प्रकरणे उच्च न्यायालयात दाखल होत आहेत. उच्च न्यायालयाकडून या जमातीच्या न्याय मिळत आहे. तरीही प्रशासनाकडून अन्याय केला जात आहे. मराठवाड्यातील महादेव कोळी, मल्हार कोळी जमातीला सुलभतेने जातीचे प्रमाणपत्र व वैधता मिळण्यासाठी मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागत आहे. गेल्या चाळीस वर्षापासून हा प्रश्न प्रलंबित असून मराठवाड्यातील महादेव कोळी, मल्हार कोळी भारतीय जनता पार्टी सोबत अनेक वर्षापासून राहिला आहे. या सरकारकडून हा प्रश्न सुटावा म्हणून अपेक्षा करत आहे. शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सध्या मराठवाडाभर समाजाकडून वेगवेगळे आंदोलने केले जात आहेत. शासनाचे समाजात सध्या राज्य सरकार विषयी रोष निर्माण झाला आहे.

प्रलंबित मागण्याचे शासन परिपत्रक काढण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांची तात्काळ बैठक लावावी असे निवेदन सकल आदिवासी महादेव कोळी जमातीकडून देण्यात आले. या गंभीर प्रश्नावर आपण तात्काळ लक्ष घालून बैठक लावून प्रश्न सोडवण्याचे अश्वासन उपस्थित शिष्टमंडळाला बानवकुळे यांनी दिले. यावेळी युवानेते अरविंद पाटील-निलंगेकर, आ. प्रभारी किरण पाटील, भाजपा जिल्हाध्यक्ष दिलीप देशमुख उपस्थित होते.

## अ‍ॅड. एस.आर.पाटील यांचा पुण्यात सत्कार

**सोलापूर दि. ५ सप्टेंबर-**

बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अ‍ॅड. गोवातर्फे पुण्यात पार पडलेल्या राज्यस्तरीय वकील परिषदेत सोलापुरातील ज्येष्ठ विधीज्ञ सिद्राम रामचंद्र पाटील यांचा सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक, न्यायमूर्ती प्रसन्ना वराळे यांच्या हस्ते शाल, बुके, मानचिन्ह, संविधान पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी न्यायमूर्ती अभय ओक यांनी कायद्याचे पालन होणार नाही तोपर्यंत घटनेचे पालन होणार नाही , निकालाचा काय परिणाम होईल याचा विचार न करता न्यायाधीशांनी पुरावा व कायद्याप्रमाणे न्याय द्यावा, वकिलांनी न्यायालयाच्या कामकाजावर कधीही बहिष्कार घालू नये, न्यायव्यवस्थेच्या स्वातंत्र्यावर गदा येत असेल तर वकिलांनी त्याबाबत लढा द्यावा असे आवाहन त्यांनी केले. सदरचा कार्यक्रम स्वारगेट येथील गणेश क्रीडा कला मंच (पंडित नेहरू स्टेडियम) येथे आयोजित करण्यात आला होता. या परिषदेमध्ये महाराष्ट्र राज्यातील १५ ज्येष्ठ वकिलांचा सत्कार करण्यात आला तर सोलापुरातून ज्येष्ठविधीज्ञ म्हणून एस. आर. पाटील यांचा सत्कार करण्यात आला. तसेच अ‍ॅड. विजय मोहिते, न्यायाधीश भीमराव नाईक यांना मरणोत्तर आणि जेष्ठ वकील डॉक्टर सुधाकर आव्हाड यांना विधी महर्षी पुरस्काराने गौरविण्यात आले.